[illegible] ३५१

मधुमालती - ३६९

# मधुमालती ३६९

---

**एकनाथ यादव निफाडकर.**

**श्रुतिबोध मुद्रामंदिर.**

---

The soul of man sublimed man's Soaring Spirit,
Seen in the poet, gloriously revealed.

*Goethe,*

chTal ? ? ?
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 349
॥ ॐ ॥ 1035

# प्रिय सुहृद्गणहो !

कवीला जें कांहीं सांगावयाचें असतें, तें सगळें तो आपल्या कवितांतच सांगून टाकितो. तेव्हां त्याला प्रस्तावनेची जरूर असतेच असें नाहीं. तरी पण जेव्हां त्याचा काळ स्पष्ट विचारक्रांतीचा असतो, तेव्हां मात्र त्याला आपल्या कवितेचा विशेष गुण लोकांपुढें प्रस्तावनेंत ठेवणें भाग पडतें. हें काम स्वत: करण्यापेक्षां दुसऱ्याकडून करवून घेणें हल्लीं विशेष प्रचारांत आहे; परंतु निदान काव्यप्रांतांत तरी आपल्या मित्रास ही कामगिरी सांगणें म्हणजे त्याच्या उरावर नसतें दडपण ठेवून त्यांची मनोवृत्ति व्यर्थ क्षोभविण्यास कारणीभूत होणें असें अलीकडे आढळून आलें आहे. शिवाय घटकाभर भीड बाजूस सारली तर प्रस्तावनेचें कार्य स्वत:लाच उत्कृष्ट साधतें असें दिसून येईल.

महाराष्ट्र कवितेची आज बाल्यावस्था आहे असें समजणाऱ्यांपैकीं मी एक नाहीं. तिला आतां कांहीं विशिष्ट गोष्टींकडे जरूर लक्ष दिलें पाहिजे हें खरें असलें तरी तेवढ्यावरून तिला बाल्यावस्थेंतच ठेवून, तिच्या कांहीं मोठेपणाच्या अचरट गोष्टींकडे कानाडोळा करणें, कोणत्याही रीतीनें इष्ट नाहीं. इंग्रजी कवितेलाही शेक्सपिअर नंतर मिल्टनपासून तों तहत आधुनिक कालापर्यंत जें थोडथोडें अध्यात्मिक वळण मिळत गेलें तेवढ्यावरून तिला कोणीहि बालिका ठरविलें नाहीं. उलट

ती जी चॉसरपासून शेक्सपिअरपर्यंत एक तारुण्यानें मुसमुसलेली, आकाशांतली बिजली होती, तिला मिल्टन, वर्डस्वर्थ, ग्रे, शेले, टेनिसन वगैरे कवींनीं व अगदीं अलीकडे लॉंगफेलो व इमर्सन यांनीं तर विशेषच, गंभीर, प्रौढा, तरीपण पूर्वीइतकीच मोहक व जोरदार काव्यदेवी करून इंग्लंडचें काव्यमंदिर तिच्या कांतीनें भरवून टाकिलें आहे! आज आमचें काम त्यांच्यापेक्षां कितीतरी पटीनें सुकर आहे! आमची महाराष्ट्रकविता मूळचीच गंभीर, ओजस्वी व प्रेमळ. तिनें वेळोवेळीं योग्य तीं स्वरूपें घेऊन महाराष्ट्रास संकटांतून बचाविलें आहे. ईश्वरी संकेतानें तिचा आज इंग्रजी कवितादेवीशीं संबंध जडला आहे. व तिच्यांत तिला कांहीं नवीनच सद्गुण दिसून आले आहेत. त्यांपैकीं मुख्य ह्मणजे सृष्टिक्रियानिरीक्षण व मनुजमानसपरीक्षण. या दोन गुणांकडे विशेष लक्ष पोंचविण्यास ती तिच्या भक्तांना फर्मावित आहे. हे दोनही सद्गुण तिला अगदींच नवीन आहेत असें नाहीं. प्रत्यक्ष तिच्या आईंत ते विशेषच जोरांत वसत आहेत. पण आजतागाईत तिला आईच्या त्या दोन सद्गुणांपेक्षां, तत्त्वज्ञान, योगसाधन व पुराणवर्णन या तीन बहुमोल रत्नांचीच अपेक्षा फार होती. परंतु हल्लीं सृष्टिक्रियेकडे व या गूढ मानवमनाच्या परीक्षणाकडे तिला आपली भेदक दृष्टि फेंकणें भाग आहे. आत्मज्ञानापुढें या दोन्हीहि गोष्टी अगदींच किरकोळ आहेत यांत शंका नाहीं. परंतु तुमचीं सर्व मनश्चित्रें गाऊन प्रकट करा असें ती आज बजाऊन सांगत आहे. ती ह्मणते कीं "कविजनहो! तुह्मी माझ्या मंदिरांत येऊन आनंदित तर व्हाच व्हा;

परंतु तुमचा येथपर्यंत प्रवास कसा झाला तें अगोदर सांगा. तुमच्या हृदयाला किती विंचवांनीं नांग्या मारिल्या, तुह्मांला कोठें, कसा, कोणी व काय ह्मणून ताप दिला तें बिनदिक्कत सांगा. तुमची कोणी स्तुति केली, तुह्मांला कोणी फसविलें, हें खुशाल गा! पण एक गोष्ट ध्यानांत ठेवा कीं, तुह्मी अशा रीतीनें गाणीं रचण्याचा प्रयत्न करा कीं त्यांपासून तुमच्या बंधुभगिनींना आनंद होईल, त्यांना ज्ञान मिळेल, त्यांना बरें-वाईट समजेल व तुह्मांलाही आनंद होईल."

अहाहा! या संदेशाचा व आमच्या पूर्वकालिन संस्कृतीचा मला इतका अत्यानंद होत आहे कीं, त्याच्या भरांत मला शारदादेवीचें इष्ट-कार्य तत्काळ झालेलेंही दिसत आहे! आह्मीं भारतीय कवि, कीं जे अगदीं गर्भात असतांना देखील वेदांत ऐकूं लागतों, त्यांना ईश्वरीप्रसाद होतांच, सृष्टीशीं बोलतां येणार नाहीं कां? व सुष्टदुष्ट मनुष्यांच्या हृद-यकपाटांत सूक्ष्मरूपानें शिरतां येणार नाहीं कां? जो क्रिकेट खेळण्यांत निपुण आहे त्याला टेनिस खेळण्यास हात धरून शिकवावें कां लागतें? समुद्रांत भयंकर तुफानांत देखील जो बेधडक पोहतो, त्याला शांत सरोवरांत उडी मारण्यांस छाती कशाला हवी? अंतःशुद्धि करणारा सहस्ररश्मि सविता बाह्य सृष्टीचें मलक्षालन करणार नाहीं असें कसें होईल? त्याचप्रमाणें ज्यांनीं मानवीबुद्धीच्या व मानवी हृदयाच्याही पली-कडे जाऊन तें सच्चिदानंदस्वरूप ओळखिलें त्या ऋषींच्या आजच्या पिढीला, प्रसंगीं, वीसाव्या शतकांतली ह्मणून, सृष्टीची भाषा व मानवी मनोधर्म कळणार नाहींत असें कोण ह्मणेल?

परंतु पूर्वजांच्या नांवावर विक्री करण्याचे हे दिवस नाहींत!! त्यावेळचीं कमळें आतां नष्ट झालीं आहेत व त्याठिकाणीं प्राणघातक शेवाळ मात्र बेसुमार उत्पन्न झालें आहे! आज आमच्या महाराष्ट्रांतच काय, पण सबंध भरतभूमींत, अशीं किती तरी माणसें दिसून येत आहेत कीं, तीं बुद्धिसामर्थ्यानें विलक्षण प्रबळ असूनही व त्यांच्या हृदयांत उत्कृष्ट प्रेमाचें बीज असूनही, त्यांच्या हांतून ह्मणण्यासारखी कोणतीच उन्नति होत नाहीं. या दुर्विपाकाला जीं अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं विपरीत परिस्थिति हें एक जबरदस्त कारण असेल; परंतु आपणांमध्येंही कांहीं थोडेथोडके दोष नाहींत. आमच्या पांचपंचवीस बुद्धिमान् माणसांनीं कमर बांधिली तरी त्यांच्याकडून सामाजिक प्रगति तर राहोच पण त्या प्रगतीचें धोरणही निश्चित् होत नाहीं. सामाजिक उन्नतीची ही स्थिति असल्यावर देशसेवा करणारे वीर कसकसे निपजतील याची फक्त कल्पनाच करावी. तरीपण अशा बिकट परिस्थितींतहि कांहीं जीवात्म्यांनीं आत्मोन्नति करून दाखविल्यामुळें त्या बाबतींत तरी हिंदुस्थानची लाज राखिली गेली आहे. अशी गोष्ट आहे तरी त्यांच्या अनुभवांचा फायदा करून घेतां येण्यासारखी सर्वसाधारण ज्ञानसंपन्न प्रेमोत्कटता आमच्या देशांत अझून खास दिसत नाहीं. आमच्या आधुनिक ज्ञानसंपत्तीचें सर्व साधारण माप फारच अल्प आहे. आमचा प्रेमनिर्झर कोणत्याही देशापेक्षां खास जास्त जोरानें वाहत आहे. पण तो शिस्तीनें वाहत नसल्यामुळें नेहमीं गढूळ होऊन त्याच्या जोराच्या प्रवाहांत अनान्वित कृत्यें करित आहे. अद्वितीय परमहंसरत्न येथेंच निर्माण

होतें; पण अद्वितीय रानटी कठोर फत्तरही येथेंच आढळतात! आम्ही सात्त्विक व तामसी अशा दोन शिखरांवरच राहणारीं माणसें आहोंत. आमच्या रजोगुणाचा मध्यबिंदू नेहमीं खोल दरींतल्या अंधःकारांत असल्यामुळें तो कधींही दृगोचर होत नाहीं. पूर्वी आमच्या सत्त्वगुणीं नररत्नांनीं स्वतः रजोगुण उचलून अनेकवेळां अचाट कृत्यें करूनही सत्त्वगुण पाळिला होता; त्याचप्रमाणें रजोगुणी माणसांचा वर्ग राष्ट्रांत कायम राहिल हें पहाण्यांस ते कधींही विसरले नव्हते. पण ज्यावेळीं हा सत्त्वगुणाचा रजोगुण मावळला व जेव्हां तमोगुणच रजोगुणाचें काम पाहूं लागला, त्यावेळीं ईश्वरी नियमांप्रमाणें सत्त्वगुणाची मोहक लाल छटा मावळूं लागून, तमोगुणाची घोर निशा, तिचें लाखों, नव्हे, अगणित पातकें झांकून टाकणारें काळें व भयंकर जाड वस्त्र, भरतभूमीवर टाकूं लागली! ह्या निशासमयींहि कांहीं काजवे चमकूं पहातात; पण ते चमकत नाहींत तोच त्यांचें, भोंदू साधूंप्रमाणें, निश्चित अधःपतन होतें!

हा काळोख एकसारखा श्रावणांतल्या मेघाच्छादित आकाशाप्रमाणें असता तरी बरें होतें, कारण लवकरच कुठें तरी मेघपटल फाटेल अशीं चिन्हें तरी त्यावेळीं असतात. पण आजचा काळोख पुटांवर पुटें देण्यांतच वाढत आहे. सत्त्वगुणाचें प्रधान अंग ह्मणजे अव्यभिचारी भक्ति. तीहि सांप्रत खालावत जाऊन तिचें प्रेमांत रूपांतर झालें आहे. येवढेंच झालें असतें तरी हरकत नव्हती. फक्त शब्दांत व्यभिचार झाला असता. पण आज तें प्रेमही कामुक विषयांत प्रवेशित झालेलें दिसतें. बरें, सत्त्वगुणाचें मूल अंग जें बुद्धिप्रचुर ज्ञान, तेवढें मात्र फक्त उच्च वर्गांत प्रखरतर

राहिलें आहे. अर्थात्, जेव्हां प्रखरतर ज्ञानाला फक्त कामुक प्रीतीची जोड मिळते तेव्हां, त्यांचा प्रेमसंगम, सत्त्वहीन, दुर्बल पण अधोगतीस वेगानें नेणारें कर्मपिशाच्चच निर्माण करील यांत नवल तें कसलें ? व एकदां हें भूत तमोगुणाचें धूमोत्पादक कोलित फिरवूं लागलें म्हणजे कोठें कोठें आगी लावील याचा कांहीं नियम नाहीं. अशा वेळीं बुद्धिमान् पण विषयलंपट कवि सर्वांचें हृदय हलविणारें काव्य निर्माण करितो; परंतु त्याच्या सहायानें तो किती तरी विधवांचीं हृदयें पार फाडून टाकितो ! प्रतिभासंपन्न चितारी आपल्या कुंचलीनें नाना चित्रें काढितो; पण द्रौपदींत देखील मदनचेष्टेची छटा उमटवून एकाद्या अल्लड तरुणास मोहित करितो ! बहुश्रुत परंतु कित्तिलोलुप मुत्सद्दी विलक्षण देशसेवा करितो; पण आपल्या पुढें गेलेल्या सोबत्यास गोत्यांत आणून, देशाचें आहेत करण्यास मागें पुढें पहात नाहीं ! साधुवृंदांनीं तर, काळीं संपुटें बेसुमार चढविण्याचा मक्ताच घेतला असतो ! जे स्वकीय राष्ट्रशास्ते आहेत, त्यांतील बहुतेकांना, परकीयांपासून उत्कृष्ट शिस्तीचें वळण मिळत असूनही, त्यांच्यांत उत्कृष्ट रजोगुण उत्पन्न होऊन, त्यांच्यातून तमोगुणाचा अंधार व त्यांतलीं घोर पातकें नष्ट होत नाहींत ! अशा रीतीनें यथा राजा तथा प्रजा या न्यायानें व

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ३ ॥ २१ ॥**

या भगवंताच्या उक्तीप्रमाणें, जिकडे तिकडे तमोगुणवैभवाकरितांच बुद्धीचा उपयोग होत आहे ! पशुपक्षी व वृक्षपर्वतांसारखे स्थिर

व जड पदार्थही, आपापलीं नियत कार्यें करितात; व मनुष्यांनीं त्रास दिला तरी सुखासमाधानानें राहतात पण ज्ञानविहित परंतु प्रेमरहित माणसें मात्र कोठें सत्त्वगुण दिसतांच, त्याला बहुधां सत्तेच्या जोरावर व कधीं कधीं, अवास्तव स्तुतीनें, निंदेनें, लांचलुचपतीनें व असत्यानें लोपाविण्याचा प्रयत्न करितात. अर्थातच अशा गाढ अज्ञानांधःकारांतहि कांहीं जीव जागृत असतात. परंतु त्यापैकीं फारच थोडे प्रकाशून कांहीं काळ तरी अंधाराचें पटल फाडतात! बाकीचे जीव जागृत राहिल्यानें त्यांना पूर्व स्मृतीनें दुःख होतें, त्यांना प्राप्त स्थितींतला छळ सोसवत नाहीं. ते सिद्ध किंवा मुक्त झालेले नसतात पण त्यांचा पुण्याईनें प्राण जात नाहीं. ते तसेच मुमुक्षु स्थितींत खितपत पडतात! एकमेकांच्या सहानुभूतीपर व क्वचित् प्रेमळ वचनांनीं ते कसे तरी दिवस काढितात! अशा नरनारीजनांच्या दुःखालापांनीं सर्व विश्व कोंदून जाईल तर बरें होईल. परंतु त्यांचे आलाप, त्यांच्या मरत असलेल्या पापी बंधूंच्या विव्हळण्यांत व जी बेसुमार पशुपक्षीहत्या होत आहे तिच्या हृदयभेदी हंबरड्यांत व अश्रुरक्तांच्या अथांग प्रवाहनद्यांत लुप्त होऊन जात आहेत. अशा वेळीं चुकून कांहीं जीवांचे आलाप कर्णी पडलेच तर कवीनें—

**नच तळमळते ज्ञानी नर या विश्व प्रेमाकरितां**
**ज्ञानाभावीं प्रेम न सुकतें, काय नाथ मग गाता !**

असें उद्गार काढलें तर त्यांत काय वावगें होईल? व निष्फळ होणार हें माहित असतांही कै. केशवसुतांचें हें पुढलें वीर्यशाली कवन तरी त्यानें कां गाऊं नये?

**संघशक्तिच्या भुईंत खंदक**
**रुंद पडुनि शें तुकडे झाले,**
**स्वार्थानपेक्ष जीवीं आपुलें**
**पाहिजेत ते सत्वर भरले—च्या त्यांत उड्या तर बेलाशक !**

येवढ्यावरून तुमच्या लक्षांत येईलच कीं माझें सारें लक्ष, कथानकापेक्षां मनोवृत्ति कशा रेखाटल्या जातील इकडेच विशेष आहे. माझ्या मधुमालती काव्यांत जीं कांहीं थोडीं पात्रें आहेत तीं त्यांच्या स्वभावानेंच विशेष खुलविण्याचा माझा प्रयत्न आहे. त्यांच्या स्वभावाच्या चवथ्या हिश्श्यानेंही त्यांच्या कथेकडे मी लक्ष पोंचविलें नाहीं. त्यांचें शरीरवर्णन तर तुह्मांला हुडकूनच काढावें लागेल. किंबहुना त्या दोन्हीं गोष्टी स्वभाववर्णनावर अवलंबून ठेविलेल्या दिसतील. सृष्टीसौंदर्यवर्णनांतहि अशीच दृष्टि ठेवण्याचा मी प्रयत्न केला आहे. ही गोष्ट ध्यानांत घेऊन काव्य वाचावें अशी सहृदय व मार्मिक अशा तुह्मांस माझी सनम्र विनंति आहे.

अशा नवीन दृष्टीनें, माझा अनुभवानंद ओळखून मी तो काव्य वाणींत आज प्रथमच तुह्मांपुढें मांडित आहे. या कामीं मी नवीन इंग्रजी वळणावर पण आपल्या श्रीज्ञानेश्वरादिक पूर्वकालिन महात्म्यांचा हात धरून व श्रेष्ठ कविवर वाल्मीकिमुनींच्या, अस्पष्ट पण मोहक वीणानादाच्या गुंगींत, माझ्या विचारांची इमारत रचली आहे. माझी कविता वाचल्यानंतर, माझ्या या इमारतीला, कै. केशवसुतादिक आधुनिक कवींचा जोमही किती मजबुती आणित आहे, हें आपणांस दि-

सून येईलच. मी स्वतंत्र गायक नसून माझें सगळें गाणें ते मजकडून गाववीत आहेत. अर्थातच या पुस्तकप्रसिद्धींत, कोणाला शिकवावें ह्यापेक्षां मी काय शिकलों हेंच जास्त सांगण्याचा हेतु आहे. क्वचित् प्रसंगीं कठोर शब्द निघून गेले असतील. परंतु ते निराशेंत व दुःखोद्वेगानें निघालेल्या जीवात्म्यांचे प्रतिध्वनि आहेत हें लक्षांत घ्यावें अशी माझी सनम्र प्रार्थना आहे.

माझे सुप्रसिद्ध प्रेमळ कविमित्र रा. रा. दत्तात्रय अनंत आपटे ऊर्फ अनंततनय यांनीं व माझे मित्र रा. रा. विष्णु आबाजी किल्लेदार (धुळें) यांनीं केवळ प्रेमभावानें मला जी वेळोवेळीं मदत केली, तिजबद्दल मी त्या दोघांचाही फार फार ऋणी आहें. त्याचप्रमाणें श्रुतिबोध मुद्रामंदिराच्या व्यवस्थापकांनीं ग्रंथमुद्रणांत जी विशेष कळकळ दाखविली तिजबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

धुळें
विजयादशमी शके १८३६. } नाथ.

# विषयानुक्रमणिका.


| | |
|---|---|
| मधुमालती | १ |
| **स्फुट कविता.** | |
| माझें सृष्टीवरील प्रेम. | ७३ |
| सृष्टीचें मजवरलें प्रेम. | ७६ |
| स्वातंत्र्योद्गार ! | ७८ |
| मंदिर झाडतांनां पाहून. | ८० |
| मातृस्मृति. | ८६ |
| मातृप्रेमविकास ह्मणजेच सद्गुरुप्रेमोद्भव | ८८ |
| रडा रडा, तें रडें चालूं द्या ! | ९३ |
| अस्थानीं प्रेम. | ९४ |
| काव्यरत्नविलास. | ९५ |
| जग करील यांना खोटे. | ९६ |
| शांतीस. | ९९ |
| पुस्तक कोणाचें. | १०२ |
| अश्रु. | १०२ |
| भाकरी. | १०५ |
| नाद—आवाहन. | १०७ |

९०३८
काव्य ५१.
३६७

॥ ॐ ॥

# मधुमालती.

## खंड १.

—* साकी *—

ऋक्ष-वर्णशृंगीं[1] होता बसला एक कवी विमनस्क;
नटली होती रम्य वनश्री; परि न तयाचें लक्ष ! १
वायुलतांना हलवी; उधळी पुष्पपरागांनाही
त्रस्त कवीवर मारुत; परि त्या ज्ञातही न तें कांहीं ! २
भास्करकिरणीं क्रीडा करुनी, निर्झरजल शैलांचें
छायाप्रांतीं घेत उड्या; परि भान न तेथें कविचें ! ३
द्युमणीनेंही जातां जातां वनदेवीला दिधलें
वस्त्र लाल; परि परिधानें त्या कविमन नाहीं रमलें ! ४
संध्यासमयीं मुदित होउनी, मधुरकंठ पिक रानीं
गाई; परि त्यां नाहिं मोहिलें कविमन आलापांनीं ! ५

---

१ विंध्याद्रीचें शिखर.

‘ दुर्मुख, परि अतिमोहक असुनी, रम्य सुस्वरूपेंही
मोहित होइ न ! शुकमुनि दुसरा कोण ?’ वनश्री पाही. ६

वसंतमाधवरतिमदनांना घेउनि अपुल्या संगें
भानुमयूखीं अस्पष्टाकृति वनली; कवि नच रंगे ! ७

मग कविहृदयीं प्रहार करण्यां रतिसखिबाणा सजिलें;
तेव्हां केतकिसौगंधें तें वनभूषण घमघमलें ! ८

देवीचा रतिसायक बघुनी मग कविमनही द्रवलें !
“ये, ये, रतिशर ! भरुनि काढ ही जखम !” असें तो बोले; ९

“क्षमा करीं गे माते, मजला; विव्हल हृदय जहालें !
भ्रष्ट चालली होत मतीही; अनुदिनिं तापें पोळे १०

रक्त वस्त्र तव पाहुनि होते स्मृति मज त्या रक्ताची,
फोडुनि कुंडें हृदयींचीं जें निघे, दीन जीवांचीं ! ११

ज्ञानवंत हा मनुज, परी तो अज्ञानी तितुकाची,
मनुज मानवा मारी ! मान्य न अज्ञां नीति तुक्याची ! १२

ग्राम्य वन्य वा पशु, अथवा ते खग, कीं कीटकही ते,
व्यर्थ न वैरा धरिती; करिती विधिनियमितकार्यातें ! १३

व्याघ्र व्याघ्रा, सिंहहि सिंहा, नाग नागणीलाही
मोर मयूरा, हंस हंसिला, दुखवी नच शब्देंही ! १४

करुनि क्रीडा जलीं भागतां, करिणी करिवरि टाकी
सहजच शुंडादंड; तसा करि करिणीवरि तृण झोंकी ! १५

क्रूर भक्षका, रक्षकास परि सुंदर रूप जियेचें
ऐसी व्याघ्री व्याघ्रासन्निध जातां तोही नाचे ! १६
भेसुरवदना, क्रूरगर्जना, मार्गणगमना सिंही
फोडी गजगंडस्थल; परि हरि तिजला प्रेमें पाही ! १७
येतां पातल दल अडवें करि चक्रवाकि आक्रोशा !
अरुणोदयिं निज भर्तासंगम घडतां नच करि रोपा ! १८
गुं गुं करुनी भ्रमरी काळी मीलित कमलाभोंतीं
प्रियवल्लभमुक्त्यर्थ फिरे; ही उज्ज्वल प्रेमज्योती ! १९
फूलपांखरूं बालक ज्यांचें, भूमीजलधरही ते
वसती भिन्न स्थलिं; परि असती उत्सुक समागमाते ! २०
स्वस्त्रीसंगें काल-घालवुनि, मनुजेतर जीवांनीं
सुखा जोडिलें; मनुज परि त्यां वेधी तीक्ष्ण शरांनीं २१
स्वार्थास्तव त्या गृह कीं ग्रामें अपुरीं, अपुली योनी !
रानींवनिंही हिंडत फिरतो, स्वार्थार्थ न उमजोनी ! ! २२
‘ परमेशाचा प्रियकर बालक मी; माझ्याकरितां ही
जडाजडा या सृष्टि निर्मिली; अथवा ईशच मीही !’ २३
सत्य भावना; परी कामना, अहंपणा तन्मूल;
मनुजा, सृष्टि तुझी, तूं स्रष्टा, परि ती कोमल फूल ! २४
प्रेमाविण रे, स्रष्ट्याचें पद, सृष्टीचें पद होतें;
ज्ञानविहित ती प्रीतिरहित तव सृष्टि तापदा होते ! २५

मधुरमालतीसुगंधशीतलवायुभरित हीं स्थानें
पूर्णानंदीं लाविति लय; परि भरविसि तूं रक्तानें ! २६
मातृस्तनिंचें दुग्ध प्राशुनि, हरिणबाळ आनंदें
उडे, बागडे, धांवत जाई, परत फिरेही मोदें; २७
मातेचें कधिं अंग चाटितें; शिंगें रोंवी कधिंही;
टौकारूनी कधीं पाहतें—प्रेमें पान्हा येई ! २८
माता त्याच्या, तें मातेच्या प्रेमा होतें स्थान !
व्याधा ! कैसा हात वाहतो सोडाया तव बाण ? २९
मृगया कां ही तुझी मानवा ? प्राणांवर पोसे तीं !
मूक विचारे प्राणी सारे त्वद्ज्ञाना बळि पडती ! ३०
मूक जरी ते, त्यांना वाचा, नीचा वघ, आहे रे
तव बाणाग्रीं दृष्टि लावुनी, अश्रु ढाळिती सारे ! ३१
रे रे प्राण्या ! व्यर्थ तुझे ते मूकशब्द अश्रूही !
मत्त ज्ञानें मनुज साधनें शोधी नूतन कांहीं ! ३२
जीव एक परि रानीं आहे स्वस्थपणें निजलेला;
—नीज नीज गे हरिणी ! येइल कोणि न दुखवायाला ! ३३
त्रस्त न झाले नयन कधीं तव निषादमुख पाहोनी;
भेसुर नाद श्रवणिं तुझ्या नच पडला कधिंही रानीं; ३४
होतिस दुःखांमाजीं बाले, अर्भकपणिं कांतारीं,
गेलिस भोगायां सुख—दीनां नच कां ईश्वर तारी ? ३५

जाळें नाहीं व्याधाचें कीं ओरडणें श्वानांचें;
भयकारण तो देहहि नाहीं राज्य तिथें प्रेमाचें; ३६

(२)

मृगीस्मृतीनें खळबळला तैं प्रेमनिधी हृदयींचा !
अधःप्रांत जल घेतें, परि हृद्रस घेतो नयनांचा ! ३७
जलसागरिं तो खळबळ करितो इंदु नभापासोनी;
कविहृत्सागर खवळी हरिणी या जड भूमींमधुनी ! ३८
हरिणीप्रेमें कविमन नेलें मनुजज्ञानकृतींच्या
मार्गें वघण्यां ईशहेतु; मग निघे अशी तद्वाचा; ३९
" आत्मप्राप्तीकरितां ईशें ज्ञान मानवां दिधलें;
कितीजणांनीं प्रेमें वागुनि सुखशांतीला वरिलें ? ४०
' मनुजें मनुजें आपआपलें इच्छाशत साधावें; '
आत्मघातका ! कसें न कळतें इच्छा शतधा धांवे ! ४१
ईशदान तें ज्ञान तनुप्रिय वासनांत रमवीलें !
मनुजा, त्यांना व्यत्यय येतां, मन तव चंचल झालें ! ४२
सागरकल्लोळांसम अथवा निंदकनिंदा जेंवी,
खंडनि जीवन तुझी वासना मनुजा, घेते तेंवी ! ४३
मज्जामांसस्नायूमिश्रित देहा बंधू भुलला !
प्रतिघाताला शक्ति न म्हणुनी इतरांना बळि पडला ! ४४

अलोट, अगणित संपत्तीनें मनुजरूप कीटांनीं
रक्ताचे ते पाट काढिले बंधुमस्तकांमधुनी ! ४५

शत्रूंच्याच न आप्तांच्याही माथीं पद ठेवोनी,
सुखा जोडिलें; हरहर! मनुजा, तें सुख नाहिं निदानीं ! ४६

असतें तें सुख, दुःखी कां रे, होसी दुसऱ्या दिवसीं ?
मित्रहि होती शत्रू, त्यांना प्राशन विषमय देसी ! ४७

मित्रद्रोहें करिसी नीचा, तद्धनदारावांच्छा !
हरहर ! मत्ता, ज्ञानें वदसी ' हीच असे ईशेच्छा !' ४८

एकावरती दुसरें पातक रचुनि तयांची शय्या,
मस्तक तिजवरि निद्रा घेई;–निद्रा कां ती अदया ? ४९

निद्रा नाहीं, तंद्री नाहीं, नाहीं कांहीं क्षेम !
मत्सर खवळे, मस्तक भडके, हिंसेचा तो होम !! ५०

काढीं, काढीं, देवा काढीं; घेइ काढुनी ज्ञाना !
मनुज नीच हा निष्ठुर पाहीं; नाहीं योग्य ज्ञाना !!" ५१

(३)

लाल जाहला कवि संतापें; ओष्ठकांति ती लाभे
नेत्रां, तैशी सर्व मुखाला; मुख तपनासम शोभे ! ५२

अस्तगिरीला वश होतां जलिं होतें कंपित बिंब;
त्रस्तमनाच्या लहरिवशें तें मूर्च्छित कविमुखबिंब ! ५३

शुकमुनि जाणुनि वनदेवीनें स्त्रजिलें चापा होतें;
रंभेपरि, परि, परिसुनि कविवच सृजिलें आपजं हो, तें ! ५४

सृष्टिसतीचें आकाशोदर भेदुनियां मग आला,
रविकिंकर तो शंकरभूषण; कविसंताप निवाला ! ५५

अमृतकिरणीं सुवर्णचंपकसुगंध तो मिसळोनी
मंदचरानिल तटिनितुषारांसवें देइ पसरोनी ! ५६

कामांधोच्छृंखलमन होतें शांत विवेकें, तैसें
क्रोधतप्त कविचें मन झालें दांत नर्मदालास्यें ! ५७

(४)

" हा नग कीं हा नाग तसा हा खगानुगहि कां आहे
पात्र ज्ञाना ?—गुरुपत्नीशीं संग शशीचा मोहें ! ५८

ज्ञानांशानें नग हे होते मत्त ! पक्षधर उडती !
वज्राघातें छेदन करि तो मत्तप ! क्षधरें रडती ! ५९

नागा दिधलें ज्ञान; कालियामर्दन कां तें झालें ?
कालिंदीजल विमल, श्यामल नागें गरलें केलें ! ६०

ज्ञानविहित ही प्रेमरहित परि काया विफल जगीं या !
सुंदर चित्रीं मृतपत्नी जशि वाया चुंबनसौख्या ! ६१

---

१ चंद्र. २ शशी. ३ पर्वत. ४ इंद्र.

अलोट, अगणित संपत्तीनें मनुजरूप कीटांनीं
रक्ताचे ते पाट काढिले बंधुमस्तकांमधुनी ! ४५

शत्रूंच्याच न आप्तांच्याही माथीं पद ठेवोनी,
सुखा जोडिलें; हरहर! मनुजा, तें सुख नाहिं निदानीं ! ४६

असतें तें सुख, दुःखी कां रे, होसी दुसऱ्या दिवसीं ?
मित्रहि होती शत्रू, त्यांना प्राशन विषमय देसी ! ४७

मित्रद्रोहें करिसी नीचा, तद्धनदारावांच्छा !
हरहर ! मत्ता, ज्ञानें वदसी ‘ हीच असे ईशेच्छा !’ ४८

एकावरती दुसरें पातक रचुनि तयांची शय्या,
मस्तक तिजवरि निद्रा घेई;–निद्रा कां ती अदया ? ४९

निद्रा नाहीं, तंद्री नाहीं, नाहीं कांहीं प्रेम !
मत्सर खवळे, मस्तक भडके, हिंसेचा तो होम !! ५०

काढीं, काढीं, देवा काढीं; घेइ काढुनी ज्ञाना !
मनुज नीच हा निष्ठुर पाहीं; नाहीं योग्य ज्ञाना !!” ५१

(२)

लाल जाहला कवि संतापें; ओष्ठकांति ती लाभे
नेत्रां, तैशी सर्व मुखाला; मुख तपनासम शोभे ! ५२

अस्तगिरीला वश होतां जलिं होतें कंपित बिंब;
त्रस्तमनाच्या लहरिवशें तें मूर्च्छित कविमुखबिंब ! ५३

शुकमुनि जाणुनि वनदेवीनें स्रजिलें चापा होतें;
रंभेपरि, परि, परिखुनि कविवच सृजिलें आपजें हो, तें ! ५४

सृष्टिसतीचें आकाशोदर भेदुनियां मग आला,
रविकिंकर[1] तो शंकरभूषण; कविसंताप निवाला ! ५५

अमृतकिरणीं सुवर्णचंपकसुगंध तो मिसळोनी
मंदचरानिल तटिनितुषारांसवें देइ पसरोनी ! ५६

कामांधोच्छृंखलमन होतें शांत विवेकें, तैसें
क्रोधतप्त कविचें मन झालें दांत नर्मदालास्यें ! ५७

(४)

" हा नग कीं हा नाग तसा हा खगानुगां[2]हि कां आहे
पात्र ज्ञाना ?—गुरुपत्नीशीं संग शशीचा मोहें ! ५८

ज्ञानांशानें नग हे होते मत्त ! पक्षधर[3] उडती !
वज्राघातें छेदन करि तो मत्तप[4] ! क्षधर[3] रडती ! ५९

नागा दिधलें ज्ञान; कालियामर्दन कां तें झालें ?
कालिंदीजल विमल, श्यामल नागें गरलें केलें ! ६०

ज्ञानविहित ही प्रेमरहित परि काया विफल जगीं या !
सुंदर चित्रीं मृतपत्नी जशि वाया चुंबनसौख्या ! ६१

---

१ चंद्र. २ शशी. ३ पर्वत. ४ इंद्र.

ज्ञाना योग्य स्थान न दिसतें मनुजेतर जीवांचें !
मनुज नीच हा निर्दय ! ईशा, ज्ञानसौख्य हें कैचें !" ६२

(९)

पुनरपि वैसे शून्य होउनी, कालें सागर जैसा !
ऐन निशीथीं ऐके सुस्वर मंजुळ वीणारवसा ! ६३
दूरवरीं त्या नौका सुंदर एक दिसे येणारी;
निकट निकट ती येतां पाही कवि बाला गाणारी. ६४
अस्पष्टाकृति घेतां झाला कवि शुकमुनि ह्मणुनी ती
स्पष्टाकृति जणुं देवी झाली मोहाया एकांती ! ६५
कनककेतकीकांतीकायालिंगन शशि तो ध्यायां
जलिं जाई; परि नौका कंपवि, अनिल जसा त्या गाण्या; ६६
खवळे चंद्रक्रोध, निघे हें नंतर मत्सरवचन
'मृगभूषण हें माझें; कुंकुमहीन तुझें गे वदन !' ६७
परि मोहक ती शांत बालिका मग्न आपुल्या गानीं !
सज्जन मन तें शांति न सोडी, निंदा जरि ये कानीं ! ६८

## बालागायन.

( चाल—सोच समज. )

शांति न ती मिळते । मनाला । उत्साहा तें कधिं नच वेतें ॥
भगिनिलतांनो, कष्टद होता; मसनु तुमच्या स्पर्शें जळते ! शां०

पीतपरागां उधळुनि वल्ली; पतिविरहानल वर्धित करिते! ॥ शां०
ही वनदेवी तापद होई! संतापें हें हृदयहि चेतें !! शांति० १

(६)

साकी

हृदय चेतलें संतापें तरि वदनकांति ती सेवी
कोमलता; तो वीणारव वनिं गत नादांहीं जेंवी ! ६९
मंद मंद ती कंदरिं नौका येत कविस्थानातें,
जाणुनि बालामनिं, रम्यस्थल हेंच, थांबली तेथें. ७०
शोकभरें पर्याप्त मन तरी हस्त थांबवी नौका;
करिते प्रीती तापांतर्गत इष्टकार्य; हरि शोका ! ७१
बांधुनि नौका आम्रा एका, शिवमूर्ति स्थापूनी,
फलपुष्पांनीं पूजी ती मग; कीर्तनही करि गानीं ! ७२

## शिवकीर्तन

( चाल—सुवर्णकेतकी— )

शरण शिवा[1] तुज आली अबला; रक्षण करिं दीनेचें !
[2]स्मरहर तुजला वदती, पुनरपि हरण करीं रे त्याचें !
कायादहनापासुनि शिकला मन्मथ दहनक्रिया !

---

१ सुविचार. २ कामविचार.

जाळी मानस; काया खुलवी; उलटी नच कां दया ?
वृद्धा ! वरिसी तरुणी; रतिला तरुण पती कां दिला ?
जरठ वयानें असता स्मर तर, असता पति कां स्मरला ?
दशमुखगायनीं लुब्ध होउनी, भार्याही त्या दिली !
परि रति सुंदर विगतधवा ती कांतांतरिं राहिली !!
सोडुनि कां मज गेला नाथा, दीन अशी भूवरीं ?
मूर्ति मनोहर पाहूं कोठें ? स्मरणसुरीं अंतरीं !
स्मरणसुरी गे, सुखविसि हृदया, भेदिसि गे त्या परी !
नाथ गडे मी आलें आलें; घ्या हो मज अंतरीं !!

(७)

साकी.

दुमदुमलें जरि कंदर सारें गायनिं, नयन तियेचे
मीलन पावति, राष्ट्रद्रय जणुं भूवरिं या प्राचीचें ! ७३
अंतरिं पावे कांतसंगमें प्रेमसुखा ती बाला !
वदनीं येई पांढुरता परि; दिसे जणूं ती पुतळा ! ७४
मनुजहृदयकरुणेचें कोमल, अंग तदा कवि पाही;
हर्षे भरला, रणीं श्रमित तो पथिक निर्झरें जेंवी ७५

---

१ सद्बुद्धि. २ पतिप्रीति. ३ रीतभात Custom. ४ हा दुष्ट समास होत आहे. परंतु संस्कृत शब्द 'छुरी' हा प्राकृत 'सुरी' च्या पुष्कळांशीं सारखा असल्यामुळें व्यवहारांतलाच शब्द मुद्दाम योजिला.

क्षणभरि हर्षित, परि परदुःखें व्यथित मानसीं झाला
नेइ पदांतें विनित कवीमन ध्यायां सृष्टिरसाला ! ७६

सृष्टिरसस्पर्शानें तरुणीनेत्रोन्मीलन झालें
गुरुदृष्टिरसस्पर्शें वाटे छात्रांतर जणुं फुललें ! ७७

पर पुरुषाचें दर्शन होतां, मुख झांकी पदरानें,
परि कविरम्याकृतिनें केलें स्थित तिजला विनयानें ७८

" क्षमा करावी " कवि तिज वदला " होतों पाहत राना,"
वास कुठें तव ? नेतों तेथें; शक्ति न तव गात्रांना." ७९

" शीतलशृंगीं[1] उटजा अमुची; स्वागत ध्या गरिबांचें !
क्षमा करावी धीटपणाची; मोल न उपकाराचें !" ८०

## खंड २

तटिनितरंगीं तरल तरी ती नर्तन करि तोऱ्यानें !
सुवर्णभारा वाहुनि जैसें आरमार मोदानें ! १

वाचा असती त्या नौकेला, असतें कार्या केलें;
वनदेवीच्या गुप्त[2] गुणांचें असतें वर्णन झालें. २

परि वनदेवीसखयें दिधलें पूर्णमनातें आतां;
निबिडकुंजयुत वायुलतांनीं मोहविलें तच्चित्ता ! ३

---

१ विंध्याद्रीचे दुसरें एक शिखर. २ अज्ञात.

कोमलपल्लवयुत वेलींनीं आत्मसखा निवडोनी
मुदित मनानें तनु त्या दिधली; नेली कविमति हरुनी ! ४
लता माधवी वरि आम्राला; जुईसखी ती शिरिषा;
पुन्नागा ती नागलता नगिं वरि; नमवी शिर ईशा ! ५
चंदनवृक्षा प्रेमें कवळी रसभरिता वासंती;
उरगस्त्री परि येतां जवळी, गाळी मधु ती सवती ! ६
वायुल्लतेनें गोकर्णीशीं गुज करुनी एकांतीं,
मोहित केला चंपक नृत्यें; झाल्या भगिनी सवती ! ७
तनुमन दिधलें सर्व लतांहीं; तोपविलें तरुंनींही;
तरुवर परि तो चिंति कसा मी मुदित करूं तरुणी ही ? ८
कोकिल निजला, मयूर रुसला; हंसहि दूर उडाला;
सखिमन, रंजित काय करिल ही चिंता आम्रमनाला ! ९
सखिसौंदर्यें स्मरुनि शशीला, तत्साह्या कळवळला !
काममदें त्या क्लिष्ट बघोनी नैराश्यें हळहळला ! १०
विनयवती माधवी लता ती भृंगततीही निजवी;
चिंता वाढवुनी वृक्षाची, प्रेमनिराशा दुणवी ! ११
नैराश्यें तो व्याकुल झाला, प्रेमें तत्सखि हांसे;
तैं कवि गाई वेणुरवानें; रसालमन उल्हासे ! १२
गाढालिंगन वल्ली वृक्षा, वृक्ष मंजरी कविला,
कवि तिज देई कर्णस्थाना; वाला बघत जळाला ! १३

वन्य वधूवर रंजित करितीं प्रेमें मन अपुलालें;
कविमन मंजरि, सलिल सखीमन ओढी ऐशा काले, १४
वाचा जरि तिज नाहीं, तरि ती अम्बुवाहिनी थांबे,
जणूं वोलण्यां " बघ ही शोभा कवे, तशी तूं अंबे ! १५
गिरिशिखरें हीं धवल पहा ! तीं कांहीं नील छटेचीं !
चंद्रें दिधली धवल कांति यां; ती द्युति गोकर्णाची ! १६
आतां बघ हीं पीत छबीचीं ! तिकडे हरितहि कांहीं !
पुष्पपरागें पिंवळीं केलीं; पीतनील छाया ही !" १७
धवल नील, पिंवळीं गिरिशिखरें मोहवितीं त्या कविला !
परि मनिं नैराश्यें तो त्यांतुनि काढी या सार्थाला, १८
पीत नगांतुनि पिंवळीं कुसुमें, नीलहि नीलांमधुनी,
धवलांतुनि हीं धवल, श्यामल जलिं येतीं फिरफिरुनी! १९
परि फिरतीं हीं सारीं गरगर येतां या आवर्तीं !
अंतीं कुसकरलीं जातीं ! हा ! हीच मनुजसुखरीति ! ! २०
कविच्या नैराश्यांत जणूं मग टांकाया भर नौका
वदली पुढती—अथवा आली तैसिच तीरश्री कां ? २१
" जलौघ वळला; शांत जाहला; थांब सख्या, बघ नेतें,
सृष्टिसतीच्या श्रेष्ठ भूपर्णीं; तेथें मन वावरतें ! २२
चलित नको परि असा मानसीं होऊं कविराया रे,
कृष्णवर्ण गिरिशैलें, त्यांहीं इंदु झांकिला तोरें ! २३

हं, हं, बाळा ! भीसि कशाला; धीटपणें रे हांकीं !
तिमिरपुंज हा जणुं कज्जलयुत नीच मनाची बाकी ! २४
मोहित होसी ! हर हर ! गुंगित मति तव कां कविराया ?
आहे तिमिरारंभ सख्या हा ! कैसा तरशिल माया ? २५
काय सख्या हें ! होती पडली बाला ही जलिं आतां !
चित्त कुणीं तव नेलें ? कोठें ? थिजति नेत्र तव ताता !" २६

(२)

हरहर ! निद्रावश झाला कवि; भान लयाला गेलें !
परि बालास्पर्शानें नेत्रोन्मीलन अचिरात् झालें ! २७
गेलीं सगळीं पर्वततुंगें; विरघळली ती माया !
दिसल्या उटजा दो त्या रानीं कविमनही मोहायां ! २८
व्यग्र मनानें कविनें त्या, परि, बोधियलें बालेला;
"गिरिकंदरिं त्या घडलें तें मज कथिं, करिं उपकाराला!" २९
"गुंगित अपुली मति कंदरिं त्या कांतें वधिली कांता !"
मंत्रें शोधी पति अपुला जरि, अंत न कोठें ध्वांता ! ३०
भिल्लें कथिलें 'निशासमयीं ती पोतें कंदर शोधी' !
मृण्मयमूर्ती ते स्त्री गणिती, मंत्रा निर्झरनादीं ! ३१
धवल चंद्रिका करिते सुंदर अंतर गिरिकुहराचें;
अज्ञानें ते करिती कौतुक कांतासामर्थ्याचें ! ३२

---

१ टेंभ्यानें.

कथिलें नच मी प्रथम ह्मणोनी क्षमा करावी मजला !
स्वीकारावें स्वागत; झाला श्रमित वघुनि वनलीला !" ३३

(३)

बांधी वकुला नौका वाला; कवि तीरांतें पाही;
हरित तृणानें भूषित भूमी; मार्ग दिसे न कुठेंही; ३४

आश्रम दिसतो, मार्ग न गमतो, वाला दावि पथातें;
कवि बोले तैं 'भासे मन्मनिं पथ तव सुपदाघातें !' ३५

हास्यमुखानें घेउनि वाला वळसे पदमार्गाचे,
नेई कवीस निर्झरतीरीं; स्थान पूर्ण शांतीचें ! ३४

गुंजलतांनीं वेष्टित अवनी; वनिं चेष्टे ज्योत्स्ना ती !
ज्योत्स्ना स्रविते प्रेमरसाते; प्रेम द्रवते शांति !! ३७

चातककंठीं मेघविंदु तशि कव्यंतरिं वनदेवी !
तन्मय कवीस पाहुनि वाला, कुंजिं शिलासन सेवी ! ३८

शांती सुखवी कवीस; दुःखित करी परी वालेला !
करुनी गतवैभवस्मरण ती[1] जैसी भरतमहीला ! ३९

नील शिलेवरि वाला वसतां येई एक कुरंगी;
स्वस्थमनें ग्रीवा ती ठेवी तरुण्यंकिं चित्रांगी ! ४०

---

१ शांति.

लोचनिं ओतुनि प्रेमरसाते हरिणी हरिणाक्षीला,
वदे जणूं 'गे उत्साहा घे; स्थान न दे शोकाला !' ४१
भगिनिमनाला सुखवायां ती बाला किंचित हांसे;
मुदित कुरंगी नाहीं जाणत ती हांस्याला हांसे ! ४२
परि युवतीचें दुःख निवालें किंचित, कवि जें वदला;
"बाले, लहरी अनिलाच्या या शमाविति भग्न मनाला ! ४३
नच कां सुंदर देश, समानहि श्रीमान् पुष्पतरूंनीं ?
तव रम्याश्रम दूरवरीं तरि टांकी मन्माति भुलुनी ! ४४
मयूरसेवित, बहुकंदर ते उंच गिरी बघ नेत्र
रिझविति, जणुं कीं चित्ताल्हादद रविवर्म्याचें चित्र ! ४५
तथा रौप्य कीं सुवर्ण अथवा ताम्रवर्ण तरुकांति
घेउनि मज ते; भासविती कीं चित्रित गज या प्रांतीं ! ४६
सालतालखर्जूरतरूंनीं तिवसपनसवृक्षांनीं;
कदम्बपुन्नागांनीं, जातीं गिऱ्यंगें बघ खुलुनी ! ४७
केतक, चम्पक, तिलक, अशोकहि जाती आम्रीं मिळुनी !
गुल्मलतावृत पुष्पित त्यांचीं अंगें गिरि धरि भुलुनी !! ४८
स्यंदन, चंदन पळस, खदिर, धव, ओट, सावई, लोध्र;
किंशुक, पाटल महिवरि पाडिति छाया, जैसें अभ्र ! ४९
बाले, सुस्थल खगमृगसेवित पुण्य रम्य हें शांत,
वनशोभेनें, जलशोभेनें, देतें सौख्य नितांत ! ५०

इथुनि दिसे बघ, पुष्पशोभिता स्तब्ध नर्मदासरिता;
वाटे झाली मूर्त कवीची प्रतिभा येथ अमूर्ता ! ५१
पिकसारसचंडोलनादिता, अलिकुलभ्रांतस्फीता,
जरि अतिदूरा मृगयूथांनीं भासे सन्निध सरिता ! ५२
कोमल कुसुमें वकुळींचीं मधु गाळिति जलिं–तें हांसे;
असेल परि कां ज्ञात तयांना मन अमुचें उल्हासे ? ५३
पारीजातकसुवर्णचंपकजुईवृष्टि निर्झरिं या;
म्हणुनी वाटे गायन करितो मोदानें मर्मरिं हा ! ५४
मर्मरनादें पक्षीगण हा वाटे जागा झाला !
कूजित परिसुनि देइल कोणी जागा नच शोकाला ! ५५
भारद्वाजें दावियली बघ पक्षश्री अरुणाला !
कनककांतिनें अंबर भरि तो; जाऊं या उटजाला !" ५६
" शांते, जाई " बाला वदली " त्वां जल घेउनि यावें !
शांतोटजिं गे, दुर्मुख कधिंही अतिथीनें न रहावें !" ५७
भगिनीअंकांमधुनी हरिणी कविमुख मग अवलोकी;
फिरुनी बघुनी स्वसेकडे, ती घेइ उड्या स्वर्लोकीं ! ५८
मनुजपशुप्रेमातें बघुनी निघे कवीवच कांहीं,
" प्रीती आकर्षी प्रीतीला; देह असो कसलाही !" ५९
कवि वदला बालेला पुढती " मुदित मृगी बघुनी ही,
स्मृति मज होते प्रेमाच्या मम ठाव्याची लवलाही; ६०

अधिक आवडे ज्ञानरहित ही निष्कपटी मृगयोनी
मनुजांहुनि; ते अंतरिं ठेविति विष, मधु ओष्ठांमधुनी ! ६१

शांता हरिणी तव भगिनी; तूं शांता असशी शांता !
होती हरिणी मम भगिनी मज बंधु, तातही माता ! ! ६२

ज्ञानवंत मी मनुज, परी मृग शिकवी प्रीती याला !
नातें राहिल तेथें कैसें स्थान जिथें न कुडीला ? ६३

निर्घृण काळें ओढियला परि आधार प्रेमाचा;
प्राणघातका ! कसा अवडला तोच बळी तुज साचा ? ६४

बलवान्, धीमान्, मग कां केला हात असा व्याधाचा ?
सर्वांतरिं जें पाहूं लागत होतों पथ समतेचा ? ६५

निर्दय मनुजें हांकिलें ह्मणुनी रानीं होतों आलों;
त्या मनुजाच्या हृदयिं पहायां प्रेमा मग मी गेलों; ६६

हृदय रितें ! परि मूर्ध्नीं त्याच्या बुद्धि प्रखरतरा ती
तळपुनि, होती करवित हस्तें प्राणघात दिनरात्रीं ! ६७

घाता कारण हस्ततलाघृत भूमिभाग गे झाला !
हरहर ! मनुजा उपदेशें तो संत पिसा ना ठरला ? ६८

दैवानें कीं पथिकाला रणिं जलबिंदुहि गवसेल;
परि मनुजाच्या हृदया आतां कोमलता न शिवेल ! ६९

संत पिसा तो ठरला बघुनी आलों पुनरपि वनिं या;
प्रीतिस्थाना द्वेष परी घे—भो मृत्यो ! हरिं "काया !" ७०

(४)

गुंजारव जरि भृंग करी त्या मंगलदायक कालीं
सुखमति असुनी अपुल्या दुःखें दोघें व्याकुल झालीं ! ७१

चंडोलाचें मंडल फिरवी ज्ञानचक्र त्या कविचें !
परि बालेच्या हृदया पिळुनी काढी रव शोकाचे !! ७२

मंजरिचूर्णें अंतर झालें भग्न पुन्हां त्या कविचें !
परि शांतेच्या अंतरचूर्णीं चूर्णित मन नाथाचें !! ७३

चंदनकाठिन्यें कवि काढी स्मृति मानवहृदयाची !
तत्सौगंधें बाला अठवी प्रीती कांतांतरिंची !! ७४

नागलतेनें कवि मनिं मोजी गति वक्रा मनुजाची !
अंतरिं पाही परि ती बाला कोमलता कांताची !! ७५

श्रवणसुखागर जलनादहि तो ' सूड ' शब्द कविकर्णीं !
परि बालेच्या पतिगुणलोलुपकर्णीं प्रेमा वर्णी !! ७६

रविबिंबीं त्या युवका दिसलें रक्त मनुजनयनांचें !
कोमल युवती तेथें पाही प्रेम नाथनेत्रांचें !! ७७

कविस भासती वायूलहरी जणुं फणिवरफूत्कार !
शांतेला त्या शांतविती क्षण, जणुं भक्ता ॐकार !! ७८

वनदेवीही कवीस भासे भीषण काल्यवतार !
परि शांतेला दुखवी निर्मुनि कांतस्मृतिसुविचार !! ७९

आलें नयनीं उचंबळोनी द्वेषगरळ तें सगळें !
शोकें शांता अधोवदन, तें विष तिजवरही गळलें !! ८०

दृष्टीपातें कविवर जणुं कां विद्युत्पातहि झाला !
गरल निवालें; नयनहि वळले आश्चर्यें मनिं वदला !! ८१

" संचरलें हें एकाकीं मनिं काय ?–मला नच कळतें !
मनिं होता ना द्वेष ? असें मग कां स्नेहें उळमळतें ? " ८२

अपुली कांता कांत; ईश वा भक्त; बाळ देशातें,
तैसा कवीहि निश्चय नयनें बघे पुन्हां बालेतें. ८३

" द्वेषाचें हें नाहीं दुसरें अंग खास; " कवि वदला
" आहे शुद्धा प्रीति ! तिचा परि उगम कुठें तो झाला ? ८४

वळलें मन कां स्त्रीदेहानें ? मन्मति सरलतरा ही !
मनुजतनूचा द्रष्टा देहें चळतां, वळते मतिही ! ८५

तरुणीचें मन ओढी कां मज लुब्धक मृग जणुं रानीं ?
हरण्यां चेतोहरिणा कोणा बल प्रियेवांचूनी ? " ८६

(५)

भार्यास्मृतिनें कविमन वळलें; नेलें वनदेवीनें;
" बाले शांते, काय मौज ही ! " बोले कवि शांतीनें; ८७

जिकडे वळते दृष्टी तिकडे युग्म मला वनिं दिसतें !
बालरवी तो; उषा सती त्या प्रेमें चुंबन देते !! ८८

माधवीस बघ त्या आम्रानें स्थल अंगावरि दिधलें !
क्रूर तरी हा सर्पहि भार्या कवटाळी वेटाळें !! ८९
कोमल दुर्वांकुर हा घाली शश प्रियेच्या वदनीं !
मंगलकालीं ऐशा सेविल नच कां तरुणा तरुणी ? ९०
परिसुनि कविवच, अंतरिं होई दाह तिच्या देहाचा !
अतिथीभावें परि बोले ती शांत अशी ही वाचा, ९१
" जिकडे वळते दृष्टी तिकडे बंधुभाव मज गमतो !
बालरवी तो उषास्वसेशीं प्रेमें हितगुज करितो ! ! ९२
आम्रानें, मज गमे लतेला, बंध्वाश्रय हो दिधला !
बहु दिवसांची भेट असे ती सर्पिणिची भावाला ! ! ९३
भगिनी अर्भक ह्मणुनी घाली, सस्य शशक तो वदनीं !
मंगलकालीं नच सत्कारिल भावाला कां भगिनी ? " ९४
कविवदनीं नच किंचित अंतर घडलें आपुल्या वचनीं;
पाहुनि ऐसें शांता वदली ' व्याप्त न हे ढोंगांनीं ! ' ९५
मग नेउनि उटजांत तियेनें, निर्मल मधु उदकानें;
फलपुष्पांनीं स्वागत केलें कविचें शुद्ध मनानें ! ९६
" बाले, केलें स्वागत माझें; अतिथी सत्कारीला;
परि मनिं दुःखें ठेउनि आजीं अतिथी झिडकारीला ! ९७
फलाशनें कीं कुसुमसुवासें मम मन शांत न होतें;
आतीथेया संकटिं सोडुनि, अतिथी घे पतनातें ! ९८

दुःख निवेदन करिं; बाले, तुज मनुजें छळिलें कां गे ?
मद्‌हृदयासम हृदय तुझेंही द्वेषें जळुं कां लागे ? ९९

थवा प्रीतीं शोधित रानीं फिरसी कैं पासूनी ?
दृष्टि निश्चला, शांति निश्चिता, कथिति जन्म तव रानीं ! १००
मानवचेतोमल दूषित नच चित्त तुझें गे शांते !
मानव नच तूं; वनदेवी; कां शोकें मग हळहळते ? १
अथवा व्याधें वेधियला कां थारा त्वत्प्रेमाचा ?
द्रव्यमदें वा तव तनुलोभें घात तुझ्या कांताचा ?" २

(६)

आली नयनीं उचंबळोनी कांतस्मृति ती सारी !
परि परदर्शनिं अधोवदन ती होउनि अश्रू सारी ! ३
गिळिलें सगळें दुःख स्त्रीनें; मृदु वचनें मग वदतें;
"तप्त मनाला शांत करावें; कथिन उद्यां दुःखांतें. ४
मनुजद्वेष्टे ! परि ही मनुजा; मनुजकाय अपुलाही;
शोकें विव्हल जरि ही, येथें द्वेषा स्थान न कांहीं. ५
सोडावा तो द्वेषहि; घ्यावा शशक-पहा सुकुमार !
दावावी या उटजा तैसें, बाला, सरितातीर !" ६
शांता हरिणी बघे सखीला, पाही कविवदनाला;
घेई आश्रय कविचा; टांकुनि विस्मयांत भगिनीला ! ७

" शांते ! शांते ! जासि कुठें गे ? कार्य असे शशकाचें !"
परि सोडीना कवीस हरिणी ! अंधत्व प्रेमाचें ! ८

" सखीस कां गे सोडिसि शांते ? " प्रेमें कवि गहिंवरला !
" द्वेषाची ही मूर्ति; असे तो प्रीतीचा गे पुतळा !! " ९

हरिणाग्रह मग नेई काविला अतिथीभुवानिं तटाकीं;
हरिणीप्रेमें द्वेषहि गळला; कळला नच दिन बाकी ! ११०

## खंड ३.

वरुणप्रांतीं अरुणसखा, जैं, तैं कवि त्या गिरिकुहरीं
उत्सुकतेनें गेला; हरिणी उचलि तयाच्या लहरी ! १

कृष्णवर्णगिरिकुहरमुखाशीं जातां कवि तिज वदला;
" ये शांते, या हृदयाजवळीं; धरिं न भीति लेशाला ! " २

उचली प्रेमें कोमल हरिणी; चुंबी तिज जणुं भगिनी;
हृदयाशीं मग अवळी; नयनीं प्रेम येई तें फुटुनी ! ३

' मृण्मयमूर्ती पाहिन आतां ' वदुनि आंत पद टांकी;
झाला तिमिरारंभ; तिमिर परि हरिणीप्रेम न झांकी ! ४

हरिणी नच ती, प्रेमदीप तो अंतरिं त्याला गमला !
तत्तेजें मग गेला जेथें मार्गा शेवट झाला. ५

नाहीं मृण्मय, रजतमया कीं पुतळी सुवर्णमयही !
काळे प्रस्तर घेति न तेथें निश्चित आकारांही ! ६

एकावरती दुसरा बसला; तिसरा गेला मागे;
जन्मकुब्ज तो चवथा, कविचें भान न तेथें लागे ! ७
कविहास्यानें चिडुनि पांचवा उपलहि दावी भीतिं !
विन्मुख ह्मणुनि न कवीस दिसली अन्याक्षितिसुतरीती !! ८
संत खलें, मायेनें ज्ञानी, देशभक्त दुष्टांनीं
तैसा दिनमणि मृदांचयांनीं टाकियला झांकोनी ! ९
नैराश्यें मग घेइ पदांतें मागे; परि ती हरिणी,
पाहुनि कोमल एक लता, तिज घेई मुख पसरोनी. १०
चांडालांतरिं दया तशी ती लता उपलशकलांत
भासे कविला; आश्चर्यें मग तिजजवळीं तो जात. ११
शांतेनें तिज ओढियलें तों थबके कवि भीतीनें !
कांताचें ती कांताछाया हृदय भेदि मोदानें !! १२
झटकन सारुनि दूर लता ती, कवि तिकडे मग गेला;
तत्पद पडतां पालटली परि एकाकीं वनलीला ! १३
कांता झाली मृण्मयमूर्ती ! गुप्तप्रवाह कांत !
इंदुकिरण तें एकच दिसलें, भाला पतिहृदयांत ! १४
प्रस्तर मूर्ति, प्रवाह भर्ता, किरणहि भाला झाला !
मग कविभीतिहि आश्चर्याच्या कां नच घे स्थानाला ? १५
एक एक ते आले सगळे चंद्रकिरण कुहरांत;
कुहरांतच कां ? गेले आतां शांत कवीहृदयांत ! १६

"नच कां हा गिरि मी? माझें कां नच अंतर गिरिकुहर?
नच कां शांता धवल चंद्रिका? मग कां ही हुरहूर? १७

असेल तरुणी कां मम भार्या? मृगजळ तें मज गमतें!
मानस कथितें 'आहे, आहे;' 'मृत झाली' जग वदतें! १८

मम विरहें मज तटिनीतळिं ती गेली शोधायाला,
वदले सारे आप्तहि ऐसें; कशी धरिल कायेला? १९

परि शांतामुख देतें मजला स्मृति जायावदनाची!
तीच दृष्टि, ती तीच गतीही होती प्राणसखीची! २०

किंवा तीही या जड देहासम असेल जळिं तरली?
ज्यानें तारियला तरु त्यानें वल्हि न कां वरि धरिली? २१

अथवा केलें असत्य भाषण मम भोंदू मित्रांनीं?
द्रव्यमिषें कीं तत्तनुलोभें मज हकिलें या रानीं? २२

धनाभिलाषें असेल; परि ही कांतारीं कां आली?
कधिंहि न घडला संग आमुचा; प्रेम कुठें मग शिकली? २३

बालपणींच्या स्मृतिनें तगलें प्रेम कसें भार्येचें?
परि नच शांता अर्धांगी मम!—वेड वरें ज्ञानाचें! २४

परि बालेचें दुःखनिवेदन करील निश्चय मनिंचा;
पत्नी नच तर भगिनी मानिन; करिन जय ज्ञानाचा!" २५

(२)

करिन-जय ज्ञानाचा ऐसें बोलुनि कवि जरि गेला,
तरि ‘ शांता–मम कांता–धन–तनु–मित्र ’ हीच मनिं माला !

पळ गेले दो घटीहि सरल्या; प्रहर हरी कालातें;
सरिताही दे बोधातें; परि कविमानस नच तेथें ! २७

गिरिकंदरिं ते इंदुमयूखहि आले तैसे गेले;
परि मित्रद्वय पाहुनि, चंद्रें दोन किरण ठेवियले. २८

कविकिरणहि तो जात चालला; कुहरीं तिमिरहि पसरे;
तरि नच सोडी विचारमाला–माला तिमिरीं न सरे ! २९

आतां एकच विधुकर साऱ्या कंदरांतरीं विलसे;
शिला शिला परि मोजी तोही–कविमनिं-पत्नी विलसे ! ३०

होता भित्तीवर दूरहि परि येइ अतां भूवरतीं;
किरणवर्जिता शिला तमाची ! खलरीतिच ही जगतीं ! ३१

तरिहि न कविमन सोडी पत्नी; स्तब्धतरा मृगिही ती;
पाहुनि ऐसें वनदेवी करि, कविजागृत्यर्थ मति ! ३२

पडतां विधुकर भूवरिं शुभ्रा दृशदेवरि धारेच्या,
होइ गुहा ती मयुखमया–कवि सोडी स्मृति पत्नीच्या ! ३३

कुहरिं चांदवा चमके ! तारे सान थोर लुकलुकती !
बिंबप्रतिबिंबांतें बघती निर्झरजलिं एकांतीं ! ३४

चेटकि सृष्टि क्षणभर निर्मी किरणयुक्त तत्क्षणीं !
परि कवि जातां आलिंगायां, टांकी तिज विस्कळुनी !! ३५

क्षणभरिं जागृत, परि नैराश्यें कवि मूर्च्छित मग झाला !
वनदेवींची आशा सरली ! सृष्टिविनोदहि फलला !! ३६

परि झाल्या त्या दोघी ज्याच्या शांत अंतरांमधुनी,
त्रिगुण जयानें जिंकियले, ये योगिराज त्या स्थानीं. ३७

वृद्ध असे तो; काया त्याची वार्धक्यें जरि वळलीं;
मानसदमनीं रत त्या स्वेच्छें काया नच कां वळली ? ३८

कविमुखिं घालुनि निर्झरजल, त्या शिखरावरि मग नेलें;
"वत्सा ! रे मधु !" वाहियलें "मम, कथीं स्मरण कां झालें ?" ३९

नामें होउनि सावध मधुनें नेत्रोन्मीलन केलें;
योगिवरातें अवलोकुनि तें प्रेमें चरणां धरिलें ४०

"ऊठ, ऊठ, रे वत्सा ! धरुं दे प्रेमें तुज हृदयाला !
बहु दिवसांची भेट असे ही; चुंबूं दे बाळाला !!" ४१

कवी कोणता समर्थ गाया गुरुशिष्यांचा मोद ?
असेल तर त्या हेंच सांगणें 'गुरुशिष्यीं न च भेद !' ४२

[३]

कविहृदयाब्धिप्रेमोर्मी त्या किंचित कालें शमतां,
"बाळा, आहे कुशल तुझें ना ?" झाला यति मग वदता; ४३

"ईशें केलें पूर्णकाम ना देउनि सौख्य नितांत ?
धरि होती ना इंद्रियदमनीं रति मानसराज्यांत ? ४४
चिंतन ईशाचें केलें ना तुकयासम संसारीं ?
आत्मानंदीं स्वत्री लावुनि केलिस ना नाथसरी ? ४
परमेशाचा प्रियकर बालक ! तूं ज्ञानाचा पुतळा !
मानससर रसयुक्त ह्मणोनी हिंसेनें कळवळला ! ! ४
वैराग्याची मूर्ति सुंदरा ! आनंदाचें स्थान ?
नवल न कांतारीं जर आला घेउनि अपुला प्राण !" ४
"गुरुजी ! गुरुजी ! पापी आत्मा हा ! घ्या या हस्तांत !
कुठलें इंद्रियदमन ? कुठें ती भक्ति नीच हृदयांत ? ४
असेन कुठला प्रियकर बालक ? मी द्वेषाचा पुतळा !
द्वेषविषें हा मनुजसृष्टीसंहारीं रत झाला ! ! ४
पापांची ही मूर्ति भेसुरा ! चिंतेचें हें स्थान !
नवल न कांतारीं जर आलों घ्यायां अपुला प्राण ! ! ५
"वत्सा, करिसी मिथ्या भाषण कां रे, तूं मजपाशीं ?
बीज तसा कां वृक्ष न होइल भेदुनियां खडकांसी ?" ५
"बीज पेरिलें; भेदित आलें कामप्रस्तर राशी ?
सेंचन झालें द्वेषाचें परि; फललें तें अघराशी !
गुरो दयाघन ! करीं दृष्टि ! हा द्वेषदवानल विझवीं ! ५
कारुण्याचा सागर—अथवा स्तुति हीनें न करावी " ! ५

कारुण्याचा सागर तो यति.मधुमुख मग अवलोकी;
दृष्टि जरी ती वृद्धपणींची, स्मृतीस नच तरि झांकी ! ५४

यति चिंती " मज ठावी आतां तळमळ या जीवांची;
–शांते ! पाहिन भालीं शोभा आतां मी तिलकाची ! ५५

जाणत नाहीं अज्ञानें हीं सामर्थ्य स्वात्म्याचें !
दैव कुणाचें कोमल वयिं या दुःखें भोगायाचें ? ५६

ज्ञानांशें हा द्वेषोद्भव; या अगद प्रेमजलाचें !
कांतासंगमजल मज वाटे येथ असे कामाचें ! ५७

भार्याप्रेमें भावकुसुमही उमलेलच मग याचें !
परि मनिं येती तर्क असे कां प्रीतिद्लाभावाचें ? ५८

यति मग बोले मधुला " वत्सा, आत्मकथा मज बोधीं !
द्वेषजलानें मद्विज कोणी नासियलें, कथिं आधीं ? ५९

"नच कोणाचा दोष; वसो तें अद्य माथीं माझ्या–ची ?
शांति खजिली नसती–अथवा स्थिति कथितों मन्मनिंची." ६०

" प्रातःकाळीं त्यादिनिं पदयुग वंदुनि उटजा त्यजिली;
उटजा नच ती, शांतिगेह तें त्यागें शांती गेली ! ६१

दिसतिल परि मज आई, बाबा, दादाही, या भावें
विरहदुःख मी गिळिलें; मन्मन कायेपुढतीं धांवे ! ६२

त्याकाळीं मज झाले नाना शुभशकून मार्गानें;
कां नच होतिल जेथें नाचे सुमुदित मन वेगानें ? ६३

एक शशक हिमबिंदुमौक्तिकें उधळुनि अनुजा भेटे;
मम बंधूही प्रेमें इतुक्या आलिंगिलसें वाटे ! ६४

चुकलें पाडस दिसतां हरिणी गेलि एक धांवोनी;
अशीच, वाटे स्वप्नीं बघुनी, येईल माता धरुनी ! ६५

सुंदर शिशु हृदयीं धरुनी मग येइ गोप मार्गानें;
प्रेमदृष्टि ती, तें चुंबन मज तातांतरिंही मग ने ! ६६

दोप्रहरीं मज गोपांनींही बाहियलें मौजेनें;
मौजेनें ? या नेत्रीं आलें वारि मित्रविरहानें ! ६७

अतिथीभावें सारियलें परि अश्रु बहुत कष्टानें;
दिनकर होतां शांत, पथा मी धरिलें अग्निरथानें ६८

लाल जाहली पश्चिम दिग्वधु कालें रविसंगानें;
सांगे ' भार्या अशीच होइल तव पुनरागमनानें ! ६९

चपलतरा गति अग्निरथापरि मम मानसचक्राची !
जनकामागें जननी येई; स्थीर न गति जायेची ! ७०

गृह ये जवळीं तैसा भासे दीर्घ मार्ग तो मजला;
पवनगतीनें धांवे रथ तो; कालें मग तट दिसला. ७१

नगरतटाच्या दर्शनिं मम तनु रोमांचित बहु झाली !
नेत्रदृष्टि नी गात्रगतीही स्थिर झाली; नच ढळली ! ७२

अंतर हें मग पिऊं लागलें जन्मभूमिची प्रीति !
नवल जाहलें, प्राणसखा मम मित्र दिसे सीमंतीं ! ७३

भूमाता कां प्रीत जहाली ? सुकृतहि उदया आलें ?
मूर्तिमंत कां प्रेम उदेलें ? सुदैव कां फळफळलें ? ७४
अथवा आलें नदिगर्भांतुनि सखयाचें हें भूत ?
कीं हें आहे स्वरूप माझ्या उत्कंठेचें मूर्त ? ७५
कांहिं असो तें, असो कसेंही, तद्बाहूंवरि बाहू
पडलें मम—तें ढोंग तयाचें गुरुजी कैसें साहूं ? ७६
प्रेम असे कां गुरुजी, सांगा या भूतालिं ? मज न दिसे ?
प्रेम जयाला तुह्मी वदतां, द्वेषाचें अंग असे ! !" ७७

५

उसळे मनुजद्वेष मधूचा पुनरपि पूर्वस्मृतिनें;
परि यतिसान्निध्यें तो दबके, उरग जसा मंत्रानें ! ७८
"ठावें, गुरुजी, दिधलें होतें दत्तक मज जनकानें;
श्रीमान्, धीमान्, जनक दुजा तो; परि पीडित कामानें! ७९
जर्जर जरि तो वार्धक्यानें, तरुणी हो नाडियली !
धनाभिलाषें चपल नागिणी मत्प्राणांवर बसली ! ८०
'दत्तक घेइन तुजला' ऐशा अभिवचनें मित्राचें,
मोहविलें मन; त्याकरवीं मज तळ दिधलें डोहाचें ! ८१
दीनदयाघन, करुणासागर हा नसता जर वळला,
नच ठावी मग गती कोणती मिळती या आत्म्याला? ८२

परि नच ठावें मज त्यांचें तें संगनमत त्याकालीं;
नवल काय काया मी प्रेमें नागाची कवटळली ? ८३

मम जीवं परि अंतरिं होई दाह सखादेहाचा !
कोमल मन्मन जाणुनि नीचें घाव घातला साचा; ८४

'जनकद्वय तुज सोडुनि गेलें; माय तुझीही गेली;
सख्या, मनींचें प्रेम सांगतें, भार्या तुज अंतरली !' ८५

आघातानें इतुक्या शमली तळमळ नच दुष्टाची;
कथी नीच तो ' शांति धरीं रे ' तीच गती सकलांची ! ८६

जेष्ठ वंधु तव धरिल तुझ्यावरि छत्र तुझ्या पितरांचें;
जायाविरहा कधीं न मानीं; स्थल होतें पापांचें ! ८७

संशयभाला भोंसकुनी, तो मित्रारी मग गेला;
चित्र कुठें तें सौख्यांचें ? हें झालें काय दयाला ? ८८

अशनिपात वृक्षा, मज तैसा वार्ताघात जहाला !
मूर्च्छित किति दिन दुर्दैवी हा, स्मृति नच या बुद्धीला ? ८९

(६)

"दिनावधीनें बुद्धिस्थिरता होतां, नयनहि फुलले;
परी सहोदरदर्शन मिळतां हर्ष पुनरपि मिटलें ! ९०

दादानें परि सावध केलें प्रेमें कुरवाळून;
होउनि वश मम उत्कंठेला केलें हें गृहकथन; ९१

‘ बाळा त्वां नच दुःखित व्हावें बाबांच्या विरहानें;
स्वर्गलोकिं ते जायाविरहें गेले वार्धक्यानें;’ ९२

‘ परि मातेनें सोडियलें कां, कथिं रे बंधो, अपणां ?
सत्य न लपवीं; या पाप्याच्या विरहें ती गेली ना ? ९३

हा ! हा ! दैवा ! मोहविलें कां मुनिकुटींत दुष्टाला ?
अंतर्ज्ञानें नच कां कळलें जननीमरण यतीला ? ९४

“ शांति धरीं रे मधु, नच देई दोष कुणा संताला !
तव मित्राचें कपट असे ते, परिस; वरीं शांतीला ! ९५

धनपुंगीनें वसंत–अहि तो मोहवि गारुडिणी ती !
नागानें, तव दिधली जनका, हलाहलें मग मुक्ति ! ९६

परि नीचांनीं सहज घेतला बळी तुझ्या प्राणांचा;
बळी कसा परि समजूं आतां ?–बळीच आतां साचा ! ९७

राजगृहीं परि कधीं न जावें धन अपुलें घ्यायाला;
भूपति नच तो; भूप्राणांचा शोषक खचित जहाला; ९८

पाखांडी तो धर्मपारखा, नीतिभ्रष्टहि झाला;
कां नच व्हावें, मित्र तुझा जर मंत्रि तयाचा असला ? ९९

चेतवुनी नृपकामाग्नी, मग प्रजायुवत्याहूती
फेंकुनि, अनीतिहोम करी तो अधम, अरेरे ! जगतीं ! १००

---

१ पुंगी (प्राकृत)=एक वाद्य; संस्कृत (पुंगी)=राशि; २ कायद्यानें

तो खल, तो वलपति मग आला एक दिनीं गृहिं अपुल्या;
पाहुनि युवतीवर्गच करि वच मृदु अंतर भेदाया;

'राजाज्ञेनें आलों न्यायां बटीक ती मधुजाया;
मारियला मधु या वीरानें ! आशा आतां वाया !

जननीहृदयस्फोट जाहला ! तव जाया वनिं गेली !
भार्याविरहें जनकहि गेला ! प्रतिकृतिमति मम झाली !

परि राजानुज शरण पदीं ये नृपत्यसू मागायां;
बावांचें तें दान असे रे, शेवटलें जगतीं या !

भूपति राजानुज मज गमती शंभू राजाराम;
कळे न एकच कंठीं कैसें विष तैसें हरिनाम ?

त्या साधूनें पाठविले, तव भार्या बघण्यां हेर;
देउनि आश्वासन मग तिजला दाखविलें माहेर.

दोन मास नच गेले याला, तों वार्ता मज कळली,
मम मधुची ती अर्धांगी त्या जलिं शोधायां गेली !

त्वच्छ्वशुरें मज बोधियलें, ती अपघातानें बुडली;
जग वदतें, तव विरहें होती वेडीही ती झाली !

जावें त्वां नच आतां कोठें; द्रव्याशा सोडावी;
पितरवियोगा विसरावें; ती अधमस्मृति न करावी;



शांति न मनिंची सोडावी; तें जनकदान मानावें;
१मातेला दुजि सून करावी; बंधुहृदय सुखवावें.'     ११०

७

''बंधुवचन हें परिसुनि, दो दिन दुःखें मी हळहळलों !
२तिसरे दिवशीं प्रातःकालीं, वंदुनि त्या, हें वदलों;     ११

'द्यावी माझी माता, देउन दुजी तिला मी सून;
३मातृस्मृति कीं तातदान, तव वचन न अवमानीन.     १२

ंधो, नलगे भार्या याला—भार्या नच मम गेली;
ानकद्वय तें, जननीही नच अपणां सोडुनि गेली;     १३

४ाणावें या अंतरिं वसती; येथ नसे त्यां भीति;
ेप नच येथें; पुत्रविरह कीं अधम मित्र, खलनृपति.     १४

५री पाहिजे गती अंतरीं: वास तया एकांतीं;
नगरत्यागा देइ अनुज्ञा: करूं नये त्वां खंती !     १५

६अधिक गमे मज नागरिकांहुनि संगति कृषीवलांची !
'कुटिल कपटि' हे अंतरिं ठेविति विष; परि वाचा मधुची! १७

७सत्ताधारी, वक्रगती, खल, मनुजरक्तभोक्ता तो
छळिल तुला मत्प्राणांकरितां; पापी अधमाधम तो !'     १७

८

८''अब्दें गेलीं तीन सुखानें कृषिकांच्या सहवासें;
ज्ञात न परि त्यां कोण, कुटिल मी ? मित्राला मृत ऐसें;     १८
९

तो खल, तो वलपति मग आला एक दिनीं गृहिं अपुल्या;
पाहुनि युवतीवर्गच करि वच मृदु अंतर भेदाया; १

‘राजाज्ञेनें आलों न्यायां बटीक ती मधुजाया;
मारियला मधु या वीरानें ! आशा आतां वाया ! २

जननीहृदयस्फोट जाहला ! तव जाया वनिं गेली !
भार्याविरहें जनकहि गेला ! प्रतिकृतिमति मम झाली ! ३

परि राजानुज शरण पदीं ये नृपत्यसू मागायां;
बावांचें तें दान असे रे, शेवटलें जगतीं या ! ४

भूपति राजानुज मज गमती शंभू राजाराम;
कळे न एकच कंठीं कैसें विष तैसें हरिनाम ? ५

त्या साधूनें पाठविले, तव भार्या बघण्यां हेर;
देउनि आश्वासन मग तिजला दाखविलें माहेर. ६

दोन मास नच गेले याला, तों वार्ता मज कळली,
मम मधुची ती अर्धांगी त्या जलिं शोधायां गेली ! ७

त्वच्छ्वशुरें मज बोधियलें, ती अपघातानें बुडली;
जग वदतें, तव विरहें होती वेडीही ती झाली ! ८

जावें त्वां नच आतां कोठें; द्रव्याशा सोडावी;
पितरवियोगा विसरावें; ती अधमस्मृति न करावी; ९



शांति न मनिंची सोडावी; तें जनकदान मानावें;
मातेला दुजि सून करावी; बंधुहृदय सुखवावें.’ ११०

७

“बंधुवचन हें परिसुनि, दो दिन दुःखें मी हळहळलों !
तिसरे दिवशीं प्रातःकालीं, वंदुनि त्या, हें वदलों; ११
‘द्यावी माझी माता, देउन दुजी तिला मी सून;
मातृस्मृति कीं तातदान, तव वचन न अवमानीन. १२
बंधो, नलगे भार्या याला—भार्या नच मम गेली;
जनकद्वय तें, जननीही नच अपणां सोडुनि गेली; १३
जाणावें या अंतरिं वसती; येथ नसे त्यां भीति;
विष नच येथें; पुत्रविरह कीं अधम मित्र, खलनृपति. १४
परी पाहिजे गती अंतरीं: वास तया एकांतीं;
नगरत्यागा देइ अनुज्ञा: करूं नये त्वां खंती ! १५
अधिक गमे मज नागरिकांहुनि संगति कृषीवलांची !
‘कुटिल कपटि’ हे अंतरिं ठेविति विष; परि वाचा मधुची! १७
सत्ताधारी, वक्रगती, खल, मनुजरक्तभोक्ता तो
छळिल तुला मत्प्राणांकरितां; पापी अधमाधम तो !’ १७

८

“अब्दें गेलीं तीन सुखानें कृषिकांच्या सहवासें;
ज्ञात न परि त्यां कोण, कुठिल मी ? मित्राला मृत ऐसें; १८

कवितावधुनें माळ घातली; झाली ती मम जाया;
अदाह्य तिज मी धाडियलें जागें नृपछिद्रें सांगाया ! ११९
दीनोद्धारक, दुर्जनरक्तप्राशिनीच ती रमणी !
अंधसुतांतरभेदक कृष्णा जेंवि पांडवां तरणी !! १२०
'कवि' ह्मणुनी हा ज्ञात शिष्य तव दीन शांत कृषिकांना;
'मधुकर–द्वेषाचा बळि–' ठावे मधुभूपतिबंधूंना; २१
वेणू दिधला एका कृषिकें, बालमृगी दुसऱ्यानें;
मृगी 'मालती' नाम पावली सहजचि कांतास्मृतिनें. २२
मालतीस मी, मला मालती निर्मियली जणुं विधिनें !
त्यांतहि केली ही मृगयोनी अधिकतर प्रेमानें ! २३
गेलों आह्मी एक दिनीं मम कुंजयुक्त गहनांत;
गुंजारव मधुपांचा तेथें सुरगायन हो गात ! २४
निर्मलमधुजलसरोवरांतुनि निघे रम्य तो पाट !
वाटे केशवसुतहृदयांतुनि होई भाव प्रकट !! २५
नाचत ताल सुरावर गातहि जाइ भेटण्यां नादिला !
स्पर्धेनें तो मयूर नाचे; मोद मनाला झाला !! २६
मीनक्रीडा जलीं बघोनी, बगळ्यांचाही दंभ,
रमलें मन हें; गमला मजला त्या अधमांचा दंभ ! २७

१ कै. कृष्णाजी केशव दामले. आधुनिक श्रेष्ठ कवि. २ वसंताचे



तों नभ भरलें दण दण नादें; धूम्राकारहि दिसले;
जलिं मासोळ्या थिजल्या; पक्षी वृक्षांमधुनी गळले ! २८
भेसुर नादें भिल्लांनीं त्या दिला वनाला वेढा;
मोर, ससाणे देति उसासे; त्यजिला त्यांनीं तेढा ! २९
होता खेळत नाग; तसा उडि शशक घेत मौजेनें;
बिळिं दडला तो नाग; शशक परि सोडी असु कष्टानें ! १३०
आली धापा टांकित माझी हरिणी कोमलगात्री;
कोमलगात्री !–हरहर ! देवा, कां न तया घे धात्री ? ३१
क्षणभर पळुनी रानीं, गगनीं प्राणरक्षणाकरितां
घेइ उड्या ती–हरहर ! गेली स्वर्गीं माझ्याकरितां ! ३२
सोडित असतां प्राण, पाहि ती दीन नयन पसरूनी !
खळखळ वाहे पाणी–देवा ! दया न कां तुज अझुनी ? ३३
विचकित, करकर खात दंत, तो मंत्रि तिथें मग आला;
बोले 'अधमा ! अझुनि लाविसी पाय कसे या महिला ? ३४
खेचा ! हाणा ! मारा ! तोडा ! बांधा मुस्कट याचें !
हरामखोरा ! साहस करितो नृपतयम् घ्यायाचें ? ३५
तुझीच कां ही सुंदर, कोमलगात्री चित्रांगी रे ?
भिल्लांनो ! हं ! कांपा इजला ! मधु, घे भुयारवारें !' ३६

९

"किति दिन, किति रात्री, नच ठावे गेल्या बंदीवासीं ?
शांति न ढळली; आनंदें मी वाहियलें मृत्यूसी ! ३७

कवितावधुनें माळ घातली; झाली ती मम जाया;
अदाह्य तिज मी धाडियलें जागें नृपछिद्रें सांगाया ! ११९
दीनोद्धारक, दुर्जनरक्तप्राशिनीच ती रमणी !
अंधसुतांतरभेदक कृष्णा जेंवि पांडवां तरणी !! १२०
'कवि' ह्मणुनी हा ज्ञात शिष्य तव दीन शांत कृपिकांना;
'मधुकर–द्वेषाचा बळि–' ठावे मधुभूपातिवंधूंना; २१
वेणू दिधला एका कृषिकें, बालमृगी दुसऱ्यानें;
मृगी ' मालती ' नाम पावली सहजचि कांतास्मृतिनें. २२
मालतीस मी, मला मालती निर्मियली जणुं विधिनें !
त्यांसहि केली ही मृगयोनी अधिकतर प्रेमानें ! २३
गेलों आह्मी एक दिनीं मम कुंजयुक्त गहनांत;
गुंजारव मधुपांचा तेथें सुरगायन हो गात ! २४
निर्मलमधुजलसरोवरांतुनि निघे रम्य तो पाट !
वाटे केशवसुतंहृदयांतुनि होई भाव प्रकट !! २५
नाचत ताल सुरावर गातहि जाइ भेटण्यां नादिला !
स्पर्धेनें तो मयूर नाचे; मोद मनाला झाला !! २६
मीनक्रीडा जलीं बघोनी, बगळ्यांचाही दंभ,
रमलें मन हें; गमला मजला त्या अधर्मांचा दंभ ! २७

१ कै. कृष्णाजी केशव दामले. आधुनिक श्रेष्ठ कवि. २ वसंताचं



तों नभ भरलें दण दण नादें; धूम्राकाराहि दिसले;
जलिं मासोळ्या थिजल्या; पक्षी वृक्षांमधुनी गळले ! २८
भेसुर नादें भिल्लांनीं त्या दिला वनाला वेढा;
मोर, ससाणे देति उसासे; त्यजिला त्यांनीं तेढा ! २९
होता खेळत नाग; तसा उडि शशक घेत मौजेनं;
बिळिं दडला तो नाग; शशक परि सोडी असु कष्टानें ! १३०
आली धापा टाकित माझी हरिणी कोमलगात्री;
कोमलगात्री !–हरहर ! देवा, कां न तया घे धात्री ? ३१
क्षणभर पळुनी रानीं, गगनीं प्राणरक्षणाकरितां
घेइ उड्या ती–हरहर ! गेली स्वर्गीं माझ्याकरितां ! ३२
सोडित असतां प्राण, पाहि ती दीन नयन पसरूनी !
खळखळ वाहे पाणी–देवा ! दया न कां तुज अझुनी ? ३३
विचकित, करकर खात दंत, तो मंत्रि तिथें मग आला;
बोले ' अधमा ! अझुनि लाविसी पाय कसे या महिला ? ३४
खेचा ! हाणा ! मारा ! तोडा ! बांधा मुस्कट याचें !
हरामखोरा ! साहस करितो नृपत्यमू घ्यायाचें ? ३५
तुझीच कां ही सुंदर, कोमलगात्री चित्रांगी रे ?
भिल्लांनो ! हं ! कांपा इजला ! मधु, घे भुयारवारें !' ३६

९

"किति दिन, किति रात्री, नच ठावे गेल्या बंदीवासीं ?
शांति न ढळली; आनंदें मी वाहियलें मृत्यूसी ! ३७

परि आला तो संत, गुरो, मज तेथुनिही सोडायां;
वदे 'कवे रे ! क्षमा करावी ! जाणावी ही माया !    ३८
ठावे, होता अग्रज मम, तव राजा, शांत सुशील;
क्षोभविला तत्कामाग्नी तव मित्रें, ज्या नच शील.    ३९
येथुनि सोडायां तुज आलों; आश्वासन हें द्यावें;
कधीं न नृपतिप्राणां घ्यावें; स्वात्मा त्या समजावें !'    १४०
'सोडा मजला, नच सोडा वा; असो किती तो पापी;
नृपतिरक्त या हस्तां नलगे ! विधे ! न पापा ओपीं !'    ४१
'मधू क्षमावान् ! धीमान् ! श्रीमान् ! ईशाचा अवतार !
—सहन करीं रे, देतों दुसरा विषमय हृदयीं वार !    ४२
तंतु प्रेमाचा तव तुटला—बंधु स्वर्गीं गेला !
धनामिषें तज्जाया भुलली—विषमय दिधला प्याला !'    ४३

१०

"तिमिराचें तें भुयार, होतें प्रकाशमय परि रान;
तरि नच गणती दिनरात्रींची; हारपलें मम भान !    ४४
मनुजद्वेषें जळली असती ही काया त्या रानीं,
जर नच दिसती व्याळकर्षिता बाला कोमल हरिणी;    ४५
व्याळांतरिं तो वसंत बघुनी पाठविला यमसदना !
हरिणी कोमल अर्भक जरि ती, आणी मम तनुभाना !    ४६

१ मित्र.

हृदयीं धरिली; कधिं न सोडिली; माझी कोमल रमणी;
निर्घृण कालें ओढियलें परि तिज अकरा मासांनीं; ४७

निर्दय मनुजें हंकिलें ह्मणुनी रानीं होतों आलों;
त्या मनुजाच्या हृदयिं पहायां प्रेमा मग मी गेलों; ४८

कर्षक परि मज सांगे मार्गीं ‘ जावें नच त्या प्रांतीं !
मनुजसृष्टिसंहारीं रत मंत्रिबुद्धि दिनरात्रीं ! ४९

घाता कारण हस्ततलाहृत भूमिभाग तो झाला;
उपदेशें नृपबंधु भोगितो कारागृहवासाला !’ १५०

पुनरपि रानीं गेलों; बसलों ईशहेतु समजायां,
ज्ञाना योग्य न देह दुजा कां ? कां प्रिय मानवकाया ? ५१

सुवर्णशृंगीं आली तेव्हां बाला कुंकुमहीन;
अतिथीभावें स्वागत केलें माझें; परि ती दीन !” ५२

११

“नाम तियेचें काय, कथीं रे ?” यति बोले मग मधुला;
“ती शांता; अति शांत असे; ही शांता तन्मृगबाला.” ५३

“शांता कां ? मग असे मधो, या वृद्धाची ती दुहिता;”
हरहर ! आशाभंग जाहला ! कविमनिं शांति न आतां ! ५४

“बाला झाली विगतभर्तृका; शल्य मनींचें तेंची;
मधु, काढीं तें; कृपा करीं रे; आण तुला बघ यतिची ! ५५

आहे प्रेमळ, कोमळ, सुंदर, दुहिता जरि वनगांची ?
वरिं तिजला; गुरुदक्षिणाच ही, आस हीच वृद्धाची !" ५६
"गुरो ! करावी क्षमा; मला नच मानसिं आणिक छळावें !
भार्या नलगे या पाप्याला ! सुतसम मज मानावें ! ५७
मी सुत; शांता सुता आपुली; बंधुभगिनि हें नातें;
मान्य असे हें तिजलाही; ती कथिल मला दुःखांतें. ५८
स्वागत केलें माझें वदली शांता तैं ही वाणी;
'मंगलकालीं नच सत्कारिल भावाला कां भगिनी ?" ५८
"हो कां ?" यमि मग कवीस वदला "परिस दुःख शांतेचें;
परि नच वाटे, मानिल नातें केव्हांही भावाचें." १६०

---

## खंड ४

रसिक श्रोते ! शांता आतां कथन करिल दुःखांचें;
सर्वांगाचे कर्ण करा; द्या दान एकतानाचें ! १
दृष्टि भेदिका शास्त्रज्ञांची नच लावा भाषेला;
गरिब विचारी विव्हल अबला; तशांतही ती बाला; २
ठावे नच कां जनन तियेचें झालें त्या देशांत
दास्यकर्दमीं रुते जिथें नर; युवती अज्ञानांत ! ३

---

१ वनचराची.

सुविचारी जरि अमुची शांता, प्रेमळ जरि तद्हृदय,
व्हावी कैसी तिज भाषेची, कळे न मजला, संवय ? ४

तरी न सोडा नैराश्याचे दीर्घ असे उच्छ्वास !
करील नच कां हृत्कल्लोळहि भाषासौंदर्यास ? ५

मिळतां एक श्रोता मधुसम, दुःख मूर्त होईल !
रसिकमनांच्या मूर्ती दिसतां वाणी कां न सजेल ? ६

'स्वस्त्रीजीविततृष्णाव्याकुल मधुसम कैसें व्हावें
उत्कंठित ?' ही शंका येथें येत; परि समजावें, ७

नच मधु, परि तत्प्रीतिच होती, तिष्ठत शांतेसाठीं;
शांतेसाठीं ? मधुमन होतें शांताप्रेमापाठीं. ८

नच तळमळते ज्ञानी नर या दिव्य प्रेमाकरितां,
ज्ञानाभावीं प्रेम न सुकतें, काय नाथ मग गाता ? ९

ह्मणुनी विनती व्हावें आतां मूर्ती प्रेमरसाची !
पहा, पहा, ती नौकेमाजीं दिसते करुणरसाची ! १०

जात न निघुनी यति तों मंजुळ गायन ये मधुकर्णीं;
तन्नादें नच, गीतार्थें परि मधुमति नेली हरुनी ! ११

# शांताविरह.

## पद

भैरव—मनमोहन गिरिवरधारी—

लागत कां हुरहूर । मनाला ? ॥ धृ० ॥
कधिंही न घडलें ऐसें मागें;
उडत असें कां ऊर ? लागत०

हंसत सखी कां ही मालती मज ?
धरि मजवरि सुमधार ! लागत०

केसर, हससी ललनाहांस्यें !
रे, करिं तिजला दूर ! लागत०

वेडावतिं हीं प्रेमाला मम !
नाथ, कुठें हो चूर ? लागत०

साकी.

पूर्वस्मृतिनें प्रेम दाटलें; शब्दहि कंठीं दडले !
शब्दाभावीं गायन रमलें; तन्नादहि ते शमले ! १२

ज्ञात न तिजला केव्हां केली दूर कोकिला हस्तें;
पतिरूपीं ती मग्न जाहली; कळे न वल्ली हसते ! १३

---

१ वीणा.

हंसो सखी, ती करो कुचेष्टा, इष्ट गीत परि मधुला;
स्तब्ध दूर जरि शांतागायन, मधु करि या विनतीला; १४

---

ग्रंथ संग्रहालय

## मधूची विनंती.

पद

चाल—तीच मनोहारिणी

केशवसुत.

हृदय गडे व्यापिलें, नैराश्यें दाटलें ! ॥ ध्रु० ॥
परि अजुनी क्षम गीतश्रवणा;
मनोहारिणी, घेइं ग वीणा !
कोमल हस्तें छेडीं मग तिज;
पडतिल रव या कर्णीं सहज !
आशेचं घरटुलें, समज तिनें बांधिलें !

२

संतापें जरि हृदय चेतलें;
कीं नैराश्यें उलुनी गेलें;
एकांतांतिल तव सहज ध्वनि
परिसुनि येइल जल गे नयनीं !
आशेचें सोनुलें, समज तिथें उपजलें !

३

तार नको परि कोमलतेची
छेडूं आधीं आनंदाची !
कथितों मोद न गे या देशीं !
गातां होइल उपहासासी !
पाहीजे रव भले, भीषण ते काढिले !

४

भयाण तैसे भेसुर नादें,
भेदीं नैराश्याला प्रमदे !
तान तयाला आनंदाची
अंतीं होत पोषक साची !
ह्मणुनी गे कोमले, मन, तव नादीं लागलें !

साकी.

"अजुनी मनुजद्वेष वसे ना अपुल्या प्रेमळ हृदयीं ?"
शांता वदली मृदु वाणी, त्या अवचित येउनि ठायीं ! १५
"असतां शांता निकट, वसे मनिं शांती" कवि तिज वदला;
"अशांत मन हें वळि न पडावें कैसें पापाग्नीला ? १६

असो; असे हा उत्सुक बाले, तव दुःखें परिसायां;
उत्सुकतर हें मन्मानस गे, मनुजिं सूड उगवायां !" १७

"कथीन नच मी केऽहांही मम हृदयविदारक गोष्टी;
वसे द्वेष अंतरींच अपुल्या; केवल नच तो ओष्ठीं!" १८

"नको नको गे करूं असें हें; क्षमा करीं मित्राला!
राहिल कैसा द्वेष मनीं या बघुनि शांत मूर्तीला?" १९

"ठेवावें मन शांत; नसावी द्वेषवृत्ति मनुजांची;
द्यावें मज हें वचन; असावी शांतमति श्रवणाची;" २०

"मधुर वचें तव शमलें बघ हें द्वेषगरल मन्मनिंचें;
सोडावा त्वां शोक; धरावें धैर्य, इष्ट मम साचें; २१

येतां उमळुनि शोक तुझा, मद्द्वेषाग्नी भडकेल!
द्वेष तसा तो शोकहि करितो मनुजा भारी विकल!" २२

"सोडावा म्यां शोक? हन्त! मी शोकरूप हो, बनलें!
शोक न, तर नच शांताः परिसा दुःख हृदयिं भिनलेलें!" २३

(२)

"नसती निर्मियली विधिनं जर बाल्यावस्था लोकीं,
मर्त्यलोकिंचें गेलें असतें दुःख अहा! स्वर्लोकीं! २४

जलपानें तो वृक्ष वाढतो उन्मलून पडण्याला;
भावी तापार्थच बाल्यीं तो तपन धरी लालीला; २५

कोमलबालककपोलमार्दव धरितें काढिण्याला;
तैसीं सारीं बालपणींचीं सुखें धरिति असुखाला! २६

करीं क्षमा या मित्रा, ऐसें आपण बोलुनि गेलां;
मित्र कोण ? तो कुठें वसे ? हें सांगा कीं भगिनीला ! २७
अथवा नच सांगावें कांहीं; मजला रुचेल नच तें;
मित्र प्रीति, प्रीति मित्र, तें सारें एकच असतें; २८
परी न रुचतें नाम ‘ मित्र ’ हें; कटु ‘ प्रेम ’ हा शब्द !
एक ‘पतिच’ हा मंत्र असे मम, झाले बहु जरि अब्द ! २९
साश्चर्य कां बघतां ? प्रेमाहुनिं नच पति कां श्रेष्ठ ?
नच कां ‘ज्ञानें’ होइ कल्पना ‘प्रेमाची’ हो इष्ट ? ३०
वदती ‘प्रीतीमूलक तेंची ज्ञान खरें; ह्मणुनी तें
प्रेम ज्ञानाहुनी थोर;’ हें ज्ञानाविण कां कळतें ? ३१
प्रेम दिव्य ज्या प्रथम पायरी ज्ञान तेंच देणारा
होता बालक एक : तयाचा हस्त मला वरणारा. ३२
त्या हस्तें हा कर धरुनी, मज अक्षर ओळविण्याला
लावी, तेव्हां बोले ‘लाविन ‘अक्षर’ ओळखण्याला’ ! ३३
‘काढिं अशी गे, ‘श्री’ ऐसें तो सांगत असतां मजला,
हळूंच कानीं बोल, ‘माझी अससी तूं ‘श्री’ विमला !’ ३४
परी न ठावा अर्थ तयाला श्रीचा कोमल वयिं त्या;
बोलत होता जैसे बोलत होते माझे तात्या. ३५
मामंजी नी तात्या अमुचे स्नेही बहु दिवसांचे;
नवल कसें मग अमुचें ठरलें नातें वधूवरांचें ? ३६

कुशाग्रबुद्धि, प्रज्ज्वल कांति, प्रशांत हृदय तयाचें
होतें पितरांचें नच केवल, पद परि मत्प्रीतीचें ! ३७
आम्र जसा मालती तशी ही वाढे अनुरोधानें;
एक दिनीं तात्यांना आई बोले उत्सुकतेनें; ३८
'विमला झाली'–"विमल ! तुझें कां विमल असे गे नाम ?"
"होय ! परी कां ऐसें चेष्टित करी आपणां नाम ?" ३९
"विमला नामें होती माझी हरिणी पूर्वी एक;
क्षमा करीं; नच पुनरपि होइन आतां मी विमनस्क !" ४०

(३)

"माता वदली 'झाली विमला आठ अधिक वर्षांची;
मधुकरही तो' "–मूर्च्छित कवि ! ही परमावधि हर्षाची !!४१
कळलें नच हें काय जाहलें प्रथम क्षणिं शांतेला ?
क्षण दुसरा तिज पाही तीरीं; मृगी दिसे तिसऱ्याला; ४२
हरिणी हुंगी कविमुख आधीं; नंतर सारीं अंगें;
जात न दो पद भगिनीमागें, परत फिरे तों वेगें; ४३
नच सोडी ती कवीस; परि मति होई जाया तीरीं;
जावें, यावें, विव्हल व्हावें–प्रेमरीति ही सारी ! ४४
कमंडलू नच भरत जलें तों प्रफुल्ल मधुमुख होई !
नेत्रोन्मीलन, ओष्ठहास्य तें हरिणीहृदयीं जाई ! ४५

निकट एकटी मृगी बघोनी, कवि विठ्ठल मनिं होई;
दूरवरीं परि शांता दिसतां, झडकरिं तिकडे जाई. ४६
"क्षमा करीं मज बाले, झाला मित्रविरह दुःसह गे!
मधुकर नामें सखा जिवाचा; तत्स्मृति दिधली तूं गे! ४७
आत्मकथा मज सांगे पुढतीं; नच होइन मी विकल;
येथवरी तूं आली 'झाली अष्टाब्दा ती विमल.' ४८
"एकदिनीं मन्माता वदली 'झाली विमला मोठी;
योग्य विवाहा मधुकरहीं; हो, काढाव्या त्या गोष्टी.' ४९
'वेडी कुठली! वय कां त्यांचें लग्नक्षम आतां हें?
बालविवाहें नच कां अजुनी अज्ञानी तूं राहे? ५०
वय कोमल शिकण्याचें त्यांचें, प्रेमवृद्धि होण्याचें;
कळे तुला कां प्रेम काय? तें सुख आहे लग्नाचें? ५१
प्रेमळ पति, ती प्रेमळ दुहिता, दिधलीं दैवें तुजसी;
रुससी, फुगसी, व्यर्थ आपुला हट्ट खरा गे करिसी'! ५२
'पुरे, पुरे ही चेष्टा; आहे ठावें तुमचें ज्ञान!
लग्न येथ; ती नसे चिकित्सा ज्ञान इष्ट कीं ध्यान? ५३
लग्न निराळें; प्रेम निराळें; ज्ञान निराळें सारें;
एकच सगळें वदता तेव्हां भरतें 'पुस्तकवारें!' ५४
कळत तुला कां प्रेम? अहाहा! जणुं पुस्तक तें प्रेम!
रुससी! फुगसी! ह्मणा आणखी! नच अपुला हो नेम! ५५

परि, पति अमुचें दैवत ह्मणुनीं मूग गिळावे झालें !
नसती केली घाई जर नच मरणोन्मुख मी पडलें ! ५६

दो दिवसांची तनु, हा मृण्मय देह, कथेकरि वदती;
ह्मणुनि वदें या हस्तें द्यावी विमला मधुकरहस्तीं.' ५७

'पाहूं पुढती बरें लाडके ! जा, विमलेला धाडीं !'
"परि नच टांकी गोष्ट, शर्करा मुंगी जेंवि न सोडी !" ५८

'खरें वदूं कां ? पुरुषांना नच तिळभरही हो ज्ञान;
मधुकर जातां दुज्या गृहीं, तो जाइल कां न सुटून ? ५९

प्रेमळ अथवा कोमळ अथवा ज्ञानी अथवा ध्यानी,
पुस्तकपंडित, चतुर, समंजस, दानमग्न कीं मानी, ६०

असो सद्गुणी, असो विचारी, असो मनुज निर्वाणीं
होतां स्वामी दसलाखांचा, जाइ सर्व विसरोनी ! ६१

ह्मणुनी वदतें द्यावा आतां 'लग्नबार' उडवोनी !
गेला क्षण नच येइल, यास्तव पुस्तक द्या फेंकोनी !' ६२

'प्रिये ! लाडके ! खरी धोरणी ! खरी खरी गे, गृहिणी !
परि द्यावी कां विमला त्याला, जाइल जो विसरोनी ?' ६३

'हेंच हेंच तें वेड बरें, जें टांकी मस्तक फिरुनी !'
"पदोपदीं हें ऐसें वदुनी, गेली ती चडफडुनी ! !" ६४

(४)

"त्यावरती दो मास लोटले; गृहिं अमुच्या मग आले
मामंजी नी वृद्ध एक, ज्या होते दत्तक ठरले. ६५

वृद्ध वदे 'हो, मान्य करावी विनती माझी एक;
देउनि विमला मधूस, माझा राखावा लौकीक. ६६

विमलेसाठीं मधू, मधूस्तव विमला केली देवें !
जोड तयांची नच घडली तर सोडियलें मज दैवें ! ६७

माधवजींचा निश्चय ऐसा, हा संबंध घडावा;
येतां कांहीं आड तयाला, मोह सर्व सोडावा. ६८

धनें अधन मी, कीर्ति अकीर्तिकरही ती मज वाटे !
कुलाभिमानावांचुनि सारें जगतीं आहे खोटें ! ६९

कोण कुळाचें दैवत मागें तोषवील? मत्ताता
कीं मजला देईल पिंड ? ही चिंता जाळी चित्ता ! ७०

प्रथम विवाहें भूषित व्हावें दत्तविधान तयांचें,
हीच विनंती, नव्हे, कोड हें पुरवावें वृद्धाचें !' ७१

वदुनी ऐसें खरोखरी त्या वृद्धें धरिलें चरण !
तात्यांचें मन कोमल भारी; आले नयन भरून ! ७२

तात्या अमुचे वदले ' घालूं विमल मधूचे पदरीं;
तोच असे जामात आमुचा; विमीच त्याची नवरी; ७३

परी वयें तीं लहान दोघें; दिन त्यांचे शिकण्याचे;
होतां चवदा वर्षें तिजला, दान करिन विमलेचें !' ७४
वृद्ध हसे गदगदा; वदे मग ' नियामकें मज दिधली
आज्ञा जायां तन्नगरीं; मम वर्षें सारीं सरलीं !' ७५

o o o o

"असो; जाहला विजय स्त्रीचा, ज्ञानावरि मायेचा;
विजय कशाचा ? उद्भव झाला माझ्या दुर्दैवांचा ! ७६
'शिरीं अक्षता पडतां,' माळा मधुकंठीं मम जातां,
श्वशुरगृहीं कीं मत्पद पडतां, अलंकार कीं लेतां, ७७
कीं सासूनें कुरवाळीतां, भाऊजींनीं बघतां,
मामंजींनीं दाखवितां मज, बाईजवळीं बसतां, ७८
कीं मज सोडुनि जातां, दुसऱ्या नगरीं शिक्षण घेतां,
कीं माहेरीं प्रथमच जातां, अथवा पुनरपि येतां, ७९
अथवा जातां अन्य गृहीं कीं होमहवन ते करितां,
गेले असते प्राण, सुखें मी स्वर्ग पाहिला असता ! ८०
बसलों असतों स्वर्गीं आम्ही कंठिं कंठ घालोनी !
दावियली मज असती त्यांनीं तेथोनी ही अवनी !" ८१
स्तब्ध जाहली क्षणभर बाला; दृष्टि निश्चला झाली;
नेत्रीं प्रेमप्रवाह फुटला; स्मृति वाचेंतुनि आली; ८२

## पूर्वपदार्ध.

सोडुनिं कां मज गेला नाथा, दीन अशी भूवरीं ?
मूर्ति मनोहर पाहूं कोठें ? स्मरणसुरी अंतरीं !
स्मरणसुरी गे ! सुखविसि हृदया; भेदिसि तूं त्या परी !
नाथ, गडे, मी आलें आलें ! घ्या हो, मज अंतरीं !

५

"घेऊं कां इज अंतरिं ? अथवा आलिंगूं ही काया ?"
चिंति असें मधु; परि नच शांता सावध तें समजायां; ८३
"स्पष्ट सांगु कां नातें ? अथवा शांति धरूं या वेळीं ?
अथवा ईशा ! स्तवन करूं कां आधीं तव याकाळीं ? ८४
अथवा नच कां ईश दिसे हा सन्निध या स्त्रीदेहीं ?
ईश स्त्री ? छे ! नसे युक्त हें ! बद्ध न आकारांहीं ! ८५
आलें कैसें ज्ञान इथें हें प्रेमाला अडवायां ?
मन्मानस हें कैसें न कळे ? वधे प्रेम दवडायां ! ८६
अगा मना ! गा ज्ञाना ! व्हावें कोठवरी त्वद्दास ?
बा हृदया ! बा प्रेमा ! दावीं आज तरी उल्हास ! ८७
हे द्वेषाग्ने ! सोडीं मजला; अथवा जाळुनि टाकीं !
कोण नीच हें मन्मन ! मजवरि संशयजाला फेंकी ! ८८

असेल कां ही पतिव्रता ? हा ! संशय भाजी मजला !
प्रेमा ! प्रेमा ! प्रेमा ! येई ! घट्ट धरीं हृदयाला ! !" ८९

६

ऐसें वदुनी खरोखरीं धरि घट्ट मधू हृदयाला;
तोंच दिसे व्रण पुनरपि तेथें बालपणींचा त्याला ! ९०
व्रणें भेदिलें संशयजालें या विचारमालेनें,
" 'बालपणींचा काल सुखाचा' घालविला मौजेनें ! ९१
विवाहनिश्चयवार्ता कथितां हृदयिं धरुनि विमलेला,
दंत रोंविले होते चिडुनी तिनेंच या हृदयाला ! ९२
स्मरेल परि कां आतां शांता—शांता कसली ? विमला ?"
कळे न त्याला शांता पाही आतां दंतमाला ! ९३
"मोही कां तो दंत-व्रण मज ?" शांता मना विचारी,
"असतिल कां हे तेच ? अशी कां धडकि भरे या ऊरीं ? ९४
नसे रूप हें त्यांचें; नव्हता जटाभार डोईचा;
चिंतातुर कीं द्वेषयुक्त हा स्वभाव नव्हता त्यांचा; ९५
अथवा पापी दृष्टि नसे कां माझी ही अविचारी ?
गेले स्वर्गी येतिल कैसे ? सुमना, तूंच विचारीं ! ९६
किंवा तेही या जड देहासम असतिल जलिं तरले ?
ज्याला दिसली लता तयाला तरुवर कां नच दिसले ? ९७

हीच दृष्टि; ही हीच नासिका होती मत्सखयाची !
परि नच होई धैर्य, करायां विनति नाम कथण्याची ! ९८
अथवा व्रणमिष करुनि विचारूं यांचा मी इतिहास ?
अथवा बोलूं स्पष्ट ? परी हे करितिल मम उपहास ! ९९
दृष्टि अशी कां निश्चिल यांची ? ओळखिलें कां हृदया ?
अथवा कथितें गोष्ट पुढें; मज मार्ग तोच समजाया." १००

७

"तोषायां कुलदैवत, द्यायां पिंड जयाच्या पितरां,
झालों पुत्र, स्नुषा; पाळिली आज्ञा 'पितरां तारा;' १
त्या वृद्धानें स्वप्राणांसम पाळियलें आह्मांला;
होता श्रीमान्, धीमानहि; परि बळि पडला विषयाला ! २
केला यत्नें, ठसा डोइचा, दुग्धधवल धर्मीचा
कलापलेपें काळा, डोळा चुकवायां दूतांचा ! ३
असो; कशाला मोहक रूपा वर्णावें श्वशुराच्या ?
असेल मध्यंतरिं कोठें तरि, रूपीं अश्व-खरांच्या ! ४
अथवा विसरावें म्यां कैसें नातें मम स्नुषेचें ?
अश्व न; नच खर; खरेंच होतें रूप 'श्रीमंताचें' ! ५
गोविंदाचा[1] भुजंगनाथ श्रीमान् परि दुर्दैवी;
श्रीसम नव्हती प्रखरतरा ती धीही त्याच्या दैवीं ! ६

---

१ प्रसिद्ध नाटककार रा. गोविंद बल्लाळ देवल.

भद्रेश्वरसम मध्यस्थाची कारस्थानें नव्हतीं;
दंड, बंड वा कोदंडाचें; नव्हती भैरवभीति ! ७

असो; कशाला विस्तृत व्हावा येथें तो दृष्टांत ?
ध्यानींही नच येता, नसता स्पष्ट विरोधी अंत ! ८

'घटितां विधि पी काय सुरा?' ही शंका गोविंदाची
देउनि कोदंडास शारदा, शमविलि धात्यानेंची ! ९

परी चकविलें वृद्धें अमुच्या, पुराणपुरुषालाही !
येथ न शंका! येथ न देवल! बुद्धि प्रखरतरा ही ! १०

'लग्न नव्हे परि, मरण उद्यां' ही भीति शिवे ज्या स्त्रीला,
असो कुमारी, असो कुनारी[1], विषय न तद्विषयाला ! ११

'भासतस पळ घडी, घडी दिन' हृदयीं जी धरि भाव,
तीच तयाची अर्धांगी, जरि धरि अंतरिं धनभाव ! १२

कायेचा जी करील विक्रय-विक्रय शास्त्रविहीत,
नसे अशी कां तरुणी, अपणां वाटे, या वर्णांत[2] ? १३

असो; नसो; परि शोधियली त्या वृद्धें ऐसी तरुणी;
न कळे 'अथवा तीच जाहली स्वेच्छेनें तद्गृहिणी ? १४

---

१ विधवा. २ ब्राह्मण.

नच चवदांची, परि अठरांची! कुमारी न, परि विधवा!
'मुग्धा हरिणी विधवा' झाली 'चपल नागिणी सधवा'!!१५
चपल नागिणी, परि नागा नच अनुसरणारी तरुणी!
मोहिल तन्मन जरठ फणी वा तच्छीर्षींचा सुमणी? १६
नच देतें मी दोष; कुमारी नच ह्मणतें विधवांस;
परि त्यांनीं कां काया द्यावी भुलुनी, विकत धनास? १७
कांताराहुनि भयाण, वदती, गृह जें गृहिणीहीन;
कुलटापीडित गृह, नच कथिती, भयाण कोणाहून? १८
स्वकुलघातिनी, दुष्टचरित्रा, पापनिश्चया, कुलटा,
द्रव्यमोहिता, कामांधा ती गृहिं वर्ते जणुं सुभटा[२]! १९
वैधव्यप्रिय, रक्तप्राशनलोलित, भीषण असुरी
सासू मम पति डोहीं बुडवी, तोषायां जलिं सुसरी!"१२०

९

शैशव आलें नेत्रांपुढतीं; शोक उमाळें आला!
अशोकवनिकास्थितसीतेपरि आक्रोशा करि बाला! १२१
झंझावातप्रनष्ट अथवा विद्युत्ताडित वल्ली;
तैसी शोकें निचेष्टिता ती भूवरतीं मग पडली! १२२
"कळे न मन्मति वळे न कां या सखीप्रबोधनिं आतां?
उत्सुक होती ना समजायां 'शांता कां मत्कांता?' १२३

---

१ अशुभदायक. २ स्त्रीयोद्धा Amazon.

व्हावि सखीची सत्वबुद्धि कां प्रीतिलोलुपा मधुला ?
गा ज्ञाना ! मजकरवीं छळिसी कां या दीन सखीला ? १२४
अहह ! मूढ हें सांगे 'वेला, दिव्या नच ही योग्य !
कांतप्रेमप्रवाह हीचा सत्वकरां नच वश्य !" १२५
होतां अपाप सावध शांता, मधु तिज हें वच बोले,
"विरम, विरम, गे बाले ! कथनें क्लेश तुला वहु झाले ! १२६
उत्सुक, दुःखें परिसायां जरि मन्मन हें, तरि शांते,
विरघळतें तव शोकभरें तें ! घेई विश्रांतीते ! १२७
शशधर जाई खालीं तैशा छाया दीर्घ पहा या !
प्रीतिदीप तो शशधर; शंका-मत्सर-मद या छाया ! १२८
शशांक आकाशीं; या छाया असती मर्त्यमहींत !
हृदयाकाशीं प्रीती; असती द्वेषादिक चित्तांत ! १२९
परि भूवरिंचा इंदु आमुचा हीनप्रभ हा झाला;
ह्मणुनि निमाला द्वेष संशयीं; झाला एकच गोळा !" १३०

---

## खंड ५.

"वृद्धालाही दुःसह झाला पुत्रविरह; परि बोले,
'अवारिं अवरिं या शोका बाळे ! हृदय तयानें पिळिलें ! १

१ परीक्षेला.

होउं नये तें झालें; शोकें घेइल मधु कां काया ?
—मधुकर ! मधुकर ! मति कैसी रे झाली मज फसवाया? २

कुळसरितेहुनि जळसरिता कां सरस वाटली तुजला?
हा ! हा ! सरली सरिता पहिली ! रस आला दुसरीला !' ३

—धरिल कोण आधारें गृह गे ! तारिल तारूं कोण ?
एक तुझा स्वर्गीं, मम गेले अनेक नरकीं प्राण !' ४

ऐसें करितां सांत्वन माझें श्वशुरें शोक करावा !
एक दिनीं त्या तरुणी सांगे 'मम पथ या योजावा; ५

मधुकरमित्रें मधुचें घ्यावें स्थान; हेंच हो बरवें;
मधु सरतां नच पुष्पा सोडी वसंत हे मज ठावें ! ६

एकदां न कीं दोनदांहि परि अनेकदां मधु देई
कुसुमाला तो वसंत, म्हणुनी मधुमास प्रिय होई ! ७

ठावें नच मज कीं मधुमासीं वृक्ष जरठही वठला !
सकलां श्रुत परि, वसंत करितो वार्धित तरु तुटलेला !' ८

२

"मांगल्यें दुमदुमलें गृह, जों मास न अशुभा लोटे !
खिन्न मयूरीविण कोणाला वसंत अप्रिय वाटे? ९

मधुमासींचा मधुरक मधु तो मिळे नर्मदाडोहीं;
नवल न पुष्पप्रियभृंगी मग घनवश होई वहीं ! १०

मधुसम मधु मत्प्रियकर जातां, खिन्न सदा जें होतें,
वसंत मिळतां प्रसन्न झालें; दासीजनमानस तें ! ११

कोणी करिती मंगलमाला; चंदनचर्चा कोणी;
कोणी कलशस्थंडिल रचिती; पूर्वस्मृति नच कोणी ! १२

आम्रपल्लवें शोभित करिती द्वारें उत्सुकतेनें !
कोणी करिती मंडित मंडप नीलचीनपटलानें ! १३

कोणी करिती लगबग; कोणी सारा व्यर्थ पसारा !
वसंत, सासू मनीं रचीतीं, कळे न, कोण मनोरा ? १४

निश्चित मंगलवार असे; ती निशा इंदुवाराची;
कळे न, त्यांच्या भीति अंतरीं होती वसत कशाची ? १५

इंदुवार तो होता; रजनी इंदुसमागमिं होती;
ह्मणुनि तयांच्या वदनीं कां ती इंदुकांतिसम कांति ? १६

अथवा सरिताजलतळिं निजले मम पति मंगलवारीं,
ह्मणुनी गमली पूर्वरात्र कां भयदा भीषण भारी ! १७

असो कसेंही; गेली ज्योत्स्ना; क्षणदाक्षयाहि जहाला;
उत्सवार्थ दासीगण उठला,—हरहर ! उत्सव शमला ! १८

मंगलहाराहि, हरहर ! पडले श्वशुरशवावरि साऱ्या !
चंदनकाष्ठें, हा ! हा ! पडलीं अनलीं शव जाळाया ! ! १९

गेलीं जरतारीं वसनें तीं, कोणा ठावें कोठें ?
कनककलशही कोणी नेले, कोडें हें मज मोठें !" २०

"शांते ! शांते ! नको मला तें, कोणी कैसें नेलें ? "
कवि वदला " मज सांगे, जरठा मरण कशानें आलें ?" २१

३

"कोणी वदती 'होती जर्जर वार्धक्यें तनु त्याची;
पडतां पिकलें पान भूवरीं, कोण करी क्षिति त्याची ?' २२
यावरि कोणी शंकित होती जरठ जरी तो होता,
पुत्रप्राप्तीस्तव चवथीही भार्या सहजच वरता !' २३
कोणी कुत्सितबुद्धी निंदक सासूविषयीं बोले;
परि न तयें मम कीं जनतेचें चित्त तदा वळवीलें. २४
कोणी मित्रद्रोही वदला 'दिसला वृद्धा पुत्र
निद्रेमाजी; तीच जाहली शेवटली तद्रात्र ! २५
मधुकरभूतें ताता कथिलें मज मित्रें बुडवीलें !
कुलटेनें त्या धनमोहें नी देहमदें भुलवीलें !!' २६
वदतें आणिक भूत; तात परि तेंच वदे झोपेंत !
जवळीं होता वसंत; भूतें केलें त्या भयभीत ! २७
होती चपला वैधव्यप्रिय तेथें मधुकरमाता;
बोले 'सखया ! समय जहाला ! नर्कपथा ने आतां ! २८
घेई ! ओतीं काळकूट हें नीट जरठ–ओष्ठांत !
सखया ! बघ रे, पानास्तव ते ओष्ठ कसे हलतात'? २९

'सखये ! प्यारी ! काळकूट हें फाडिल जरठोदर गे !'
'चंदनलेपें हालाहलही झांकूं, नच कां उमगे ?' ३०
'परि राजानुज–'नच कां राजा आपणां तारिल वेळीं ?
वेलाही ती नच येइल रे, देतां विष याकाळीं !' ३१
तोंच पुढें मृत पुत्राचें वच पितृमुखांतुनि आलें,
'उठा ! उठा ! व्हा जागृत ताता ! ओष्ठीं कटु विष पडलें!' ३२
खडबडला; बहु धडपडला; परि पडला; सडला गरलें !
गरलें जळलें जरठोदर; परि चंदनचर्चें शमलें !' " ३३
–"चंदनचर्चें शमलें ! नीचा ! तातभूत शमवीन !!"
वच पडलें हें सहजच तेव्हां कविच्या वदनांतून ! ३४
परि अन्य क्षणिं पाहुनि विस्मित शांतामुख कवि बोले,
"नवल ! कसें मच्चारित्र्यासम जीवित तवही झालें ! ३५
सांगे पुढती दुःखकथा; मम–तव सासू करि काय ?
एक विवेकाभावें वृद्धें वरिलें संकट, हाय !" ३६

४

"श्वश्रूविरहालापें गेलें सारें मंदिर भरुनी !
तैसें तिकडे स्मशान भरलें श्वशुरचिताज्वालांनीं !! ३७
चिता चेतली; सासू शमली; वसंतमति परि चळली;
त्याच दिनीं–त्या मंगलवारीं–आला तो मजजवळीं. ३८

'विमले ! विमले !' कामातुर तो वदला 'कोठवरी गे,
मौनव्रत हें धरिसी ? सोडीं वैधव्याचीं सोंगें ! ३९
योग्य न वैधव्या हें कोमल मृदुतर मानस, विमले !
जाळीं नच गे तनुलतिका ही पतिविरहाच्या अनलें !! ४०
उद्यानासम, न तें रणासम रूक्ष, विश्व गे, पाहीं !
विश्वीं वृक्षा वेष्टित छंदें व्हावें, विमल, लतांहीं !! ४१
सुशील सुशिला–श्वश्रू तव–कां नच वश या वृक्षाला ?
परि न मनीं ती भरली; दिधली प्रीति अशा लतिकेला ! ४२
माझा दुसरा प्राण मधूही ! त्याची ही मज विनती,
'मित्रा ! भार्या भ्रष्ट नसो मम ! शिवो न तिजसी कुमति !' ४३
वैधव्यें मति चळते, ह्मणुनी सधवा पुनरपि होई !
प्रेमोद्यानीं सुमशयनीं या वसंतसंगा घेई !! ४४
राजा माझा मित्र,–मंत्रि मी होइन दो दिवसांत !
जाइल सुशिला वृद्धाजवळीं, घेशिल जर हस्तांत !' ४५
'नीचा ! अधमा ! धरा कशी तुज निज आधारें धरिते ?'
'कारण, थरथर अधरांसम तव ती न कदापी हलते !' ४६
'हलो; हलो ! ती दुभंग होवो ! तटिनीतळिं मज नेवो !'
'हळूं हळूं मीं दंग होउनी, या करपाशीं जावो !' ४७
'मांगा ! लज्जा धरी मनाची, नांवाचीहि, जनाची !'
'जन तूं ! मन तूं ! नामें केली मोहित मति सकलांची । ४८

विमले ! संतासम न वसंता उसंत सोसे पळही !'
वदुनि असें तो पापी मजला स्वकरिं धरायां पाही ! ४९
'थांब, थांब, रे नीचा ! नरकीं जासी कां इतुक्यांत ?'
—अन्य क्षणिं ही प्राणरक्षिणी जाती तद्हृदयांत !" ५०
—त्सरुवेष्टित ती कट्यार काढी तत्क्षणिं वेणींतून !
कराल कर्कोटकाजिव्हेसम दावी मग उपसून ! ! ५१
नंतर सोडुनि शिला, पदें दो मागे सरली बाला;
पूर्वस्मृति कां तिज झाली कीं वसंत जवळीं आला ? ५२
ती न स्मृति; ती स्फूर्ति उदेली पातिव्रत्यतपाची !
जेंवी दिव्य ज्योती प्रकटे समयीं देशहिताची ! ! ५३
अग्निशिखेसम कट्यार उज्ज्वल किंचित वरि धरि देवी !
प्रखरतरा तद्धारा कविदृक्, बालानेत्र न दिपवी ! ! ५४
संबोधी मग तिज या वचनीं "भगिनि !रक्तपे ! रमणि !
रक्षीं भगिनी तयापासुनी, जो धरि पाप स्वमनीं ! ५६
किन्नर वा नर, सुरासुरहि वा, राक्षस यक्ष असो वा,
पिशाच वा गंधर्व, पातकीशोणितझरचि वहावा !" ५६

५

इष्ट समय कवि बघुनि वदे "गे शांते ! तव धैर्यानें
प्रमुदित मन्मन झालें; परि या घेरियले शंकेनें ! ५७

नसे वीतभर कट्यार अवघी; नगसम सुर असती ते !
नर न, तरी ते किन्नर धरिती मायामय रूपांतें ! ! ५८
पिशाच वा गंधर्व यक्षही, कळे न कैसे येती ?
कृपाणकीटकदंशें राक्षस हस्ति न मानी भीति ! ५९
वदशिल 'नगसम सुर; नभसम मम हृदयव्यापकता हो !
किन्नरमायामयरूपांची ज्ञानीं काय कथा हो ? ६०
पिशाचगंधर्वांची कळते गति या मानसदूता !
पिपीलिका नच करिते करिवध; ऐसें कां वदता ?' ६१
ओजस्वी हें वचन; परी मज गर्वोक्तिच भासे ती !
कर्णपिशाचें कथिलें 'प्रेमें मोहशील या भांतीं ! !' ६२
राहो किन्नर, राहो राक्षस, राहो यक्ष तसे ते;
आजच, आतां, प्रभातसमयीं, नर वरशिल मज गमतें ! ६३
परी करीं गे, क्षमा; न वदलों माझी वाणी शांते !
कर्णपिशाचापुढती मन्मति मोहुनियां वघ जाते !" ६४
ध्यानीं ध्यावें वसंतमनही चळलें होतें ऐसें;
परि झालें हें कीटक तेव्हां त्यां नीचाला अहिसें ! ६५
कळतां हें पतिजनका, नेलें त्यांनीं स्वगृहीं मजला;
कांताचिंतनीं कळे न, किति कीं कैसा काळ पळाला ? ६६
पत्रें आमंत्रिलें मला मम जनकें तद्गृहिं जायां;
दिधलें उत्तर 'शोभे पतिगृहिं, विधवा जरि, तज्जाया ! ६७

आली जननी; प्रेमें वदली 'विमले, चल माहेरीं;'
वदलें 'आई ! माहेरच हें ! सुख नच गे बाहेरीं !' ६८

हरहर ! देवा ! नच सासर कीं जननीगृह मज आतां !
रानीं दमला जीवात्मा हा वण वण फिरतां फिरतां ! ६९

असता ठावा त्यासमयीं हा भीषण दैवविपाक,
खरेंच दैवा, मानियला मी असता तव रे, धाक ! ७०

अथवा नीचा ! सहज घेतला असता बळि तव तेव्हां !
गेली जननीसम पतिजननी, पतिजनकहि, पति हा ! हा! ७१

त्वेष तसा कां द्वेष न दिधला देवा, अतिथीसम या ?
–अथवा नच कां उल्लंघीं मी यासमयीं यति-आज्ञा ? ७२

गुरो ! करावी क्षमा; न देइन दोष असा देवास;
पात्र न होइन रोषा पुढती; करीं न हा उपहास !" ७३

पश्चात्तापें अधोमुखा ती साश्रुलोचना झाली !
परि पतिविरहप्रधानपिंगद्युति नच किंचित खुलली ! ७४

६

होतां चित्त प्रशांत, शांता शांतपणें मग वदली,
"वसंत होतां मंत्री, तंत्रें त्रस्ता नगरी झाली; ७५

नूतन तंत्रीं मंत्र प्रमुखें मद्य–मदन–मांसाचा !
पापत्रय हें तापत्रयजय कां न करिल नगरीचा ? ७६

होतां पातकजय झालें तें कुग्रामच नगराचें;
हरहर ! नच नगराचें; परि हो झालें भूपमनाचें ! ७७

शूर वीर, दिलदार मनाचा शांत, सुशीलहि भूप;
परि खलसंगें हरहर ! सुंदर तें सर झालें कूप ! ७८

सज्जन गेले; दीन पळाले; त्रस्त संतही झाले;
आश्वासी नृपबंधु म्हणोनी मामंजी नच गेले. ७९

गेले मामंजी, भाऊजी वर्षासमर्यां ग्रामीं;
होतों आम्ही स्त्रिया सर्वही बसलों निवांत धामीं. ८०

मेघडम्बरें डवडवलें नभ; जलधरगण वडवडला;
चमचमली चपलाही तेव्हां वाटे नभघट फुटला; ८१

झंझवातें अपुल्या नादें कथिलें घट नच फुटला;
परि शंपेनें शंकालेशहि जलधारांहीं हरिला; ८२

झंपाझंझावातवाद मग सांगितला जलदांनीं;
श्रवण करित होतों तों आला अधम जलद पादांनीं. ८३

क्षण न उसंता देउनि बोले, वसंत असंत वाणी,
'विमले ! वरिं हा नरवर आतां; करितों वध तुज राणी ! ८४

दावियलें गे हृद्दे, नदितल मधूस या वीरानें !
बंदिके ! झटके व्यर्थचि आतां ! चुंबूं दे रसपानें !' ८५

दिधला एकच हिसका; घुटका प्याली तीक्ष्ण कट्यार;
रक्तप्राशनिं त्या अधमाच्या झालें तिज सुख फार ! ८६

मेघ कडाडे; धरा धडाडे; तडित् तरूंनां ताडे;
कळे न कां ? वा कशी पळालें, रानीं मी चोंहिंकडे ? ८७

किति दिन वा किति रात्री गेल्या, नच मजला तें ठावें;
कुठें, कशी वा, वनीं राहिलें, मज कैसें समजावें ? ८८

अहह ! कशाला देवा, दिधली देहस्मृति त्याकालीं ?
हरहर ! कां नच रुचे तुलाही सती पतीच्या जवळीं ? ८९

नयनां दिसले, शुद्धी मिळतां, स्वसा, जनक, माताही;
दो दिवसांनीं श्वशुरश्वश्रूमरण कळविलें त्यांहीं. ९०

कथिलें 'राजानुजें आणिलें शोधुनि रानांमधुनी;'
वदला तो नच जावें त्वां गे, श्वशुरगृहीं येथोनी. ९१

असो; राहिलें माहेरीं मग पतिचिंतन करण्याला;
झाले असातिल आठच दिन, परि माता वदली मजला; ९२

'विमल, मना ही कम्प देतसे वैधव्यस्थिति, कळे !
वर्धमान तनु हृदय पिळे कां निष्कारण हें न कळे ! ९३

विनत तनूनें, तशी मनानें विनीत, मूज्ञहि होसी;
केशकलापत्यागें नेशिल पति उच्च स्वर्गासी ! ९४

नको अश्रु हें गाळूं बाळे ! गळती लागे हृदया !
नको नको गे, त्याग करूं ! परि अवारिं अवारिं शोका या !' ९५

लोहपिष्टसम कठिण वचन तें, शोकहि गिळुनी वदलें,
'माते ! परिसें एकदाच वच, जें पूर्वी पति वदले ! ९६

'विमले ! जाऊं याच रूपिं गे, स्वर्गाच्या स्वर्गात !'
पतिजीवात्मा केशत्यागें, होईल विकल मनांत ! ९७

पातिव्रत्यास्तव वदशिल तर पाहिं नागजिव्हा ही !
इनेंच रक्तप्राशन केलें अधमांचें लवलाही ! ९८

शिवो न देई भीति मनाची तैसी मम हृदयाची !
पतिसद्गुणतट भग्न करोनी गति तेथें कोणाची ?' ९९

७

"असो; असेही असतिल गेले दिन, कळे न, किति मजला;
परि जननीसम तातहि आले मज उपदेशायाला. १००

'विमले, कथिलें धैर्यवचन तें मजला तव मातेनें;
परिसुनि आंदोलन मन घेई, किति वदुं, आश्चर्यानें ! १

परि नारद कीं गाधिजही तो वश कामा ऋषिकालीं !
स्वातंत्र्यप्राप्तीसम दुष्कर मदनदमन कलिकालीं ! २

यास्तव धरिं या मित्रा विमले ! तातवचन हें मान !
वैधव्याचें दुःख अधिक करि, हृदय आमुचें छिन्न !' ३

'तात्यां, ऐसें विदारिता कां या अबलेचें हृदय ?
माता अज्ञानी, प्रेमळ परि ! व्हा पुढती तरि सदय ? ४
नारद, गाधिज, होत सारे नर; नारी हो आम्ही !
काम न वश जर नरांस, जाणा केलें वश नारींहीं ! ५
मदनदमन कोणास कठिण ? ज्या गमन नसे प्रेमांत;
गमन मला प्रेमीं हो, तैसें आज मिळे ज्ञानांत !' ६

८

" माता पुनरपि शब्द न वदली; तात भूत परि धाडी;
कामातुर तें भूत गमे त्या ज्ञानी व्यक्ती जाडी ! ७
बूट पदीं, तो सूटहि अंगीं, समाजकूटी मुद्रा !
बिस्किट तोंडीं सिगारूटही; चिरूट पळवी निद्रा ! ८
ज्ञानावंत तो असेल–नाहीं; होता हें मज ठावें;
होता तोही कांतमित्र, हें कां नच येथ वदावें ? ९
परि कथियेलें कोण ग्रंथीं पतिव्रता नाडावी ?
नीचें हरिलें मातृगेह मम: कथा तीहि परिसावी ! १०
नित्यासम मी गेलें असतां पतिजलसमाधिपाशीं,
आला जवळीं अधमाधम तो; घेई मज करपाशीं ! ११
तोंच सहज हा कर कबरींत तसरु शोधायां जाई;
हरहर ! नीचें धरिले दोन्ही माझे हात, अगाई ! १२

परि दिधला मीं एकच हिसका तोंच अम्ही दोघेहीं,
पडलों जलिं परि सद्गुरुनें मज काढियलें झणिं पाहीं. १३

“—थांब ! थांब ! गे शांते ! धरूं दे प्रेमें तुज हृदयाला !”
ऐसें वदुनी उत्सुकतेनें धांवे कवि धरण्याला ! १४

धरिली बाला ! त्सरू निघाली ! अधिकच वेगें धरिली !
कराल कर्कोकटजिव्हा ती आकाशीं चकमकली ! १५

“थांब मालती !”—कट्यार गळली ! हस्तहि गलित जहाला !
“प्रिये ! लाडके ! मालति ! हरिते कां या पतिजीवाला ? १६

घे, घे, दिधला नच देहच हा, नच मन, नच हृदयहि हें !
नच जीवच, नच मधूच, सगळें सगळें तव पदिं वाहें ! ” १७

“प्रिया ! प्रिया ! हो प्रिया ! प्रिया !” हे शब्द मात्र मग पडले;
तेही पडले, परि न ऐकिले, प्रेमातिशयीं मिळले ! १८

झाली कां मग पत्नी पति; वा तो ती प्रेमभरांत ?
तो झाला तो, ती झाली ती पूर्ण ज्ञानसुखांत ! १९

पुनरपि केलें सखीप्रबोधन मधुहस्तानें सुजलें;
नंतर आलिंगुनी तियला, प्रेमें आज्ञापीलें; २०

“वरुनि नराला प्रभातसमयीं मानियलें पतिवचन !
प्रिये ! लाडके ! चल जाऊं गे ! करुं आतां यतिनमन !! २१

ॐसह नाववतु सह नौ भुनक्तु
सह वीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीमस्तुमा विद्विषावहै ॥
ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ।" १२१

---

ना. क्र.

# स्फुट कविता.

# स्फुट कविता.

## माझे सृष्टीवरील प्रेम.

And out of spent and aged things,
I formed the world anew.

*Emerson*

पद.

( चाल—मोरी लागी लटक गुरुचरणकी )

मी त्वाई.

किति तरि जुनाट सृष्टि ही ! ॥ धृ ॥
नवयुवतीसम सुखवि परि मना;
दिनिं दिनिं नूतन रूपां घेई ! १
परमेशाची प्रथम प्रसवा;
प्रसवे परि ती प्रथमचि दिवसीं ! २
वज्राहुनि ही कठिणतराही;
करुणा परि या उपजवि हृदयीं ! ३
ठावे वृद्धा चेटकी परी,
प्रेमानें तिज करिन नोवरी ! ४

अमुच्या वेली नष्ट करिल ही;
परि काव्यामृत सिंचिन त्यांवरि ! ५
मारिल ही मम पुष्पसुतांनां;
गायनमंत्रें उठविन अंबरीं ! ६
हिमनगगंगा होउनि सोडिल;
प्रेमानें तरि चुंबिन सागरीं ! ७
वाष्परूप ती होतां तरुणी,
मेघमंडलीं धरिन तिला मी ! ८
मग चपलाघातें ती भेदिल
हृदय–दिसेलच सहज प्रीति ! ९
दिसतां शुद्ध प्रेम, कळेलच
कोण असे ती ? कुटिल सखा मी ? १०
वृद्ध वधू ती बहु दिवसांची;
परि आहे मम कृति मायेची ! ११
तरुणी ती जर तरुणतराहि मी;
वृद्धा जर ती वृद्धतरही मी ! १२
भेसुरवदना–ती मम रचना !
सुंदरांगना–कारण त्या मी ! १३
पतिपत्नींचें नातें ऐसें
असतें प्रेमीं एका रूपीं ! १४

# सृष्टीचें मजवरलें प्रेम.

——:O:——

तया स्वयंभूची संभूती । तया पूर्णाची तृप्ति ।
मायानामीची प्रकृति । पुरुषाची हीं ॥

ज्ञानेश्वर

( चाल-किती रहावें तुजविण आतां )

केशवसुत.

जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत;
सहजचपल तो पवनहि पडला; ध्वनि न कोणता गगनांत;
सागर निजलेला दिसला;
क्षण तारागणही थिजला;
पृथ्वीमागें शशि दडला;
सृष्टिसतीला चिंतनार्थ मी दिधला ऐसा एकांत!
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत! १

बहु सायासें गेले अपुले जड गुण पाहुनि सृष्टिसती,
अजड, अपर, अतिगहन मनोगुण घेउनि ऐसें मनिं चिंती;
"किति तरि पुराण पुरुष पहा!
अतर्क्य परि गुणवंत महा!
कधीं तरुण, कधिं वृद्धच हा!

कळे न निश्चित रूप कोणतें; परि गुंगत्रि हा प्रेमांत !"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत ! २
"प्रेम न हें; ही भीति तयाची; फसलें मायाजालांत;
कर्मावर बहु कर्म करायां, नेलें मज जडरूपांत;
मला न वाचा प्रेमाची;
मला न आशा ज्ञानाची;
बटिक जाहलें कर्माची;
ऐसा दिसला क्रूर पुरुष; परि चुकलें चिंतन करण्यांत !"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत ! ३
"स्त्रीतनु माझा तुरुंग, तैसी नरकायाही जड त्याची;
करण्या लौकिककार्यं दिधली मज काया बहु मोलाची;
दिधली कसली; मीच घेतली;
पुरुषाकृतिही स्वयें निर्मिली;
संसृतिकारण मीच जहालीं;
ऐसी असतां स्वतंत्रता, कां क्रुद्ध असावें चित्तांत ?"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत ! ४
"पतिमन रंजित करण्यां झालें गंगायमुनासरस्वती;
गंगारूपें आक्रमिलें नभ, कीं व्हावी तत्सुखपूर्ती !
पालटला मग स्त्रीकाय;
पुरुष जाहलें हिमालय;
प्रकृति मोहिनी पति होय;

लोळविला तो भस्मासुर या उलट्या वेषें भूमींत!”
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत!! ५

“कर्मरूप मी चर्मचक्षुला; प्रेमरूप मी सत्य असे;
सौम्य, शांत, नी भयाण, भेसुर रूपीं माझें ज्ञान वसे;

उगीं न निर्झरिं मी वाहे;
व्यर्थ न उडुगणिं मी पाहे;
अर्थहीन कां स्थित नग राहे?

ज्ञानयुक्त तो निर्झर, उडुगण, नग बोल कविवाणींत!”
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत! ६

“भेद न जाणा, दुहितांनो, त्या तात्त्विक मूलप्रेमांत;
पुरुषस्त्री ही भिन्न भावना मायिक लौकिककार्यांत;

आत्मनियोजित कर्म करा !
परि न लोपवा प्रेम जरा !
सत्याचा हा मार्ग खरा !

पतिपत्नींचा संगम ऐसा प्रसवे प्रेम ज्ञानांत !”
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत ! ७

कळे न निश्चित रूप कोणतें; परि गुंगात्रि हा प्रेमांत !"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत ! २
"प्रेम न हें; ही भीति तयाची; फसलें मायाजालांत;
कर्मांवर बहु कर्म करायां, नेलें मज जडरूपांत;
मला न वाचा प्रेमाची;
मला न आशा ज्ञानाची;
बटिक जाहलें कर्मांची;
ऐसा दिसला क्रूर पुरुष; परि चुकलें चिंतन करण्यांत !"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत ! ३
"स्त्रीतनु माझा तुरुंग, तैसी नरकायाही जड त्याची;
करण्या लौकिककार्यें दिधली मज काया बहु मोलाची;
दिधली कसली; मीच घेतली;
पुरुषाकृतिही स्वयें निर्मिली;
संसृतिकारण मीच जहालीं;
ऐसी असतां स्वतंत्रता, कां क्रुद्ध असावें चित्तांत ?"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत ! ४
"पतिमन रंजित करण्यां झालें गंगायमुनासरस्वती;
गंगारूपें आक्रमिलें नभ, कीं व्हावी तत्सुखपूर्ती !
पालटला मग स्त्रीकाय;
पुरुष जाहलें हिमालय;
प्रकृति मोहिनी पति होय;

लोळविला तो भस्मासुर या उलट्या वेषें भूमींत!"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत!! ५

"कर्मरूप मी चर्मचक्षुला; प्रेमरूप मी सत्य असे;
सौम्य, शांत, नी भयाण, भेसुर रूपीं माझें ज्ञान वसे;
उगीं न निर्झरिं मी वाहे;
व्यर्थ न उडुगणिं मी पाहे;
अर्थहीन कां स्थित नग राहे?
ज्ञानयुक्त तो निर्झर, उडुगण, नग बोलं कविवाणींत!"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत! ६

"भेद न जाणा, दुहितांनो, त्या तात्त्विक मूलप्रेमांत;
पुरुषस्त्री ही भिन्न भावना मायिक लौकिककार्यांत;
आत्मनियोजित कर्म करा!
परि न लोपवा प्रेम जरा!
सत्याचा हा मार्ग खरा!
पतिपत्नींचा संगम ऐसा प्रसवे प्रेम ज्ञानांत!"
जिकडे तिकडे निवांत झालें; सर्व शांतलें सृष्टींत! ७

---

# स्वातंत्र्योद्गार !

While gasp by gasp he falters forth his Soul,
Ours with one pang-one bound-escapes control !

*Byron.*

पोवाडा—ऐन दुपारीं—

बघा आमुचें राज्य तसें हो, बघा आमुचें घर,
हें वन सारें, हें सर सगळें; कोणा अमुची सर ?
सीमा कां या भिल्लमनाला ? जाइल सगळीकडे !
फिरेल वाऱ्यासवें; तयाला रोधितील कां कडे ?
कडे दास या पायांचे ! हे पाय वांकती कुणा ?
जो ह्मणेल मजला, पाठीं त्याच्या आहे कां हो कुणा ?
अमुची नंगी समशेर
भेदिल काळीज चरचर !
वाहुं तें मातापायांवर !
जो न आइला वांकवील हो, शरण येउनी मान
सांगा त्याच्या कैसा राहिल मानेचा हो, मान ?

२

या तोरणमाळीं तोरण अमुच्या आइभवानीचें;
तिज देतों नाजे प्रातःकाळीं बळी बोकडांचे;

प्यारी मदिरा करिते डोळे खदिरांगाराचे;
ससे दुपारीं खातों; घेतों घुटके दारूचे;
मग तीरकामठा सखा लाडका खांद्यावरि घेतों;
सुंदर भाता बाणांचा हो पाठीवर खुलतो;

कटिवरि ही मग कट्यार
बसते; नारी ती तरवार
ह्मणते, करा करा हो वार !

परि, भाला काला काळविटाच्या रक्तामांसाचा
करितो आर्धी; नसे भिल्ल कां रानाचा राजा ?

३

हें जंगल अमुचें; धंदा अमुचा दंगाधोप्यांचा;
श्रमच आमुची विश्रांती; ती शांति घात अमुचा !
येवो कांहीं संकट, येवो घाला रात्रीचा;
असे कुणाला परवा ? आत्मा हा स्वातंत्र्याचा !
नाचत होडी, लागत गोडी तितुकी हो ज्याला;
जो मेघगर्जना करी बघोनी रानवराहाला;

तो क्रूर वाघ थरथर
कांपतो; पळतोही झरझर;
मग ती गुहा जयाचें घर;

स्वातंत्र्याची खरी कल्पना त्याला हो त्याला !
खरें वदा धनिकांनो, ती कां आहे तुह्मांला ?

४

धनिका वेड्या, कड्यांवरुनिया मारितोस कां उड्या ?
उड्या न घेतों दोन, तोच तो सांवर अमुचा गड्या !
मउ शय्येचा गुलाम ! तुजला भीती मरणाची !
रोगांचें तव शरीर ! तळमळ होते जीवाची !
कुत्र्यावाणी लुडबुडसी तूं नारीच्या मागें !
प्रेम असो वा नसो, वदसि ' गे, ध्यान तुझें लागे ! '
ती शिला आमुची नार !
तिजला सवत असे तरवार !
तरिहि मरण्याला मन तयार !
येवो मृत्यू उद्यां, आज वा आतां याच क्षणीं !
एकच गुचकी–एक आकळी–देहा सोडूं क्षणीं !

---

## मंदिर झाडतांनां पाहून,

The poet must believe in his poetry. Homer, Milton, Hafiz, Wordsworth, are heartily enamoured of their sweet thoughts. Veracity, therefore, is that which we require in poets that; they shall say how it was with them, and not what might be said. And the fault of our popular poetry is that it is not sincere.

*Emerson.*

श्लोक

झाडी केरसुणी सपासप घरें घाणीस राहो न दे;
' व्हावे अल्पच, स्वच्छ निर्मल परी; ' ऐसें सदा ती वदे.
वातें कीं मनुजें वनांतुनि तसें मार्गांतुनी आणितां
दुर्गंधी मल, झाडिते झपझपा ती पाहतां पाहतां ! १

बाहेरील मळास ठाव नच दे ती सुंदरी कुंचली;
हा ! हा ! झाडिल कोण आंतिल मळा ज्यां कीड हो लागली ?
चाहाडी, मद, मत्सर, स्वहित यां प्राधान्य ज्या ज्या मनीं
त्या त्या कुत्सित मानसा कुमळसें झाडील कां हो कुणी ? २

कूपे मंडुक तो, जयें रुतविली भक्तींत ती शारदा,
त्या नाथें, तुकयेंहि अंतरमळ क्षालाविला लक्षदा !
द्रव्याला सुखभोगदुष्टमतिला, कीर्तीसही मोहुनी
राजद्रोह न वंधुओविंमधुनी त्यांनीं दिला शोधुनी ! ३

जी भाषा वदला मुकुंद, वदतों आह्मीहि ती या मुखें;
जी चेतोहर जाहली कविवरां, ती वंदितोंही सुखें;
जी त्यांच्या हृदयांतुनी प्रकटली सालंकृता सार्थही,
झाडावें नच कां अह्मां जर तिनें निद्रेंत गाऊं अह्मी ? ४

"ज्ञानाचें युग हें; न घे स्थल इथें श्रद्धांध तो पांगुळा;
भक्ताळाहि न मार्ग सुंदर इथें, ज्ञानी न जो जाहला;

स्वातंत्र्याची खरी कल्पना त्याला हो त्याला !
खरें वदा धनिकांनो, ती कां आहे तुह्मांला ?

४

धनिका वेड्या, कड्यांवरुनिया मारितोस कां उड्या ?
उड्या न घेतों दोन, तोच तो सांवर अमुचा गड्या !
मउ शय्येचा गुलाम ! तुजला भीती मरणाची !
रोगांचें तव शरीर ! तळमळ होते जीवाची !
कुत्र्यावाणी लुडबुडसी तूं नारीच्या मागें !
प्रेम असो वा नसो, वदसि ' गे, ध्यान तुझें लागे ! '
ती शिला आमुची नार !
तिजला सवत असे तरवार !
तरिहि मरण्याला मन तयार !
येवो मृत्यू उद्यां, आज वा आतां याच क्षणीं !
एकच गुचकी–एक आकळी–देहा सोडूं झणीं !

---

## मंदिर झाडतांनां पाहून,

The poet must believe in his poetry. Homer, Milton, Hafiz, Wordsworth, are heartily enamoured of their sweet thoughts. Veracity, therefore, is that which we require in poets that; they shall say how it was with them, and not what might be said. And the fault of our popular poetry is that it is not sincere.

*Emerson.*

## श्लोक

झाडी केरसुणी सपासप घरें घाणीस राहो न दे;
'व्हावे अल्पच, स्वच्छ निर्मल परी;' ऐसें सदा ती वदे.
वातें कीं मनुजें वनांतुनि तसें मार्गांतुनी आणितां
दुर्गंधी मल, झाडिते झपझपा ती पाहतां पाहतां ! १

बाहेरील मळास ठाव नच दे ती सुंदरी कुंचली;
हा ! हा ! झाडिल कोण आंतिल मळा ज्या कीड हो लागली ?
चाहाडी, मद, मत्सर, स्वहित यां प्राधान्य ज्या ज्या मनीं
त्या त्या कुत्सित मानसा कुमळसें झाडील कां हो कुणी ? २

कूपे मंडुक तो, जयें रुतविली भक्तींत ती शारदा,
त्या नाथें, तुकयेंहि अंतरमळ क्षालाविला लक्षदा !
द्रव्याला सुखभोगदुष्टमतिला, कीर्तीसही मोहुनी
राजद्रोह न बंधुओविंमधुनी त्यांनीं दिला शोधुनी ! ३

जी भाषा वदला मुकुंद, वदतों आह्मीहि ती या मुखें;
जी चेतोहर जाहली कविवरां, ती वंदितोंही सुखें;
जी त्यांच्या हृदयांतुनी प्रकटली सालंकृता सार्थही,
झाडावें नच कां अह्मां जर तिनें निद्रेंत गाऊं अह्मी ? ४

"ज्ञानाचें युग हें; न घे स्थल इथें श्रद्धांध तो पांगुळा;
भक्तालाहि न मार्ग सुंदर इथें, ज्ञानी न जो जाहला;

ज्या वाटे, कवितासखी अवडिनें भक्तीस वेडावली,
त्याची आजच ही खरोखर निशा निद्रासुखा पातली ! ५
“ज्ञानाचा पथ आक्रमूं; हरिहरां पाहूं निसर्गांतुनीं;
तारे व्योमिं, तसे झरे महिवरी देतील त्या दाउनीं;
आह्मांला तरु मल्लिकायुत सुखें देईल हो साउली;
ती सारी हरिता तृणावृत मही तोषेल या पाउलीं ! ६
“संसारीं नर वा सखी अमुचि हो, दैवें जरी लोटिली,
आनंदें गृहिं योग आक्रमिल, जी सृष्टीस आंचावली !
दैवाला नसतें अह्मीं गणियलें, होतों जर प्रज्ञही;
देतील श्रम आमुचे फल तरी; तोषेल तेव्हां मही !” ७
आहाहा ! किति साधु गोड वचनें ! देतात तीं जीवन !
वाटे शुष्कहि काष्ट खास वचनें पावेल संवर्धन !
ही स्निग्ध प्रचुरप्रसादकुसुमें नेत्रांस आल्हादितीं !
हा ! हा ! पावत कंप अंतर तिथें पाहोनि सर्पाकृति ! ८
ती सर्पाकृति पाहतां जरि भरे या अंतरीं कांपरें,
आहे शांत तशी मनोहर ! मना मोही अशी कां बरें ?
ती ज्ञानाश्रित दिव्य सुंदर दिसे ज्योतिष्मतीही प्रभा;
आहे कां प्रतिभा ? भुले कवि; खुले तैसी तयाची हि भा ! ९
सर्पाकीं दिसते मनोहर सखी, जी शांतवी कांति ती;
नामें सांगत आपुलीं ‘सरलता ’‘शब्दार्थसालंकृति’;

‘गोडी’ आणि ‘रसाळ वैखरि’ तशी ‘माधुर्यकादम्बिनी;’
श्रेणी ही परिसोनि मन्मन तदा गेलें पुरें मोहुनी! १०

गेलों दो पद भेटण्यां युवतिला; आनंद होई मनीं;
गेलों दो पद आणखी; तसतशी जाई मती गुंगुनी !
नेत्रांना युवतीविना न दिसलें; त्यांतून तन्नेत्रची
वेधी; बद्ध करी; मतीस न सुचे, मी जाहलों अंधची ! ११

झाला स्पर्श सखीस तोंच हृदयीं दंशें हणी तो फणी !
गेली ती मृदुता तशी सरलता, माधुर्यकादम्बिनी !
पूर्वींची मम अंतरप्रचुरता कुंठोनि गेली अहा !
त्या क्षेत्रीं मग अंधकार अहहा ! दाटोनि गेला पहा ! १२

अंधारांमधि मारिले, हणियले दंशांवरी दंश मी !
नाहीं ठाउक या कितीक असते मारीयले दंत मी !
तैशा त्या समयीं मला धरियलें दोघा नरांनीं बळें;
होत्या केरसुणीहि त्यांजजवळीं; कार्या न त्यांच्या कळे. १३

होता एक जुना; दुजा नविन तो; दोघे मराठी कवि;
त्यांची लेखनियुक्त कुंचलि मला आधीं परी हांसवी !
हांसोनी मग धांवलों झणिं तयां डंखावयालागुनीं;
तेव्हां एक फडें तयें निपटली दंतावली झाडुनी ! १४

हांसोनी मग नूतनें कविवरें वाणी अशी काढिली,

'मामें कृष्ण' सखा मदीय वध हा; या भीति नाहीं मुळीं !
या ज्ञानें[2] कथिलें, युगीं युगिं फिरे शब्दार्थ सारे जनीं;
शब्दात्मा कधिंहीं फिरे नच; असे आत्मानुभूतीखनी ! १५

आचारें जर जार चोर अथवा दांभीक झाले कवि,
ते गाऊत किती सुमंजुल रवें, निर्मोत सृष्टी नवी;
त्यांची ती मधुरा गिरा लवकरीं पावेल भेमूरता;
ती सृष्टी उडवील आमुचि गड्या, फुंकीच तेव्हां स्वतां. १६

जा, सांगे तव बंधुला अजवरी झाले कवी चालक;
झाले धैर्यद, वीर्यद, प्रभुहि ते तैसे जगा पालक !
झाले ते नच बावळे बडबडे बालीश की स्त्रैणही;
झाले अंध न पंगु, दंग अथवा डंखांत, जैसे अही ! १७

सांगे आणिक त्या गिरा न वद कीं गद्याविषीं[3] बाउगी;
होतें गद्यहि आंग्लभूमिंत, परी पद्यें न तेथें उगीं;
काव्येंही तप मागतीं, वद तया, आत्मानुभूतीहि रे;
त्यावीना मग शब्दडम्बर उरे आत्म्याविना देह रे ! १८

शेलेनें निज अर्थ, मान मनही काव्यांस हो अर्पिलें ;
झालें खान तयास पानहि तसें काव्यार्थची सेवणें !
वन्हीं कीं हिमसेक त्या न भिववी; स्वातंत्र्यवृत्ती सदा !
काळाचाहि न दास; होइल कशी त्याची न गीर्वार्यदा ? १९

---

कै. केशवसुत २ ज्ञानेश्वर ३ विषयीं.

झाली जीवन काव्यमोहकगिरा कीद्सास ठावे जनीं;
स्कॉटें लेखन सोडिलें न कधिंही, हे घ्या पुरें हो मनीं;
इन्फरनो लिहितां दिनींदिनिं अहो, डॅन्टेवपू ती खचे !
वर्षें साठ निसर्गपूजन उगां कां शब्दमूल्या[1] रुचे ? २०
युरोपांतिल मालिका प्रिय तुह्मां; वृत्तांत हावा तिचा;
तीचा त्याग ह्मणोनि मीं कथियला, सोडोनि मद्बंधुचा.
मद्बंधूसम भक्तिनें टिकाविलीं काव्यें तियें आपुलीं;
स्वानूभूतिविना तिथें फिरवितां तो काळ हों कुंचली ! २१
सांगे आणिक त्यां नका बडबडूं भक्तीविषीं वांकडे;
निंदा सार्थ न तूमची ह्मणुनि हो लोकांस कोडें पडे;
सांगा त्या समजाउनी " तुमचि हो, भक्ती असे चांगली;
पाहूं पंढरपूरनाथ तुमच्या ती अंतरीं वाणली ! २२
" बंधूनो ! तुमच्यासवें ज्ञणिंच हो त्या आपुल्या बांधवा;
त्यांना ज्ञानचि द्या ! खरोखर तयें होतील ना वीधवा !
काळें प्लेगहि जाइल, क्षण न हो, तो कॉलराही टिके
ज्ञानाचे उपयोग कां दवडितां होवोनि त्या पारखे ?" २३
ऐशा शांत, मधु, प्रधानवचनें ज्ञानस्तुती हो, करा;
प्रीतीगानच तें; परी क्षणभरीं त्या भिन्नमार्गी जरा;
गा हावीं तितुकीं सुमंजुल रवें गानें; हवें त्यावरी;
जाणा सद्गुणिं उच्च आसन कवी घे शारदामंदिरीं ! २४

---

1 Wordsworth.

'नामें कृष्ण' सखा मदीय वद हा; या भीति नाहीं मुळीं !
या ज्ञानें[2] कथिलें, युगीं युगिं फिरे शब्दार्थ सारे जनीं;
शब्दात्मा कधिंही फिरे नच; असे आत्मानुभूतीखनी ! १५

आचारें जर जार चोर अथवा दांभीक झाले कवि,
ते गाऊत किती सुमंजुल रवें, निर्मोत सृष्टी नवी;
त्यांची ती मधुरा गिरा लवकरीं पावेल भेमूरता;
ती सृष्टी उडवील आमुचि गड्या, फुंकीच तेव्हां स्वतां. १६

जा, सांगे तव बंधुला अजवरी झाले कवी चालक;
झाले धैर्यद, वीर्यद, प्रभुहि ते तैसे जगा पालक !
झाले ते नच बावळे बडबडे बालीश की स्त्रैणही;
झाले अंध न पंगु, दंग अथवा डंखांत, जैसे अही ! १७

सांगे आणिक त्या गिरा न वद कीं गद्याविषीं[3] बाउगी;
होतें गद्यहि आं·लभूमित, परी पद्यें न तेथें उगीं;
काव्येंही तप मागतीं, वद तया, आत्मानुभूतीहि रे;
त्यावीना मग शब्दडम्बर उरे आत्म्याविना देह रे ! १८

शेलेनें निज अर्थ, मान मनही काव्यांस हो अर्पिलें ;
झालें खान तयास पानहि तसें काव्यार्थची सेवणें !
वन्हीं कीं हिमसेक त्या न भिववी; स्वातंत्र्यवृत्ती सदा !
काळाचाहि न दास; होइल कशी त्याची न गीर्वार्यदा ? १९

---

१ कै. केशवसुत २ ज्ञानेश्वर ३ विषयीं.

झाली जीवन काव्यमोहकगिरा कीद्सास ठावे जनीं;
स्कॉटें लेखन सोडिलें न कधिंही, हे घ्या पुरें हो मनीं;
इन्फरनो लिहितां दिनींदिनिं अहो, डॅन्टेवपू ती खचे !
वर्षे साठ निसर्गपूजन उगां कां शब्दमूल्या[1] रुचे ? २०
युरोपांतिल मालिका प्रिय तुह्मां; वृत्तांत हावा तिचा;
तीचा त्याग ह्मणोनि मी कथियला, सोडोनि मद्बंधुचा.
मद्बंधूसम भक्तिनें टिकाविलीं काव्यें तियें आपुलीं;
स्वानूभूतिविना तिथें फिरवितां तो काळ हीं कुंचली ! २१
सांगे आणिक त्यां नका वडबडूं भक्तीविषीं वांकडे;
निंदा सार्थ न तूमची ह्मणुनि हो लोकांस कोडें पडे;
सांगा त्या समजाउनी " तुमचि हो, भक्ती असे चांगली;
पाहूं पंढरपूरनाथ तुमच्या ती अंतरीं बाणली ! २२
" बंधूनो ! तुमच्यासवें ह्मणिंच हो न्या आपुल्या बांधवा;
त्यांना ज्ञानचि द्या ! खरोखर तयें होतील ना वीधवा !
काळें प्लेगहि जाइल, क्षण न हो, तो कॉलराही टिके
ज्ञानाचे उपयोग कां दवडितां होवोनि त्या पारखे ?" २३
ऐशा शांत, मधु, प्रधानवचनें ज्ञानस्तुती हो, करा;
प्रीतीगानच तें; परी क्षणभरीं न्या भिन्नमार्गी जरा;
गा हावीं तितुकीं सुमंजुल रवें गानें; हवें त्यावरी;
जाणा सद्गुणिं उच्च आसन कवी घे शारदामंदिरीं ! २४

---

1 Wordsworth.

## मातृस्मृति.

[ चाल—' अभिनवमधुलोलुप. ']

'मातेसम दैवत जगिं अन्य कुणि नसे–'
वदती; मज सांगा तें कोण जगिं वसे ?
नाभिं कीं त्या नागनगरिं ?
स्वर्गींच्या गिरिकंदरिं ?
शोधितां कि अंतरदरि
गवसेलच छाया तरि ?
हें सांगा कोणी तरि ! लागलें पिसें !! १

हारपली माता मम
तैंपासुनि शून्य धाम !
ज्ञान परी मनिं न प्रेम–
ईशा, करिं पूर्णकाम–
या माते ! तूंच येइं ! अन्य मनिं नसे ! २

अथवा कां सोडियलें ?
बालवय न देखियलें ?
कीं बंधो, तूं नेलें ?
जग कां नच पाहियलें ?
अहह ! कसा जननिघात करुनि हंसतसे ! ३

कथिं अथवा माये गे
तेंच मूल आवडलें?
म्हणुनि असें जग वेगें
त्यासवेंचि सोडियलें ?
अहह ! कसें भेदियलें पुत्रहृदय हें ! ४

पाहसि कां वरुनि तरी
विरहअश्रुबिंदुसरी ?
अजुनि होत कां गे स्मृति ?
बालगालचुंबनमति ?
अनुभूति न; तरि विस्मृति मज न होतसे ! ५

एक बिंदु जरि पडला
शीर्षीं तव नयनांतुनि,
मानिन मी सौख्याला,
कठिन कीं दिनरजनी !
अहह ! नेत्र हेच परी भिजत हृद्रसें ! ६

मानस हें कथित अझुनि
'येइल ती एक दिनीं'
श्रमलों मी वाट बघुनि !
परि येत न दिन अझुनी !
अहह ! किती नैराश्यें कंठुं दिन असे? ७

मेई तरि त्या लोकीं
जो तुजला कधिं न झांकि !
येइन मी तेथें कीं,
ऐस स्वर्गि कीं नरकीं—
माता, मम माता मज ! अन्य नच दिसे ! ! ८

——:o:——

## मातृप्रेमविकास ह्मणजेच सद्गुरुप्रेमोद्भव.

" I was as a gem concealed
Me my burning ray revealed."

*Koran.*

धडे प्रीतीचे । घेतले मीहि गमतीचे.
'सहजसंभवा प्रीती असुनी
अंतरिं उपजे कैसी शिकुनी ?'
वदतिल कविजन विस्मित होउनी
'नवल हें मोठें । कविवचनिं अचंबा वाटे ?' १
पुष्पोद्गम तो सहजचि होतो,
सौरभ्यें मग कविमन हरितो;
'उद्गम, सौरभ्यहि परि असतो'
या ज्ञानानें । प्रेमाचें कविमन ठाणें. २
'सहजसंभवा प्रीती' वदती,
ठावें कोणा काय असे ती ?

ज्ञानाविण ती शून्यच, नुसती
नामविहीन । फलकारी नच; ती दीन ! ३

असते प्रीती; अंतरिं वसते;
ज्ञानें रूप गुणां परि घेते;
रसिकांना मग आनंदविते;
क्रिया ज्ञानाची । फुलविते कळी प्रीतीची ! ४

वाटे पवनाला हंसवावें;
जलनादें कीं गुणगुण गावें;
वृक्षलतांना तुष्ट करावें;
हसत रहावें । मेघांतें उडुनी जावें ! ५

मग आकाशीं फिरत रहावें;
धूमकेतु छंदेंच पहावे;
कडकडुनी त्यां भेटत जावें !
कशी प्रेमाची । उमलली कळी आतांची ? ६

बीजाविण कां वृक्ष जहाला ?
कां कर्माविण देह निघाला ?
'उपजे शंका याची मजला;'
अंतिं मातेचा । गवसला धडा प्रीतीचा ! ७

बालवयांतुनि जेथें तेथें
आनंदाविण कांहिं न ममतें;

इतर विकारां स्थल नच तेथें;
नाहीं ठावें। आनंद प्रीतिला पावे. ८

प्रतिबिंबातें घेण्या दर्पण,
संध्यारागा जल कीं स्थान,
तैसें माझें बालपणीं मन;
घडा प्रीतीचा। उमटला प्रथम जननीचा! ९

गमतीची मातेची रीती,
अवयव मूकपणें शिकवीती!
प्रीतिसुधेचा सांठा दाविति!
नयन मातेचे। बोलती बोल प्रीतीचे! १०

इंदुबिंबिंच्या पीयुषधारा;
पिककंठींचा गानपसारा;
येतो भूवरिं जेंवी तारा;
तशी प्रीतीची। अंतरीं गती मातेची! ११

कानहि करिती अपुलें काम,
मम रुदनें ती सोडी धाम;
घेउनि जवळी देई पान;
अहा प्रीतीचे। मोकळे हौद हो साचे! १२

धन्य, धन्य, बा ईशा झालों!
मातृस्तनिं तुज प्राशुनि धालों!

हर हर ! पोरवया कां मुकलों ?
जननी गेली । प्रीतीचि साउली सरली ! १३

जननी गेली ! प्रीतीचि साउली सरली !
ओळखिचे ते नयन न दिसती;
मंजुळ गाणीं कानिं न येती;
प्रेमामृत नच मिळतें ओष्ठीं;
पटल शोकाचें । झांकितें ठसे प्रीतीचे ! १४

चुकलें पाडस रानीं फिरतें;
विधवा शोकें हृदया पिटते;
विरहें भक्तमनचि हळहळतें;
तसा दुःखें मीं । हळहळत, पिटत फिरलोंही ! १५

प्रेमरहित ही सृष्टी गमली !
शोकच भरला या हृत्कमलीं !
शोकरूप कीं आई झाली !
नाहीं ठावें । शोकही प्रीतिला पावे ! १६

वाटत होतें एकच देहीं
वसते प्रीती; नच कोठेंही;
देहपतनिं कीं जाते तीही;
पटल मायेचें । झांकितें नेत्र मम साचे ! १७
कोठें ! कोठें खास हृदय तें !

एका स्थलिं जें प्रेमा बघतें!
प्रतिभाही ती कोठीं गमते
स्थलीं एका जी। प्रीतीला अडवूं पाही! १८

देत तोष कां एक लता ती?
पूर्ण न एकाकी सरपंक्ती!
जोडा त्यांनां–माना डुलती!
(शंका) मन हें देतें। एकत्व सृष्टि देवीतें? १९

(समाधान) सृष्टीदेवी एक जरी ती
भरली नानाविध गोष्टींनीं;
गोष्टि शरीरें; आत्मा देवी;
भजा आत्म्याला। शोधुनी अंतरीं त्याला! २०

'जाणावें परि आत्मा वसतो!
सर्वांतरिं; तो प्रेमें दिसतो;
ज्ञानानें परि प्रेम फुलवितो!'
धडा प्रीतीचा। सद्गुरुचा* बहु मोलाचा! २१

दुग्धवृष्टिनें मूकपणानें
बीज पेरिलें मम मातेनें;
अंकुर आला उपदेशानें;
असे प्रीतीचे। घेतले धडे गमतीचे! २२

*कविवचनांचा.

## रडा! रडा! तें रडें चालुं द्या!

( Thomas Moore ह्या आयरिश कवीच्या Weep on! Weep on! या कवितेच्या आधारें-)

पादाकुलक वृत्त.

रडा! रडा! तो काळचि गेला। श्रेष्ठपणाचा गर्व निमाला;
सर्वत्रहि अंधार दाटला। पूर्वयशातें आजचि मुकलां;
सर्व पुण्य तें व्यर्थ सांडलें। संतवचनही वायां गेलें;
सद्वृत्ती! तव विझली ज्योती। कधिं नच आतां प्रकाशेल ती!

रडें चालुं द्या! पुढें कदाचित। उठविल तें कीर्तीचें भूत;
आज जागचीं जागीं जिरतीं। सत्कृत्यें, तीं येतिल वरती;
तमोगुणाचे गुलाम जेथें। अखेर निजतिल शोकीं, तेथें
त्या या भीषण जंबुद्वीपीं। येतां पुढतीं मुलें कदापी,
आश्चर्यें वदतील "कशा या। दुष्ट नीच वृत्तींनीं धरिल्या
सुनिश्चयी दिलदार नरांच्या। मानगुटी? कृति आश्चर्याच्या!"

"अथवा" वदातिल "दैवजाल तें। गुंफियलें भेदें निजहस्तें;
मत्सरादि रिपु एक जाहले। पूर्वज तेव्हां प्रेम विसरले;
एकवटावीं जीं हृदयें तीं। तुटलिं; फिरलिं निजहिताभोंवतीं;
निंदियलें परमेशदानही। नीच मना सीमाची नाहीं!

---

१ प्रेम.

हरहर ! ज्या मंदिरीं प्रार्थना । तेथें उठली शापगर्जना !"
म्हणुनि रडा ! तें रडें चालुं द्या !
करिल तुह्मांवरि रडेंची दया !!

---

## अस्थानीं प्रेम.

( कोणा एका वेश्येच्या हृदयांत, तिच्या पूर्व पुण्याईनें सात्विक प्रेमाचा उद्भव झाला. अर्थातच, तिच्या प्रस्तुतच्या जन्मांत तें विकसित होणें फार कठिण झालें. त्यामुळें ती शोक करीत आहे, असें कवि समजतो ).

भैरव.

हाय ! हाय ! करुं काय ? अतां मी ? ॥ धृ० ॥
अंतरिं होई प्रेमोद्भव या । परि हा अमंगल काय !
कायापातकगरलोन्मादें । कोमेजुनी कळि जाय !
प्रेमकळी ही प्रेमोच्छ्वासें । कुणि नच फुलविल हाय !
प्रेम सतींचें; नच असतींचें । असतीस करि ते अपाय !
जाळुनि टाकी, प्रेमा, काया । दीन सखी धरि पाय !

---

# काव्यरत्नविलास.

Poetry, which is a true ideal, is the consolation of mortal men.

*Emerson.*

श्लोक.

झाले 'सप्त च अष्ट अब्द', जननी सोडूनि गेली मला;
तेव्हांपासुनि पाहतों निशिदिनीं भेटेल कोठें मला ?
बाल्यीं मी बहु खेळलों, खिदळलों, मित्रांसवें नाचलों;
'खाऊंनीं' वळलों, परी न जननीप्रेमास मी पावलों ! १

तारुण्यीं मदमत्त मंदमति मी सौख्यांस लांचावलों;
वाटे प्रीति मिळेल ती जर तिच्या मागेंच मी लागलों;
कायाशक्तिस घेउनी ढवळिला सौख्याब्धि जेव्हां वळें,
'जेथें अब्धि न तेथ रत्न न मिळे' कैसें न तेव्हां कळे ? २

तेव्हां या न कळे; अजीं परि मिळे एकाच देवीमुळें
मातृप्रेमसुधांश; तत्परिमळें आत्म्यास शांती मिळे !
त्या देवीस न हस्त, पाद अथवा ती शुभ्रदंतावली;
ती दिव्यद्युति कल्पनामय सखी ' तूं काव्यरत्नावलि !' ३

## ' जग करील यांना खोटे ! '

चाल—उद्धवा, शांतवन कर जा.

वाचुनी वाचुनी दमलों । मग माझ्या शयनीं पडलों;
तों विचार उठले नाना । त्यांमधीं पूर्ण मी बुडलों;
नित्यासम मस्तक दुखलें । नैराश्यें दीन जहालों;

वाटलें, न वाचन बरवें;
जिवास न त्यांत सुखावें;
वाचलें सर्व विसरावें;

जीवास पाहिजे आतां । करमणूक;—ग्रंथीं मेलों ! १

तों आली लखुबाळाला । घेउनी कुशी मंदीरीं;
दोघांनीं केली होती । लाकडी हयावर स्वारी;
लाकडी मला; परि त्यांना । प्राणांचा कलिजा भारी !

"काका ! हा सुंदल कान
तोकालुन बघतो चान !
वाकुदी किती ही मान !

घोदा हा चपलहि अमुचा ।—लकु, नच ले काति उगाली !"
कधिं हळूंच, कधिं वेगानें । कधिं नाचुनि साध्या गतिनें,
कधिं करुनि वाकुडी मान । हय फिरे बड्या ऐटीनें;

---

१ पुतण्या. २ मुलगी.

कधिं कधीं टाकुनी ऐट । अडखळे मधें गमतीनें;
मग देतां मुलिं न इशारा,
हय घेई गति चौफेरा;
भूमीचा अल्पच थारा !
अरे, अरे ! लंगडे घोडा ! । दुखवला पाय काट्यानें ! ३

हळहळे तसा खिंकाळे । परि पुन्हां घेत उड्डानें !
किति तरी घातल्या फेऱ्या । मंदिरीं अशा गमतीनें !
धावतीं मुलें; परि हय त्यां । वाटलें दमत रस्त्यानें !
काढिते कुशी खोगीर;
थापटे लखू हळुंवार;
घालितीं गवत सुकुमार;
तेव्हां मज वाटे, खासी । होईल मौज भीतीनें. ४

डोळे मग मोठे केले । घेतलें बारपिस्तूल;
“हं ! कुशे ! लांब हो ! घोडा । मारितों तुझा मी ठार !
दूर हो लखू, तूं आतां; । घोडा बघ मेला ठार !”
परिसुनी अशी ही वाणी;
अदयता बघोनी वदनीं;
पिस्तूल हातिंचें बघुनी;
पोरें तीं चटकन थिजलीं ! । डबडबले नेत्रहि गोल ! ५

होइना शांत मन्मुद्रा । पाहोनी, अश्रू ढळले !

## ‘ जग करील यांना खोटे ! ’

चाल—उद्धवा, शांतवन कर जा.

वाचुनी वाचुनी दमलों । मग माझ्या शयनीं पडलों;
तों विचार उठले नाना । त्यांमधीं पूर्ण मी बुडलों;
नित्यासम मस्तक दुखलें । नैराश्यें दीन जहालों;

वाटलें, न वाचन बरवें;
जीवास न त्यांत सुखावें;
वाचलें सर्व विसरावें;

जीवास पाहिजे आतां । करमणूक;—ग्रंथीं मेलों ! १

तों आली लखुबाळाला । घेउनी कुशी मंदीरीं;
दोघांनीं केली होती । लाकडी हयावर स्वारी;
लाकडी मला; परि त्यांना । प्राणांचा कलिजा भारी !

“काका ! हा सुंदल कान
तोंकाळुन बघतो चान !
वाकुदी किती ही मान !

घोदा हा चपलहि अमुचा ।—लकु, नच ले काति उगाली !”
कधिं हळूंच, कधिं वेगानें । कधिं नाचुनि साध्या गतिनें,
कधिं करुनि वाकुडी मान । हय फिरे बड्या ऐटीनें;

---

१ पुतण्या. २ मुलगी.

कधिं कधीं टाकुनी ऐट । अडखळे मधें गमतीनें;
मग देतां मुळिं न इशारा,
हय घेई गति चौफेरा;
भूमीचा अल्पच थारा !
अरे, अरे ! लंगडे घोडा ! । दुखवला पाय कास्यानें ! ३

हळहळे तसा खिंकाळे । परि पुन्हां घेत उड्डानें !
किति तरी घातल्या फेऱ्या । मंदिरीं अशा गमतीनें !
धावती मुलें; परि हय त्यां । वाटलें दमत रस्त्यानें !
काढिते कुशी खोगीर;
थापटे लखू हळुवार;
घालितीं गवत सुकुमार;
तेव्हां मज वाटे, खासी । होईल मौज भीतीनें. ४

डोळे मग मोठे केले । घेतलें बारपिस्तूल;
"हं ! कुशे ! लांब हो ! घोडा । मारितों तुझा मी ठार !
दूर हो लखू, तूं आतां; । घोडा बघ मेला ठार !"
परिसुनी अशी ही वाणी;
अदयता बघोनी वदनीं;
पिस्तूल हातिंचें बघुनी;
पोरें तीं चटकन थिजलीं ! । डबडबले नेत्रहि गोल ! ५

होइना शांत मन्मुद्रा । पाहोनी, अश्रू ढळले !

परि तिळहि न माझें वदन । सौम्य मी तदा हो, केलें;
मग मन्मनि कोमलता ती । आणाया दुहिता बोले,
"काका ! कां ऐसें कलतां ?
आजच कां ऐसें बघतां ?
पित्तूल असे कां धलितां ?
माझा हो मजला ! सोडा । घोडा !"–हें लखुही बोले ! ६
चिमुकले गोजिरे हात । ठेवुनी हयावर त्यांनीं,
फिरवुनी दृष्टि, अश्वाला । पाहिलें पोटभर नयनीं !
पुनरपी पाहिलें वरतीं । उपजली दया कां अजुनी ?
अंतरीं दया; परि वरतीं
अदयताच घटकेपुरती;
रक्तद्युति नयनें धरितीं;
"व्हा दूर ! मूर्ख पोरांनों ! । गोळी ही जाइल घुसुनी !" ७
मी वरीं उडविला बार ! । परि दोघे कांहिं न हलले !
मात्र ते दचकले हृदयीं ! । आपाप नयनही मिटले !
जातां तो निघुनी क्षण, त्यां । अश्वांगस्पर्शसुख झालें !
मति होती, गेला मरुनी;
पाहतां नयन उघडोनी,
हय दिसे तसाची अजुनी !
आश्चर्यें बघतां वरतीं । मन्नयनीं अश्रू दिसले ! ८

घेतलें तदां उचलोनी । बाळांना, हृदयीं धरिलें !
मस्तकीं तयांच्या अश्रू । नयनांतुन माझ्या पडले !
गुण गावे त्यांचे; परि ते । अश्रूंत शब्द विरघळले !
हुंगुनी तयांचें शीर;
नयनांचें पुसुनी नीर;
स्फुंदलों शब्द हे चोर
"काळजी मनाला वाटे । जग करील यांना खोटे !" ९

---

## शांतीस.

( चाल—तीच मनोहारिणी.— )

केशवसुत.

मन सखये तळमळे । अतिशय गे हळहळे ॥ ध्रु० ॥
ती सुखघटिका, गे मम लतिके !
तें प्रिय दर्शन, सौख्यदायिके !
ती जगविस्मृति, गायनरसिके !
घडेल कां गे पुन्हां अंबिके ?
तुजमाजीं लोभलें । मन; नच तें शांतलें ! १
पूर्वि पाहिली ओझरती तुज;
तदां गुंगली मति ही सहज !

अहह ! दृष्टि मम होती दिपली !
तोंच, हाय ! तूं विरुनी गेली !
अहह ! कसें भाळलें । हें हृदय तदां; पोळलें ! २

दर्शनसुख मज पुनरपि देशिल;
घेशिल मज भुजिं; चुंबशील पल;
प्रीतिगान, तीं शांतिगायनें
अखंड गाशिल; या आशेनें
अगणित गे कंठिले । दिन, दीनें प्रीतले ! ३

नाहिं तुझें चिर सौख्य लाधलें;
नाहीं संगमसुख मज झालें;
उलट, गुंतलों आशापाशीं;
वेडाही जन ह्मणती मजसी;
नाहीं तें, नाहिं हें; । मन गगनीं लोंबलें ! ४

ओढीं, ओढीं, तुझ्याकडे तें !
क्षण नच सोशिल जड भूमीते ।
विरल सखे तूं मृदु; घन भूमी !
सुम वा कंटक वद, सेवूं मी ?
दोन्ही गे सेवणें; । परि बल हें संपलें ! ५

आजवरीं कां कमि गिळियेले
दुःखद कंटक विषमय प्याले ?

परि नच आलिंगलें मला तूं !
तोडियलाहि न आशातंतू !
दुःखचि कां चित्रिलें । विधिनें गे कोमले ?
प्रथमच कां गे भाळियलें मज
जर ठावी मम दुर्बलता तुज ?
नच कविजन तव वर्णन करिते;
नच वा दर्शन तव, मनिं भरते;
नसतें गे सोनुलें । चित्तचकोर लोभलें !
नसती हंसली, नसती रुसली, ७
नसती नटली, नसती फुगली,
नसती गीतें मनिं गुणगुणली,
ती सुखघटिका ऐसी गेली,
खचित सखे, जाहलें । नसतें हें बाहुलें !
परि आतां हा ! दीन जाहलों ! ८
तुजवांचुनि मूढत्व पावलों !
मन न रमे तुजविना कुठेंही !
मम वेडा सीमाची नाहीं !
नैराश्यां छवकले । मी कितिकां लोटिलें ! ९
येई, येई, कोमलगात्री !
सुखवीं एकच दिनिं वा रात्रीं !
गाइन कीर्ती तव सावित्री !

करिन नादमय खास धरित्री !
हे बघ, मी धरियले । हात तुझे सोनुले ! १०

---

## पुस्तक कोणाचें ?

चाल–रचिसि वेषभूषा–

न. चि. केळकर.

पुस्तक कोणाचें ? सतत जो तें वाचिल त्याचें ॥ ध्रु० ॥
नहिं, नहिं; करील मनन, तयाचें; निदिध्यासिं रत त्याचें,
निदिध्यासिं रत, गिरि, तरु, कंदर, जल हें ग्रंथ तयाचे ॥१॥
पिक गाई ज्यासवें गान त्या काय शब्द मनुजाचे ?
पिककंदरमनुजांत तयाला स्वरुप दिसे हृदयाचें ! ॥ २ ॥

---

## अश्रु.

मैत्रीप्रीतींनीं जेव्हां, मन भुलतें अपुलें, तेव्हां;
अथवा सत्याची प्रतिभा, खुलते, तेव्हां दिसे प्रभा;
वदनावरती । हास्यानें ती । फुलते कांती ॥
परि स्वहृदयींची प्रीति, अश्रु काढिते एकांतीं ! ॥ १ ॥
दांभिकहास्यें अनेकदां, झांकियलें तद्रीतिमदां;

सहज उसासा जेथ निघे, अश्रुपूर्ण वा दृष्टि बघे;
तोच उसासा द्या मजला, शांतवील तो हृदयाला !
त्या दृष्टीनें । त्या नयनानें । कटाक्षबाणें ॥
भेदा भेदा क्षण मजला, तो व्रण वाटे सुखद भला ! ॥ २ ॥
अखिलहि मर्त्यांना दान, होतें इहलोकीं छान;
साधन आत्मज्ञानाचें, जेथें भय नच मायेचें;
तो सद्गुण या हार्दि शिरतां, पावे करुणाकोमलता !
करुणेनें तें । हृद् विरघळतें । नंतर येतें ॥
सहजाचि नेत्रद्वारानें, अश्रू मौक्तिकरूपानें ! ॥ ३ ॥
कीर्तिपथाला ईर्षेनें, लागे योद्धा वीर्यानें;
अंतरिं त्या नच शिवे कधीं, मृत्युभीति मुळिं रणांमधीं;
रक्तमांसिं तो आनंदें, धरि रिपुमस्तक स्वच्छंदें;
हस्तिशिरावरि । चढुनी झडकरि । रिपुप्राण हरि ॥
परि संग्रामानंतर तो, रिपुशव अश्रूंनीं बघतो ! ॥ ४ ॥
कीर्तिहार तो घालुनी, त्सरुमाजीं असि ठेवोनि;
जातां योद्धा निज सदनीं, येई सुंदर तद्रमणी;
करण्या गौरव हास्यमुखें, सदन भरे तें तदा सुखें !
मग आलिंगन । देतां चुंबन । हृदयांदोलन ॥
होई, तेव्हां सहज दिसे, अश्रु; तिथें रणशौर्य वसे ! ॥ ५ ॥
प्रेमल कोमल, सुशील ती, भार्या, जी सदनीं शांती;
तप्त मना जी स्वप्रेमें, शांतवि अपुल्या समागमें;

करिन नादमय खास धरित्री !
हे बघ, मी धरियले । हात तुझे सोनुले ! १०

---

## पुस्तक कोणाचें ?

चाल—रचिसि वेषभूषा—

न. चिं. केळकर.

पुस्तक कोणाचें ? सतत जो तें वाचिल त्याचें ॥ ध्रु० ॥
नहिं, नहिं; करील मनन, तयाचें; निदिध्यासिं रत त्याचें,
निदिध्यासिं रत, गिरि, तरु, कंदर, जल हें ग्रंथ तयाचे ॥१॥
पिक गाई ज्यासवें गान त्या काय शब्द मनुजाचे ?
पिककंदरमनुजांत तयाला स्वरुप दिसे हृदयाचें ! ॥ २ ॥

---

## अश्रु.

मैत्रीप्रीतींनीं जेव्हां, मन भुलतें अपुलें, तेव्हां;
अथवा सत्याची प्रतिभा, खुलते, तेव्हां दिसे प्रभा;
वदनावरती । हास्यानें ती । फुलते कांती ॥
परि स्वहृदयींची प्रीति, अश्रु काढिते एकांतीं ! ॥ १ ॥
दांभिकहास्यें अनेकदां, झांकियलें तद्गीतिमदां;

सहज उसासा जेथ निघे, अश्रुपूर्ण वा दृष्टि बघे;
तोच उसासा द्या मजला, शांतवील तो हृदयाला !
त्या दृष्टीनें । त्या नयनानें । कटाक्षबाणें ॥
भेदा भेदा क्षण मजला, तो व्रण वाटे सुखद भला ! ॥ २ ॥
अखिलहि मर्त्यांना दान, होतें इहलोकीं छान;
साधन आत्मज्ञानाचें, जेथें भय नच मायेचें;
तो सद्गुण या हार्दि शिरतां, पावे करुणाकोमलता !
करुणेनें तें । हृद् विरघळतें । नंतर येतें ॥
सहजाचि नेत्रद्वारानें, अश्रू मौक्तिकरूपानें ! ॥ ३ ॥
कीर्तिपथाला ईर्षेनें, लागे योद्धा वीर्यानें;
अंतरिं त्या नच शिवे कधीं, मृत्युभीति मुळिं रणांमधीं;
रक्तमांसिं तो आनंदें, धरि रिपुमस्तक स्वच्छंदें;
हस्तिशिरावरि । चढुनी झडकरि । रिपुप्राण हरि ॥
परि संग्रामानंतर तो, रिपुशव अश्रूंनीं बघतो ! ॥ ४ ॥
कीर्तिहार तो घालुनी, त्सरुमाजीं असि ठेवोनि;
जातां योद्धा निज सदनीं, येई सुंदर तद्रमणी;
करण्या गौरव हास्यमुखें, सदन भरे तें तदा सुखें !
मग आलिंगन । देतां चुंबन । हृदयांदोलन ॥
होई, तेव्हां सहज दिसे, अश्रु; तिथें रणशौर्य वसे ! ॥ ५ ॥
प्रेमल कोमल, सुशील ती, भार्या, जी सदनीं शांती;
तप्त मना जी स्वप्रेमें, शांतवि अपुल्या समागमें;

मोल न जीच्या प्रीतीला, प्रीतिस्तव करि ममतेला;
ती जाया जर । झाली जर्जर । क्षयरोगें तर ॥
हर हर ! येती यमदूत ! दिसती मग पति-अश्रूंत ॥ ६ ॥
गेली माझी अरुंधती ! करूं कुणाशीं गुजगोष्टी ?
कर्णीं कोणाच्या सांगूं, प्रेमकथा ? मी कुणा बघूं ?
'प्रिये ! लाडके ! करीन गे, प्रीति अखंडित तुजवरि गे !
'ऐसें वदतां । कोणि न आतां । परिसे; होतां ॥
शून्य, होतसे हृदयांत, खळबळ, अश्रू नेत्रांत ! ॥ ७ ॥
वद सखये गे कोणाची, कांता असशी आतांची !
क्षमा करीं या शंकेची, भीति न मानीं वंधाची;
ज्ञान न मजला जन्मींचें, पुढल्या, कांहीं गोष्टीचें;
परि मत्प्रीति । मागत पुढती । नच काया ती ॥
करितों प्रीतिस्तव प्रीति ! तिचीच गे ही अश्रुतति !! ॥ ८ ॥
जिवलग मित्रा हृदयींची, आस असे ही शेवटची;
जर मार्गी त्या अज्ञात, स्वर्गी भेटुं कीं नरकांत;
आतांच्यापरि तेव्हांही, गाळूं अश्रू लवलाही !
परिस्थितीचें । मग तेव्हांचें । भूत न साचें ॥
मानूं; सखया, करूं करूं, अश्रुवृष्टि; ती सदा धरूं ! ॥ ९ ॥
हा ! मंदिर आनंदाचें ! सौख्यांचेंही प्रीतीचें !
बाल्यीं नच जरि मानियलें, तारुण्यीं तरि शोभविलें;
नच अवमानीलें त्यांही; चुकली सेवा नच कांहीं;

हा ! हा ! देहा । इच्छपर्णी हा । जीवात्मा–हा !
सोडुनि तुजला जाइल रे, परि अश्रूंनीं न्हाणिल रे ! ॥ १० ॥
दिन माझा हा मावळतां, सहजच येइल भीषणता !
काष्ठासम हें कलेवर, पडेल तेव्हां चितेवर !
धग धग, धग धग, चिता गळ्या । चेतेलाचि; मग वन्हि उळ्या;
मारीलच रे । रक्षामय रे । कलेवराहि हें, ॥
होइल; तेव्हां रक्षेंत, अश्रु गाळिं दिनरात्रींत ! ॥ ११ ॥
कथन करूं रे नको कधीं, आनंदाच्या भरांमधीं,
मज्जीवित, तें रुक्ष असे ! दुःखाचें तें रान वसे !
अथवा रण नैराश्याचें । अटविल जल तव हृदयाचें !
नसते सद्गुण । अंगीं लावुन । करितां वर्णन ॥
करिशिल पातक दंभाचें ! दान करी रे अश्रूंचें ! ! ॥ १२ ॥

---

## भाकरी.

चाल—भूपती खरे तं०—

What is the use of Penal Code?
The thing we want is "Bread."
Thomas Carlyle

भाकरी ! तुझ्यावरि गीत रचित मी बाई !
जन हसो, वापुडे; विचार नच त्यां कांहीं !

"भाकरी भिकारी, क्षुद्र; विषय नच गीतां;
हे कवे! न घेसी ईशनाम कां आतां
ती अंतःस्फुरिता प्रतिभा कां नच लावी
तन्नामकीर्तनीं? व्यर्थ कशी दवडावी?
ती उज्ज्वलकांती विद्युत् कां भोगावी
या कायार्थचि? कां ज्ञानार्थ न सेवावी?
तें असो सुखाचें ईशनाम बाजूला;
दुष्काळ असे कां विषयांचा काव्याला?
तें प्रेम दिव्य; ती स्वामिभक्ति उत्साही;
ती विश्वभक्ति जी स्फुरवी मम बाहूही!
तें निर्झर, ते गिरि, ते गिरितरु, तें कुहर,
अवमानुनी बलें कां घेसि भाकरी क्षुद्र?"
मज वदोत ऐसें जन, कीं कविबंधूही,
परि सखे, न सोडिन तुजला मी केंव्हांही!
तूं रक्तप्रसन्ना! सहजहक्कमणिखाण!
तूं सखी जिवाची! विश्रांतीचें स्थान!
तूं प्रेम! भक्ति तूं! शौर्य, तसें मम दान!
तव ध्यानीं सगळें हरपे मम तनुभान!
तूं काव्य! दिव्य तूं प्रतिभा मम गानाची!
तव मंत्रें मारिन भरारि मी गगनाची!
तूं देवी माझी! वेंचिन मी हे प्राण

तव भाषीस्तव; नच 'पुनरपि' अवमानीन !
'मां क्षमस्व माते !' विनती ही मम आतां !
तव 'प्रियकर' पुत्रांसम तुज मानिन 'गीता !'
ये सखे, क्षणीं ये देवी, या मम गेहीं !
तूं रुष्ट, कष्टि होतां मी पुष्ट न देहीं !
ती राहुं पुष्टता; कृशता देहीं पसरे ?
कृश तनु कृश मन; कृशमानिं पातक-वारें !
तें भीषण वारें जरि मन्मानिं नच अझुनी,
मति भांबावोनी गेलि चित्र पाहोनी !
तो गाधिज रत वनिं इंद्रियदमनीं नित्य;
परि तुवांच केलें श्वानमांस तद्भक्ष्य !
हे क्षुधाहारिणि ! स्वत्त्वशक्ति ! असुदात्रि !
मां क्षमस्व माते ! वरदा भव या स्तोत्रीं !

---

## नाद-आवाहन.

अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाइल मिटुनी ?
चिंता वागे हीच मनीं !
शांतीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

केशवसुत.

"भाकरी भिकारी, क्षुद्र; विषय नच गीतां;
रे कवे! न घेसी ईशनाम कां आतां
ती अंतःस्फुरिता प्रतिभा कां नच लावी
तन्नामकीर्तनीं? व्यर्थ कशी दवडावी?
ती उज्ज्वलकांती विद्युत् कां भोगावी
या कायार्थचि? कां ज्ञानार्थ न सेवावी?
तें असो सुखाचें ईशनाम बाजूला;
दुष्काळ असे कां विषयांचा काव्याला?
तें प्रेम दिव्य; ती स्वामिभक्ति उत्साही;
ती विश्वभक्ति जी स्फुरवी मम बाहूही!
तें निर्झर, ते गिरि, ते गिरितरु, तें कुहर,
अवमानुनी बळें कां घेसि भाकरी क्षुद्र?"
मज वदोत ऐसें जन, कीं कविबंधूही,
परि सखे, न सोडिन तुजला मी केव्हांही!
तूं रक्तप्रसन्ना! सहजहक्कमणिखाण!
तूं सखी जिवाची! विश्रांतीचें स्थान!
तूं प्रेम! भक्ति तूं! शौर्य, तसें मम दान!
तव ध्यानीं सगळें हरपे मम तनुभान!
तूं काव्य! दिव्य तूं प्रतिभा मम गानाची!
तव मंत्रें मारिन भरारि मी गगनाची!
तूं देवी माझी! वेंचिन मी हे प्राण

तव माप्तीस्तव; नच 'पुनरपि' अवमानीन !
'मां क्षमस्व माते !' विनती ही मम आर्ता !
तव 'क्षियकर' पुत्रांसम तुज मानिन 'गीता !'
ये सखे, क्षणीं ये देवी, या मम गेहीं !
तूं रुष्ट, कष्टि होतां मी पुष्ट न देहीं !
ती राहुं पुष्टता; कृशता देहीं पसरे ?
कृश तनु कृश मन; कृशमानिं पातक-वारें !
तें भीषण वारें जरि मन्मानिं नच अझुनी,
मति भांबावोनी गेलि चित्र पाहोनी !
तो गाधिज रत वनिं इंद्रियदमनीं नित्य;
परि तुवांच केलें श्वानमांस तद्भक्ष्य !
हे क्षुधाहारिणि ! स्वत्त्वशक्ति ! असुदात्रि !
मां क्षमस्व माते ! वरदा भव या स्तोत्रीं !

---

## नाद-आवाहन.

अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाइल मिटुनी ?
चिंता वागे हीच मनीं !
शांतीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

केशवसुत.

## अंजनी गीत.

या या नादांनो, या येथें;
आज्ञापी हा कवि तुह्मांते !
सर्व मिळोनी मत्कार्यातें,
लागा याच क्षणीं ! १

वदनांमाजी सुरशंखांच्या
जा जा कांहीं; ही मम वाचा
काढा; शिरवा या जनतेच्या
बधिर श्रवणांत ! २

फोडा डरकाळी परि आधीं !
झोंप न त्यांची अगदिंच साधी;
क्षिति न बाळगा निद्रेची कधिं;
नंतर हें बोला; ३

" अळशांनो ! कां निजला ऐसे,
पाय पसरुनी, रेडे जैसे ?
श्रवणिं न येतें तुमच्या कैसें,
कविवच वीर्याचें ? ४

केशवसुत फुंकितो तुतारी !
प्रयत्नवादध्वजहि उभारी !
'उगाचि बसुनी खा न भाकरी'—
परि बोले प्रेता ! ५

हरहर ! ही कां निद्रा तुमची ?
लाज न कां मुळिं आलस्याची ?
अथवा निद्रा घ्या शेवटची !
व्यर्थ नको आशा !! ६

मरणाचें मुळिं ढोंग नको तें !
सोंग न जीवित्वाचें रुचतें !
जीवन मारी जें अपुल्यातें
मरणाहुनि खोटें !! ७

सुप्तिमूर्ति तो कुंभकर्ण; परि
येतां संकट हात उभारी !
कंठाजवळीं आली जरि सुरी,
त्यजितां नच निद्रा ! ८

अथवा वाटे असि रामाची ?
दाविल वाट तुह्मां मोक्षाची ?
हरहर ! रामाचि न; दामाची !
नरका नेइल ती !! ९

‘ ज्याची असते जिवंत जागृति ,’
राम वदे ‘ त्या देइन मुक्ति;
ज्याला प्रिय अति गाढ सुषुप्ति,
तो बळि मृत्यूचा !’ १०

निद्रा घेतां; परी बरळतां !

बरळत बरळत हस्तें धरितां
गळा; कुणाचा दाबूं बघतां
न कळे तुह्मांला ! ११

अपुल्या रक्ताचा गोळा जो,
भार्येनें जिस केलें जो ! जो !
त्या दुहितेचा मणि तुटला जों
तोंच गळा धरिता ! १२

नच तुमचाची परि देशाचा
तंतु असे जो परमाशेचा;
रेडा करितां त्या पुत्राचा
मोलें विकण्याला ! १३

चोरुनि शिकला जिवंत तरें
तर पुत्राला कसें मारवे ?
मोठा होतां कसें बोलवें
निंदावच वदनें ? १४

होतिल कवि जनिं कसे अशानें ?
काय करावें मुत्सद्यानें ?
करिल कोण मग हित नेटानें !
सुस्थिच कां अपुली ? १५

येई शंका अतां परोपरि,
नसे नसे ही झोंप खरोखरि;

अळसांतुनि डोंकावे वरिवरी
हत्या भीषण ती ! १६
मार्ग न समजे नविन मतांचा;
जुनाहि तुमजं प्रिय जरि साचा;
होतां कोणी नविन दमाचा
शल्यासम सलतो ! १७
अथवा व्यर्थ कुचेष्टा करितां
मुत्सद्यांच्या, कधिं नच दमतां;
स्थितिनिर्मित तच्छिद्रें करितां
मोठीं अरिसाठीं ! १८
कळण्या सोपी कविची कविता,
मुत्सद्यांची दूरदर्शिता,
प्रयत्न कांहींही नच करितां
व्रण शोधित फिरतां ! १९
कार्य असे कां हें निद्रेंतिल ?
अथवा कां ते स्वार्थि मनांतिल ?
कीं हें अज्ञानाचें पटल ?
हत्या ही अपुली ! २०
मारुनि मारुनि अपुली नांगी
स्वतांच कां विष घेता अंगीं ?
येतां पुढती तुह्मांच गुंगी
मराल ठारच हो ! २१

परिस्थितीच्या अग्निमंडला
भेदा ! भेदा ! व्हां नचें अबला !
प्राण तयें जर गेला, बोला
धैर्यगिरा मरतां ! २२

जाळ्यांमाजी सिंह सांपडे;
सुटकेसाठीं बहू चडफडे;
पाशबद्ध, परि अरिचें नरडें
भूमिच समजे तो ! २३

फोडा मडकें कुविकारांचें !
फाडा पटलहि तें मायेचें ! !
निशाण घ्या मग सुविचाराचें
आणि प्रेमाचें ! ! २४

फुंका भेरी स्वप्राणानें !
नौबत झाडा एकदिलानें ! !
नूतन दम मग अंतःकरणें
टाकिल कीं भरुनी ! ! ! २५

मरतां मरतां व्हा तर वीर !
गृहीं अगोदर; मग बाहेर !
यशापयश ईशच देणार;
प्रयत्न मनुजाचा !" २६



*Place of printing.*-Shruthibodh Mudra-Mandir, 47, Kalbadevi, Bombay.

*Place of publication*-Dhulia, Khandesh.

*Printer.*-Narayan Vasudeo Mahajani.

*Publisher*-Ekanath Yadav Niphadkar,